


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार १६ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







# २ हजारापेक्षा जास्त व्यवहार केल्यास 0.4 टक्के शुल्क

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने यूपीआयवर एमडीआर अर्थात मर्चंट डिस्काउंट रेट लागू करण्याची घोषणा केली आहे. १५ सप्टेंबरपासून रोजी यूपीआय संचालन समितीची बैठक झाली. यात २००० रुपयांपेक्षा जास्तीचा व्यवहारावर केल्यास ०.४ टक्के शुल्क द्यावे लागणार आहे. १५ सप्टेंबरपासून निर्धारित मर्चंट व्यवहारांवर एमडीआर लागू होणार आहे. यूपीआयच्या एमडीआरमधून ग्राहकांना अर्थात सामान्य लोकांना वगळण्यात आले आहे. म्हणजेच एका व्यक्तीने दुस-या व्यक्तीला पैसे पाठवले, तर त्यावर एमडीआर शुल्क आकारले जाणार नाहीये. एमडीआर फक्त सरकारने निर्धारित केलेल्या व्यापारी, व्यावसायिकांनाच लागू असणार आहे.

निवडक मर्चंट व्यवहारांवर सुधारित यूपीआय मर्चंट डिस्काउंट रेट रचना लागू करण्यात आली आहे. ही १५ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होईल; तसेच ग्राहकांसाठी म्हणजे लोकांसाठी यूपीआय पूर्णपणे मोफत राहील. या पद्धतीत २,००० पेक्षा कमी रकमेचे ९५ टक्के कमी मूल्याचे यूपीआय व्यवहार आणि लहान मर्चंट व्यवहार पूर्णपणे मोफत ठेवले आहेत. लहान मर्चंट्समध्ये म्हणजे छोट्या व्यापा-यांमध्ये यूपीआयचा विस्तार करण्यासाठी एका नवीन निधीचा प्रस्ताव मांडला आहे. हा उपक्रम यूपीआयचा वापर वाढवेल, कायमच्या वापरास प्रोत्साहन देईल आणि भारताच्या डिजिटल पेमेंट इकोसिस्टममध्ये लहान व्यवसायांचा समावेश जलद करेल. मोठ्या मूल्याच्या व्यवहारांवरील वाजवी MDR शुल्क यूपीआय इकोसिस्टममधील घटकांमध्ये वितरीत केले जाईल, ज्यामुळे नवीन वापरकर्ते व मर्चंट्सपर्यंत यूपीआयचा विस्तार, तसेच सायबर सुरक्षा आणि नवनिर्मितीमध्ये गुंतवणूक सुनिश्चित होईल, असे सरकारने म्हटले आहे. ग्राहक आतापर्यंत करत आल्याप्रमाणे यूपीआयचा वापर करून मोफत व्यवहार करत राहतील. व्यक्ती-ते-व्यक्ती व्यवहार आणि २,००० पर्यंतचे व्यक्ती ते व्यापारी व्यवहार MDRच्या कक्षेबाहेर असणार आहेत.




■ कोणावर 'भार', कोणाला दिलासा?;
■ सरकारकडून नियम जाहीर

व्यक्ती ते व्यापारी रचनेअंतर्गत काम करणा-या लहान मर्चंट्सना शून्य शुल्क असेल. म्हणजे या श्रेणीतील व्यापारी थेट त्यांच्या बँक खात्यांमध्ये यूपीआय क्यूआर पेमेंट्सद्वारे दरमहा १ लाखांपर्यंत स्वीकारु शकतात. यामुळे असंगठित किरकोळ क्षेत्रात डिजिटल पेमेंटच्या वापरण्याला प्रोत्साहन मिळेल, असेही म्हटले आहे. डिजिटल पेमेंटचा अवलंब अधिक जलद करण्यासाठी विद्यमान मर्चंट्स आणि टियर ३ व लहान बाजारपेठांमध्ये डिजिटल पेमेंट पायाभूत सुविधांना पाठिंबा देण्यासाठी लहान मर्चंट्ससाठी एक समर्पित निधी स्थापन केला जाईल.रेल्वे, दूरसंचार सेवा, विमा आणि इंधन यांसारख्या नियुक्त मर्चंट श्रेणींमध्ये २,००० पेक्षा जास्त यूपीआय पेमेंट्सवर प्रति व्यवहार ५ चा फ्लॅट MDR लागू होईल. २,००० पेक्षा जास्त रक्कम असलेल्या P2M यूपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के MDR लागू होईल, ज्याची कमाल मर्यादा प्रति व्यवहार ३०० असेल. सर्व मर्चंट्ससाठी २,००० पर्यंतच्या कमी मूल्याच्या यूपीआय व्यवहारांवर कोणताही परिणाम होणार नाही, जे सर्व यूपीआय P2M व्यवहारांपैकी ९५ टक्क्यांपेक्षा जास्त आहेत. सुधारित यूपीआय MDR क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड आणि वालेटसह इतर अनेक डिजिटल पेमेंट साधनांशी संबंधित शुल्कांपेक्षा कमी आहे, असेही सरकारने म्हटले आहे.

## कोणत्याही व्यवहारावर 300 पेक्षा जास्त शुल्क आकारता येणार नाही



*नवी दिल्ली/वृत्तसंस्था : UPI द्वारे २,००० पेक्षा जास्त पेमेंटवर ०.४% शुल्क आकारले जाईल. प्रत्येक व्यवहारावर सुमारे ३०० रुपयांपर्यंत कमाल शुल्क भरावे लागेल. ही रक्कम वेगवेगळ्या व्यवहारांवर अवलंबून असेल. तथापि, २,००० पर्यंत पेमेंट केल्यास ग्राहकाकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. अर्थ मंत्रालयाने सोमवारी अधिसूचना जारी करून ही स्थिती स्पष्ट केली होती. RuPay डेबिट कार्डद्वारे होणारे पेमेंट देखील या सवलतीत समाविष्ट केले आहे. खरं तर, ऑगस्टमध्ये संसदेत टॅक्सेशन अँड अदर लाज (अमेंडमेंट) अॅक्ट, २०२६ मंजूर झाल्यानंतर UPI पेमेंटवरील शुल्काबाबत चर्चा सुरू झाली होती. सरकारने UPI ला प्रोत्साहन देण्यासाठी आणि ते विनामूल्य ठेवण्यासाठी २०२१-२२ पासून प्रोत्साहन योजना सुरू केली होती. या अंतर्गत, ग्राहकाकडून लहान दुकानदाराला होणा-या २,००० पर्यंतच्या UPI पेमेंटवर ०.१५% प्रोत्साहन दिले जात होते. २०२४-२५ पर्यंत यावर ८,२७६ कोटींचे प्रोत्साहन देण्यात आले. देशात जून २०२६ पर्यंत सुमारे ५५.५ कोटी UPI वापरकर्ते होते.*

## लूट आता यूपीआयपर्यंत पोहोचली



***नवी दिल्ली/वृत्तसंस्था*** -देशातील डिजिटल व्यवहारांची प्रमुख ओळख बनलेल्या यूपीआयवरून आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधत, २ हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या व्यापारी वढक व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा मार्ग सरकारने खुला केला आहे असे म्हटले आहे.या शुल्काचा थेट भार ग्राहकांवर टाकला जाणार नसला तरी व्यापारी तो वस्तूंच्या किमतीतून ग्राहकांकडून वसूल करू शकतात असा युक्तिवाद राहुल गांधी यांनी केला आहे. त्यांनी या निर्णयामागे अमेरिकन पेमेंट कंपन्यांचा दबाव असल्याचाही आरोप केला आहे. मात्र, केंद्र सरकारने हा आरोप चुकीचा आणि दिशाभूल करणारा असल्याचे म्हटले आहे.राहुल गांधी यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले की, २ हजार रु पयांपेक्षा जास्त रकमेच्या व्यवहारांची संख्या यूपीआय व्यवहारांच्या केवळ ५ टक्के असली, तरी त्यांच्या माध्यमातून होणा-या एकूण व्यवहारमूल्याचा वाटा सुमारे ६५ टक्के आहे. सरकार ग्राहकांकडून कोणतेही शुल्क घेतले जाणार नसल्याचे सांगत आहे. मात्र, दुकानदार किंवा व्यापा-यांकडून शुल्क घेतले गेले तर त्याचा पैसा कुठून येणार? अखेरीस तो वस्तूंच्या किमतीत समाविष्ट होउन ग्राहकांच्या खिशातूनच जाण्याची शक्यता आहे, असा दावा त्यांनी केला.अमेरिकी पेमेंट कंपन्या हिंदुस्थानच्या शून्य-एमडीआर धोरणाला दीर्घकाळापासून विरोध करत असल्याचा आरोपही राहुल गांधी यांनी केला. मोदी सरकारने आता त्याच दिशेने धोरण बदलण्याचा मार्ग मोकळा केला ⇨(पान २ वर)

## पुढच्या वर्षी लवकर याच्या जयघोषात दीड दिवसाच्या बाप्पाला निरोप

**पुणे :** गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या! च्या जयघोषात मंगळवारी पुणेकरांनी दीड दिवसांच्या गणपती बाप्पाला निरोप देत विसर्जन केले. शहरात विविध ठिकाणी दिड दिवसाच्या २ हजार ४३३ गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. नागरिकांनी महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या कृत्रिम हौद, लोखंडी टाक्या आणि मूर्ती संकलन केंद्रांना पसंती दिली. पुणे शहरात ढोल ताशाच्या गजर, भक्तिमय वातावरणात सोमवारी गणेशोत्सवाची सुरुवात झाली. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसह घरोघरी गणराया विराजमान झाले. गणेशोत्सवात दीड दिवस, पाचवा दिवस, सातवा दिवस आणि अनंत चतुर्दशीला होणा-या विसर्जन केले जाते. दीड दिवसाच्या बाप्पांचे मंगळवारी विसर्जन करण्यात आले. महापालिकेच्या आकडेवारीनुसार, मंगळवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत शहरातील विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत एकूण २ हजार ४३३ गणेशमूर्तीचे विसर्जन झाले. त्यापैकी ३८२ मूर्ती बांधलेल्या विसर्जन हौदांमध्ये, १ हजार ४७५ मूर्ती लोखंडी टाक्यांमध्ये विसर्जित करण्यात आल्या. तर ५७६ मूर्ती नागरिकांकडून संकलित करून महापालिकेच्या यंत्रणेकडे देण्यात आल्या. या प्रक्रियेत ३ हजार ३२८ किलो निर्माल्यही जमा झाले. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख संतोष वारुळे यांनी ही माहिती दिली. नगररोड-वाघोली भागात सर्वाधिक ९०२ मूर्ती संकलित करण्यात आल्या. या भागात ५४७ मूर्ती बांधलेल्या हौदांत, तर ३५५ मूर्ती लोखंडी टाक्यांत विसर्जित झाल्या. सिंहगड रोड परिसरात ३१५, धनकवडी-कात्रज-आंबेगावमध्ये ४३०, कोंढवा-उंड्रीत २५५, हडपसर-मांजरीत २३८, बिबवेवाडीत ११४ आणि कसबा पेठेत ८४ मूर्तींचे विसर्जन झाले. निर्माल्यही स्वतंत्रपणे संकलित करण्यात आले.

## वीज बिल थकले तर घरात लगेच अंधार; नव्या नियमाने उडाली खळबळ

**मुंबई / प्रतिनिधी-** महावितरणच्या ग्राहकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. आता जर तुमचे वीज बिल थकले, तर वीज कापण्यासाठी महावितरणचा कोणताही कर्मचारी तुमच्या घरी येणार नाही. नव्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे मुख्य सर्व्हरवरूनच तुमचा वीजपुरवठा स्वयंचलितपणे बंद केला जाणार आहे. त्यामुळे ग्राहकांनी वेळेवर वीज बिल भरणे आता अधिक गरजेचे झाले आहे.ग्राहकांसाठी एक मोठा दिलासाही देण्यात आला आहे. बिल थकल्यामुळे वीज कापली गेली, तरी ग्राहकाने ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने थकित रक्कम भरल्यानंतर अवघ्या ३० मिनिटांच्या आत वीजपुरवठा पुन्हा पूर्ववत केला जाईल. थकित बिलांची वसुली वेगाने करण्यासाठी आणि कारभारात शिस्त आणण्यासाठी महावितरणने ही नवी प्रणाली लागू केली आहे. महावितरणाच्या या निर्णयामुळे ग्रामीण भागातील लोकांनी संताप व्यक्त केला आहे.वीज बिल भरण्याची तारीख चुकली तर आता कर्मचारी नाही, थेट सर्व्हरवरून लाईट कट होणार आहे. त्यामुळे आता ग्राहकांना वेळेवर वीज बिल भरावेच लागेल. नाहीतर घरात अचानक अंधार होउ शकतो. नवीन प्रक्रियेमुळे आता वायरमन अथवा कर्मचा-यांवर अवलंबून न राहता थेट डिजिटल माध्यमातून कारवाई केली जाणार आहे. थकित बिल भरल्यानंतर अर्ध्या तासात वीज सुरू होणार आहे. ग्राहकांना अचानक अंधारात राहावे लागू नये, म्हणून मुदत संपल्यानंतर दुस-या दिवशी सकाळी ९ नंतरच ही स्वयंचलित कारवाई केली जाणार आहे. मात्र, ग्रामीण भागात अनेक नागरिक अजूनही कागदी बिलांवर अवलंबून असल्यामुळे, या डिजिटल सिस्टीममुळे मोठा गोंधळ उडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## दिशा सालियान, आदित्य ठाकरेंना कधी भेटलोच नाही!;

### अभिनेता सूरज पांचोलीचा मोठा खुलासा

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत दिशा सालियान मृत्यू प्रकरणाची सूत्रे सीबीआयकडे गेल्यानंतर या प्रकरणाला पुन्हा एकदा नवे वळण मिळाले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सीबीआयने दाखल केलेल्या प्राथमिक चौकशीत बालिवूड आणि राजकीय क्षेत्रातील नावांची चर्चा पुन्हा सुरू झाली.दिशा सालियान प्रकरणाशी स्वतःचा काडीमात्र संबंध नसल्याचे स्पष्ट करताना सूरज पांचोलीने अत्यंत उद्विग्न भावना व्यक्त केल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून विविध मीडिया रिपोर्टस् आणि निवेदनांमधून माझे नाव दिवंगत दिशा सालियान यांच्या दुर्दैवी मृत्यूशी जोडले जात आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, मी माझ्या संपूर्ण आयुष्यात दिशा सालियान यांना कधीही भेटलेलो नाही, तसेच माझा त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्कही नव्हता. इतकेच नव्हे, तर मी आजतागायत कधीही आदित्य ठाकरे यांना प्रत्यक्ष भेटलेलो नाही, असा स्पष्ट खुलासा सूरजने केला. या प्रकरणाशी माझा दूरदूरपर्यंत संबंध सिद्ध करणारा एकही पुरावा उपलब्ध नाही, त्या प्रकरणात केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी माझे नाव गोवणे अत्यंत चुकीचे आणि मानसिक त्रास देणारे आहे. मी याआधी प्रत्येक अफवेवर किंवा बातमीवर स्पष्टीकरण देणे टाळत होतो; पण आता सतत हेच घडत असल्याने समोर येउन सत्य सांगणे भाग पडले आहे, असे त्याने नमूद केले.



## शिवसेना पक्ष-चिन्हावर 'सर्वोच्च' सुनावणी

### फूट विधिमंडळात नव्हे, मूळ पक्षातच; शिंदे गटाचा जोरदार युक्तिवाद, सुनावणी उद्यापर्यंत तहकूब





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयामध्ये आज शिवसेना पक्ष आणि चिन्हावरची सुनावणी आज पार पडली आहे. हे राज्यातील सर्वात मोठं राजकीय प्रकरण आहे. शिवसेनेत झालेल्या ऐतिहासिक फुटीनंतर शिवसेना पक्ष नेमका कोणाचा? त्याचे निवडणूक चिन्ह धनुष्यबाण कोणाचे? हा मोठा पेच गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने चर्चेत राहिला आहे. त्यामुळे या खटल्यातील वेळोवेळी केल्या गेलेल्या सुनावण्यांकडे राजकीय जगतासह सर्वांचेच लक्ष होते. एकनाथ शिंदे यांच्या वतीने नीरज किशन कौल आपली बाजू मांडली. उद्धव ठाकरे यांच्याबाजूने सगळा युक्तीवाद यापूर्वीच संपला आहे. याप्रकरणी सरन्यायाधीश सूर्य कांत जायमला बागची आणि व्ही मोहना यांच्यासमोर ही सुनावणी सुरु होती.

दरम्यान, याप्रकरणामध्ये २०२३मध्ये निवडणूक आयोगाने विधिमंडळ बहुमताच्या आधारावर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेलात अधिकृत शिवसेना ठरवलंय. त्यानंतर शिवसेना पक्ष आणि चिन्ह हे एकनाथ शिंदे यांच्याकडे गेलं आहे. या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे यांच्याकडून सर्वोच्च न्यायालयाने आव्हान दिलं आहे. गेली दोन वर्ष या खटल्याची सुनावणी सुरु आहे. ही सुनावणी अनेकदा पुढे ढकलली आहे. पण आता ही सुनावणी नियमितपणे सुरु झाल्यानंतर आजच्या सुनावणकडे लक्ष लागलेलं होतं. शिंदेच्या सेनेचे वकील नीरज कौल यांचा युक्तीवाद सुरु झाला. त्यानंतर त्यांनी शिवसेनेच्या घटनेत काय लिहिलं आहे. ते कौल यांनी कोर्टाला सांगितलं.

१) मागच्या सुनावणीवेळी १९९९ च्या घटनेबद्दल मी माहिती दिली होती

२) शिवसेनेच्या घटनेत काय लिहिल आहे हे कोर्टाला कौल सांगत आहेत. ३) शिवसेनेच्या घटनेत प्रतिनिधी सभा महत्वाची आहे. ४) शिवसेना प्रमुखाची नेमणूक ही प्रतिनिधी सभेच्या बैठकीनंतर होते ५) २०१३ साली पक्षप्रमुख हे पद बाळासाहेबांच्या निधना नंतर गोठवलं होत ६) पक्षप्रमुख हे पद २०१८च्या घटनेनुसार चुकीच आहे ७) पक्षप्रमुख पद २०१८ मध्ये आले. हा त्यांचा युक्तिवाद चुकीचा आहे. ८) शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या सन्मानार्थ जेव्हा शिवसेना प्रमुख हे पद गोठवण्यात आले होते तेव्हा २०१३ मध्येच हे पद निर्माण झाले होते.९) पक्षाची नवी घटना निवडणूक आयोगात सादर केलेली नाही.१०) पक्षाच स्ट्रक्चर, नवीन प्रतिनिधी याची माहिती आयोगात दिलेली नाही.



## NEET-UG परीक्षा लवकरच ऑनलाइन होणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** NEET-UG परीक्षा आता कम्प्युटर-बेस्ड स्वरूपात घेण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखालील समिती या योजनेवर काम करत आहे. या निर्णयामुळे परीक्षेचे आधुनिकीकरण आणि कडक सुरक्षा यांचा मेळ घातला जाईल. तसेच, गैरप्रकार शोधण्यासाठी संस्था AI टूल्सचाही अभ्यास करत आहे, अशी माहिती NTA प्रमुख अभिषेक सिंग यांनी दिली. NEET-UG परीक्षा आता पारंपरिक पेन आणि पेपर स्वरूपातून संगणक-आधारित चाचणीकडे वळण्यासाठी सज्ज आहे, असे NTAचे महासंचालक अभिषेक सिंग यांनी सांगितले. हा बदल NTA च्या परीक्षांचे आधुनिकीकरण करण्याच्या आणि गैरप्रकार व इतर अनियमितता रोखण्यासाठी सुरक्षा अधिक मजबूत करण्याच्या उपाययोजनांचा एक भाग आहे. सध्या NEET-UG ही NTA कडून घेतली जाणारी एकमेव मोठी परीक्षा आहे, जी संगणक-आधारित स्वरूपात घेतली जात नाही. JEE, UGC-NET, CUET आणि NIFT या परीक्षा यापूर्वीच CBT (काम्प्युटर बेस्ड टेस्ट) मोडवर करण्यात आल्या आहेत. "CBT हेच भविष्य आहे, त्यामुळे आगामी काळात आमच्या सर्व परीक्षा क्एत्र पद्धतीने असतील,' असे सिंग यांनी ANI ला सांगितले. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणावर NEET परीक्षा ऑनलाइन घेण्यापूर्वी, NTA ला परीक्षण पायाभूत सुविधा (टेस्टिंग इन्फ्रास्ट्रक्चर) वाढवणे आणि सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे आवश्यक असेल. इन्फोसिसचे सह-संस्थापक नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखालील एक उच्चाधिकार टास्क फोर्स या प्रस्तावित बदलांवर काम करत आहे. संगणकाद्वारे NEET परीक्षा घेण्यासाठी आवश्यक असणा-या पायाभूत ⇨(पान २ वर)

### NTA अध्यक्षांची महत्त्वाची माहिती

## वाघाच्या हल्ल्यात 72 वर्षीय शेतकरी ठार

**गोंदिया :** सडक-अर्जुनी तालुक्यातील झुरकुटोला परिसरात वाघाच्या हल्ल्यात ७२ वर्षीय शेतक-याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (१५ सप्टेंबर) दुपारी उघडकीस आली. वातू बकाराम राउत असे मृत शेतक-याचे नाव आहे. या घटनेने झुरकुटोला परिसरासह लगतच्या गावांमध्ये भीतीचे सावट पसरले असून, जंगलालगतच्या शेतक-यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वातु राउत हे सकाळच्या सुमारास घरातील शेळ्यांसाठी चारा आणण्यासाठी झुरकुटोला येथील पहाडीवरील जंगल परिसरात गेले होते. हा भाग एफडीसीएमच्या कंपार्टमेंट क्रमांक ५२४ मध्ये येतो.

## 4.82 लाख ईव्हीएम बदलण्याची योजना

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने आतापासूनच तयारी सुरू केल्याचे समोर आले आहे. देशात सध्या किती मतदान यंत्रे उपलब्ध आहेत आणि आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी आणखी किती यंत्रे खरेदी केली जाणार आहेत, याबाबत माहितीच्या अधिकाराअंतर्गत निवडणूक आयोगाकडे माहिती मागवली होती. आयोगाने दिलेल्या उत्तरातून २०२९च्या निवडणुकीसाठी मतदान केंद्रे आणि ईव्हीएमची व्यवस्था करण्याचे नियोजन सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, २०२९ ची लोकसभा निवडणूक देशभरातील सुमारे १५.३८ लाख मतदान केंद्रांवर होण्याची शक्यता आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकीत देशात १०.५२ लाख मतदान केंद्रे होती. त्याच्या तुलनेत २०२९ मध्ये मतदान केंद्रांची संख्या सुमारे ४६ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे.दरम्यान, मतदान केंद्रांची संख्या वाढण्याची शक्यता आणि जुन्या ईव्हीएमच्या जागी नव्या यंत्रांची प्रस्तावित खरेदी पाहता, २०२९च्या लोकसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाची तयारी आतापासूनच सुरू झाल्याचे या माहितीमधून समोर आले आहे.



**आयोगाकडे सध्या किती ईव्हीएम?-** उत्तरात निवडणूक आयोगाने सांगितले की, सध्या त्याच्याकडे सुमारे ३०.४८ लाख बॅलेट युनिट आणि २१.९२ लाख कंट्रोल युनिट उपलब्ध आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी आयोगाकडे सुमारे १४.८८ लाख बॅलेट युनिट आणि ११.३० लाख कंट्रोल युनिट होती. म्हणजेच गेल्या काही वर्षांत निवडणूक आयोगाकडील ईव्हीएमचा साठा मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

**नवे ईव्हीएम खरेदी करणार-** २०२९च्या लोकसभा ⇨(पान २ वर)

## राखी सावंतच्या वक्तव्यावर कंगना राणौत संतापली; म्हणाली, 'स्वीपरची नोकरीही मिळाली नाही'

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना राणौत पुन्हा एकदा आपल्या बेधडक वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. अभिनेत्री राखी सावंतने नुकत्याच एका पॉडकास्टमध्ये कंगना आणि भाजप नेत्या स्मृती इराणी यांच्याबद्दल केलेल्या वैयक्तिक आणि आक्षेपार्ह वक्तव्यांवर कंगनाने जोरदार पलटवार केला आहे. कंगनाने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक लांबलचक पोस्ट शेअर करत राखीला सुनावलं आहे.



कंगनाने आपल्या पोस्टमध्ये म्हटलं की, फक्त राखीच नाही, तर असे अनेक लोक आहेत जे एखाद्या यशस्वी महिलेला पाहिल्यानंतर तिच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित करू लागतात. स्वतःचा मत्सर, अपयश आणि अहंकार योग्य ठरवण्यासाठी असे लोक यशस्वी महिलांवर वारंवार वैयक्तिक हल्ले करतात. पुढे कंगनाने महिलांना अशा टीकेसमोर स्वतःला कमजोर किंवा अपमानित समजणं थांबवण्याचं आवाहन केलं. प्रत्येक वेळी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी स्पष्टीकरण देत राहण्याची गरज नसल्याचंही तिने म्हटलं.




**फेवर घेउनही काही फायदा झाला नाही**

राखीच्या फेवरच्या वक्तव्यावरही कंगनाने निशाणा साधला. कंगनाने लिहिलं, यश मिळवण्यासाठी राखीने कितीही फेवर घेतले असतील, तरी त्याचा तिला काहीच फायदा झाला नाही. तिला स्वीपरची नोकरीसुद्धा मिळवता आली नाही. अशा नोकरीसाठीही काही गुणवत्ता आणि टॅलेंटची गरज असते. कंगनाने पुढे राखीवर टीका करत म्हटलं की, फेवर मिळो किंवा न मिळो, ती कुठेही जाणार नाही. त्यामुळे बसा आणि माझ्या रील्स पाहत रडत राहा.

**राखीने पॉडकास्टमध्ये नेमकं काय म्हटलं?**

हा वाद राखी सावंतच्या एका पॉडकास्टमधील वक्तव्यानंतर सुरू झाला. या पॉडकास्टमध्ये राखीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, कंगना राणौत आणि स्मृती इराणी यांच्याबाबत लैंगिक संदर्भ असलेली आणि आक्षेपार्ह वक्तव्यं केली. या वक्तव्यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. पॉडकास्टदरम्यान राखीने कंगना आणि स्मृती इराणी यांच्या राजकीय पदांबाबतही प्रश्न उपस्थित केले. तिच्या या वक्तव्यांनंतर सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू झाली आणि आता कंगनानेही त्यावर थेट प्रतिक्रिया देत राखीला उत्तर दिलं आहे.






# धामोरी खून प्रकरणातील फरार आरोपी नागपुरात जेरबंद

## -पैशांच्या वादातून चाकूने भोसकल्याचा आरोप

**अमरावती/प्रतिनिधीः-** धामोरी रोडवरील राहुल रावेकर यांच्या खून प्रकरणात तब्बल दीड महिन्याहून अधिक काळ पोलिसांना चकवा देणाऱ्या फरार आरोपीला अखेर नागपुरातून अटक करण्यात आली. दर्शन विलास महल्ले (वय २३, रा. नवसारी, अमरावती) याला स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे ताब्यात घेतले. ३० जुलै रोजी धामोरी रोडवर राहुल रावेकर (वय ३२) यांचा चाकूने भोसकून खून करण्यात आला होता. याप्रकरणी त्यांचे भाऊ निलेश राजू रावेकर (वय ३५, रा. वाठोडा शुक्लेश्वर) यांच्या तक्रारीवरून खोलापूर पोलिसांनी सुरुवातीला अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला होता. तपासाला गती देताना पोलिसांनी २७ ऑगस्ट रोजी साहील राहुल



भगत (वय १९, रा. अशोक वाटिका, वडाळी) आणि पियुष ऊर्फ प्यानी रणजीत गायकवाड (वय १९, रा. नवसारी) यांना ताब्यात घेतले. चौकशीत पैशांच्या कारणावरून राहुल रावेकर यांच्यावर चाकूने हल्ला केल्याची माहिती समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेत दर्शन महल्ले याचाही सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. मात्र, गुन्हा घडल्यापासून दर्शन पोलिसांच्या हाती लागला नव्हता. तो सतत ठिकाण बदलत असल्याने त्याचा शोध घेण्यासाठी खोलापूर पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेची पथके कामाला लागली होती. अखेर १४ सप्टेंबर रोजी दर्शन नागपुरात असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. माहितीची खात्री करून पथकाने नागपूर गाठले आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्याला ताब्यात घेतले. पोलिसांच्या चौकशीत दर्शनने गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिल्याचे तपास यंत्रणेने नमूद केले आहे. त्याला पुढील तपासासाठी खोलापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, त्याच्याविरुद्ध अटकेची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक दुर्गेश राजपूत, पोलीस अंमलदार प्रशांत वैद्य, श्याम गावंडे, रविंद्र वऱ्हाडे, संजय प्रधान आणि चालक इमरान यांच्या पथकाने केली.

# वाळकी रोडवरील जबरी चोरीचा छडा; दोघे अटकेत

**अमरावती/प्रतिनिधीः-** वाळकी रोडवर दुचाकीस्वाराला शस्त्राचा धाक दाखवून दुचाकी पळवून नेणाऱ्या जबरी चोरीच्या प्रकरणाचा नांदगाव पेठ पोलिसांनी छडा लावला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी दोघांना अटक केली. त्यांच्याकडून चोरीची दुचाकी, गुन्ह्यात वापरलेला कोयता, इलेक्ट्रिक मोपेड आणि मोबाईल असा एकूण ७२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्यात एका विधिसंघर्षग्रस्त बालकाचाही सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यानुसार, सब्बुलाल पिरामु इरपाची (वय ३०), रा. नितीन ठाकरे यांच्या शेतात, वाळकी रोड, अमरावती, मूळ रा. मुलताई, जि. बैतूल (मध्य प्रदेश) हे १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ५.४४ वाजता वाळकी रोडवरील डॉ. बनकर यांच्या शेतासमोरील आंब्याच्या झाडाखाली दुचाकीसह मोबाईलवर बोलत उभे होते. त्यावेळी आरोपींनी त्यांना चाकूसारख्या वस्तूचा धाक दाखवून त्यांची हिरो पॅशन प्रो (एमएच २७ बीसी १७४५) दुचाकी जबरीने पळवून नेली. याप्रकरणी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३९३/२०२६, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्यातील आरोपी सुरुवातीला अनोळखी असल्याने पोलिसांसमोर आरोपींचा शोध घेण्याचे आव्हान होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासह तांत्रिक तपास सुरू केला. तसेच गुप्त बातमीदारांकडून माहिती घेण्यात आली. या तपासातून ऋषिकेश ऊर्फ दुर्लभ प्रमोद भलावे (वय १८), रा. रहाटगाव याचा माग काढण्यात पोलिसांना यश आले. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे दुसरा आरोपी प्रशिक ऊर्फ जय प्रतिक वासनिक (वय २१), रा. मिलिंदनगर, रहाटगाव याचे नाव निष्पन्न झाले. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक करून त्यांच्याकडून फिर्यादीची चोरीस गेलेली हिरो पॅशन प्रो दुचाकी, गुन्ह्यात वापरलेला धारदार कोयता, काळ्या रंगाची इलेक्ट्रिक मोपेड आणि मेटालिक ग्रे रंगाचा मोबाईल फोन असा एकूण ७२,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणाचा पुढील तपास नांदगाव पेठ पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ यशवंत सोळंके, सहायक पोलीस आयुक्त फ्रेजरपुरा विभाग नयन आलुरवार आणि नांदगाव पेठचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथक प्रमुख पोउपनि दिनेश माणुसमारे, पोहवा सतीश देशमुख, पोशि वैभव तिखिले, पोशि निलेश साविकार आणि पोशि शोएबुद्दीन यांनी केली.

# मोबाईल न दिल्याने तरुणाची आत्महत्या

## -मलकापूर येथील हृदय द्रावक घटना

**वरूड/प्रतिनिधीः-** वडिलांनी मोबाईल फोन देण्यास नकार दिल्याच्या रागातून २२ वर्षीय तरुणाने शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची हृदय द्रावक घटना तालुक्यातील मलकापूर येथे घडली आहे. मृतकाचे नाव गोलू सुकन युवनाते (वय २२) आहे. माहिती नुसार, सुकन युवनाते हे मलकापूर शिवारातील शेतात झोपडी बांधून कुटुंबासह राहतात व शेतमजूर म्हणून काम करतात. त्यांचा मुलगा गोलू हा रागीट स्वभावाचा होता.

राग आल्यावर तो नेहमी घराबाहेर निघून जायचा आणि राग शांत झाल्यावर परत यायचा. पोळा सणाच्या निमित्ताने गोलूची विवाहित बहीण रंजना घरी आली होती. घरातून निघण्यापूर्वी तिने आपला भाऊ गोलूच्या हातावर राखी बांधली आणि मिठाई भरवली होती. दोन दिवसांपूर्वी ज्या भावाच्या हातावर तिने राखी बांधली, त्याच भावाचा मृतदेह विहिरीत तरंगताना पाहून बहिणीला मोठा धक्का बसला.

१० सप्टेंबरच्या रात्री जेवणा नंतर गोलू नशेत होता. त्याने वडिलांकडे मोबाईल फोन मागितला. वडिलांनी मोबाईल देण्यास स्पष्ट नकार दिला. या कारणावरून गोलूला राग आला आणि तो रात्रीच घरातून निघून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी तो घरी परतला नाही, म्हणून शोधाशोध केली असता शेतातील विहिरीत दोन दिवसानंतर त्याचा मृतदेह आढळला. मोबाईल वरून झालेल्या वादात रागाच्या भरात त्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली असावी असा अंदाज आहे. घटनेची माहिती मिळताच शेंदुरजनाघाट पोलिसांनी तेथे पोहचून पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवला. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## ४.८२ लाख ईव्हीएम

निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोग ३.५७ लाख बॅलेट युनिट आणि १.२५ लाख कंट्रेल युनिट खरेदी करण्याच्या तयारीत आहे. विशेष म्हणजे, नव्या यंत्रांची खरेदी करण्याबरोबरच जवळपास एवढ्याच संख्येतील जुन्या मशीन निवृत्त करण्याची योजनाही आयोगाने सांगितली आहे. याचा अर्थ आयोगाचा उद्धेश ईव्हीएमची एकूण संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवणे नसून जुन्या मशीनच्या जागी नव्या मशीन आणण्याचा आहे. त्यामुळे ३.५७ लाख बीयू आणि १.२५ लाख सीयूची प्रस्तावित खरेदी ही जवळपास वन-टू-वन रिप्लेसमेंट स्वरूपाची असेल.

**खरेदीसाठी ४८६ कोटींचा खर्च-** निवडणूक आयोगाच्या अंदाजानुसार, २०२९च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनच्या खरेदीवर सुमारे ४८६ कोटी रुपये खर्च होण्याची शक्यता आहे. यंत्राच्या माध्यमातून मतदाराने ज्या उमेदवाराला मतदान केले, त्याची माहिती असलेली कागदी पावती काही क्षणांसाठी मशीनमधील पारदर्शक खिडकीत दिसते. त्यानंतर ही पावती आपोआप एका सीलबंद पेटीत जमा होते.

## NEET-UG परीक्षा लवकरच

सुविधा, सुरक्षेच्या गरजा आणि प्रणालींचे मूल्यांकन करणे हा यामागील मुख्य उद्धेश आहे.NEET परीक्षेच्या प्रचंड व्याप्तीमुळे हा बदल केवळ परीक्षा पद्धतीतील सामान्य बदलांपेक्षा अधिक गुंतागुंतीचा बनतो. कारण यासाठी संस्थेला देशभरात पुरेशी परीक्षा केंद्रे, विश्वाासार्ह प्रणाली आणि कडक सुरक्षा व्यवस्था एनटीएला सुनिश्चित करावी लागणार आहे.

गैरप्रकार शोधण्यासाठी AI चा वापर

याव्यतिरिक्त, परीक्षेची सुरक्षा मजबूत करण्यासाठी आणि अनियमितता शोधण्यासाठी NTA आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (AI) वापराची चाचपणी करत आहे. संभाव्य फसवणूक किंवा प्रणाली-स्तरावरील समस्या ओळखण्यासाठी परीक्षा लाग, डेटा आणि इतर पॅटर्नचे विश्लेषण करण्यासाठी AI चा वापर कसा करता येईल, याचा अभ्यास संस्था करत आहे.सुरुवातीलाच अडचणी ओळखून परीक्षांमध्ये चुका किंवा गैरप्रकारांना कमीत कमी वाव राहील याची खात्री करणे, हा यामागील उद्धेश आहे. दीर्घकालीन विचार करता, आंतरराष्ट्रीय ठिकाणीही परीक्षा घेण्याबाबत एनटीए विचार करत आहे. सिंग यांच्या मते, भारतातील परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवणे हे NTA चे तात्काळ प्राधान्य आहे. एकदा ही प्रणाली भक्कम झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय आणि जागतिक संस्थांसाठी परीक्षा घेण्याच्या शक्यतेचा शोध घेण्याची संस्थेचा विचार आहे. पेपर फुटी, तोतयागिरी आणि इतर प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रणाली मजबूत करण्यावर जास्त भर दिला जात असताना, आणि परीक्षेच्या सुरक्षेबाबत NTA वर नव्याने बारकाईने लक्ष ठेवले जात असताना या बदलांची माहिती समोर आली आहे.

## लूट आता यूपीआयपर्यंत

असल्याचे सांगत त्यांनी सरकारवर अमेरिकी दबावापुढे झुकल्याचा आरोप केला.

**लूट आता यूपीआयपर्यंत पोहोचली : खरगे**

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, मोदी सरकारची ही लूट आता यूपीआयपर्यंत पोहोचली आहे. यूपीआयवर कोणतेही शुल्क नाही हे आता बदलून २,००० रुपयांपर्यंतच्या यूपीआय व्यवहारांवर शुल्क नाही असे करण्यात आले आहे. गगनाला भिडलेल्या महागाईने आधीच सामान्यांचे खिसे रिकामे केले आहेत. घाउक महागाई जवळपास १० टक्क्यांवर पोहोचली आहे, आणि भाजप सरकारने जनतेवर डिजिटल पेमेंट टॅक्स लादण्याचा कट रचला आहे, ज्याचा उद्धेश त्यांच्याकडे शिल्लक राहिलेली थोडीफार बचतही संपवणे हाच आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले, आम्ही ६ ऑगस्ट २०२६ रोजी जो इशारा दिला होता, ज्यावर खुद्द माननीय अर्थमंर्त्यांनी उत्तर देणे योग्य मानले होते. मोदी सरकार आता संसदेत रेटून मंजूर करून घेतलेल्या नव्या कायद्यांचा वापर करून यूपीआयवर शुल्क आकारण्याची प्रक्रिया सुरू करत आहे. पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम्स ॲक्ट, २००७ मधील दुरुस्तीनुसार नुकतीच एक अधिसूचना जारी करण्यात आली आहे, जी बँका आणि पेमेंट प्रोव्हायडर्सना फक्त २,००० रुपयांपेक्षा कमी रकमेच्या यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारण्यास बंदी घालते. परंतु या मर्यादेपेक्षा जास्त रकमेच्या कोणत्याही व्यवहारासाठी कसलेही स्पष्ट संरक्षण दिलेले नाही

## गणेश मंडळातील वादानंतर हातात

वाद वाढू नयेत यासाठी पोलिसांनी संबंधित मंडळाचे पदाधिकारी तसेच पालकांना पोलीस ठाण्यात बोलावून कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त श्याम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलीस निरीक्षक उमेश मुंढे, सहायक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे आणि राजापेठ पोलिसांच्या पथकाने केली.

## वेडसर इसमास अज्ञात वाहनाची

शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी मर्ग गुन्हा दाखल करून अज्ञात वाहनाचा शोध घेणे सुरू केले आहे.

## अखेर घरकुल अभियंता जिवन

संबंधित ग्रामीण गृहनिर्माण अभियंता दोषी असल्याचे आढळून आल्याने त्यांना तात्काळ सेवेतून कमी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ७ सप्टेंबर रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती अंजनगाव सुर्जी यांना दिले आहेत.

तसेच दोषी आढळलेल्या लाभार्थी व संबंधित ग्रामरोजगार सहाय्यक यांच्यावर नियमानुसार वसुलीची कार्यवाही प्रस्तावित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्रामरोजगार सहाय्यक यांनी बांधकाम मस्टर काढतेवेळी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे आढळून आल्याचेही पत्रात म्हटले आहे. संबंधित ए.जे.ई. यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा सादर करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.त्याअनुषंगाने गटविकास अधिकारी, पंचायत समिती अंजनगाव सुर्जी (नक्रनाथ गो. डापके) यांनी संताराम महादु शिंदे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना प्राधिकृत केले असून, त्यांनी तात्काळ संबंधित पोलीस स्टेशनला फौजदारी गुन्हा दाखल करून अहवाल सादर करावा, असे आदेशात म्हटले आहे.

सहा महिन्यांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर तक्रारदार प्रविण मालगे यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून या कारवाईमुळे मात्र पंचायत समिती प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली आहे.

घरकुल अभियंता जिवन आठवले यांना सेवेतून कमी करण्यात आले असल्याचे पत्र मिळाले आहे.फौजदारी गुन्हा दाखल केला असल्याचे पत्र अजून पर्यंत मिळाले नाही. गुन्हा दाखल न केल्यास आम्ही गावकरी पुन्हा उपोषणाला बसणार आहोत. **-ज्ञानदीप बारब्दे तक्रारदार**

## १३२ केव्ही लाईन असूनही

भार, फिडर व्यवस्था आणि तांत्रिक बाबींची संबंधित विभागाने तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. मेळघाटातील विविध गावांमध्ये उपकेंद्रे उभारण्यात आली असताना धारणी उपकेंद्रावरील भाराचे योग्य व्यवस्थापन होत आहे का, याबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. याबाबत विद्युत विभागाने वस्तुस्थिती स्पष्ट करून आवश्यक उपाययोजना करणे अपेक्षित आहे. पावसाळ्यात घरांमध्ये साप व इतर विषारी जीव-जंतू शिरण्याची शक्यता असते. अशा वेळी अचानक वीजपुरवठा खंडित झाल्यास घरात अंधार निर्माण होतो. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही सातत्यपूर्ण वीजपुरवठा महत्त्वाचा आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करून वारंवार वीज खंडित होण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. सध्या शेतांमध्ये विविध पिके उभी आहेत. पिकांना आवश्यकतेनुसार वेळेवर पाणी देणे गरजेचे आहे. वीजपुरवठा अनियमित राहिल्यास सिंचनाच्या नियोजनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेच्या वेळी सुरळीत वीजपुरवठा मिळावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. वीजपुरवठ्यातील व्यत्ययामुळे पिकांवर परिणाम होऊ नये, यासाठी संबंधित विभागाने आवश्यक नियोजन करावे, अशी मागणी होत आहे.

**आमदार-खासदारांनीही प्रश्नाकडे लक्ष द्यावे-** मेळघाटातील वीजपुरवठ्याच्या या समस्येकडे क्षेत्रातील आमदार आणि खासदारांनीही लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिक व शेतकऱ्यांकडून होत आहे. लोकप्रतिनिधींनी विद्युत विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून धारणी परिसरातील वीजपुरवठ्याची सद्यस्थिती, उपकेंद्रावरील भार, फिडर व्यवस्था आणि वारंवार होणाऱ्या वीजखंडित होण्याच्या कारणांचा आढावा घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**अपेक्षित लाभ नागरिकांना मिळावा-** नेपानगर येथून १३२ केव्ही वीज वाहिनी आणण्यासाठी मोठी गुंतवणूक करण्यात आली असून, मेळघाटातील विविध भागांत उपकेंद्रेही उभारण्यात आली आहेत. त्यामुळे या पायाभूत सुविधांचा नागरिकांना आणि शेतकऱ्यांना नियमित, स्थिर वीजपुरवठ्याच्या स्वरूपात अपेक्षित लाभ मिळणे महत्त्वाचे आहे. वारंवार वीज खंडित होण्यामागील नेमकी कारणे कोणती आहेत, याची तांत्रिक तपासणी करून ती दूर करण्यासाठी विद्युत विभागाने पुढाकार घ्यावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

कोट्यवधींची गुंतवणूक झाल्यानंतरही वीजपुरवठ्यात वारंवार व्यत्यय येत असेल, तर त्यामागील तांत्रिक कारणे स्पष्ट करून नागरिकांना दिलासा देण्यासाठी ठोस उपाययोजना कधी होणार, हा प्रश्न सध्या चर्चेत आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून मोर्शी तालुक्यातील

सोयाबीनला शेंगांचे प्रमाण तुलनेने कमी असून, काही शेंगांमध्ये दाणे पूर्णपणे भरले नसल्याचे चित्र समोर आले.रमेश खवले यांच्या शेतातील बागायती कपाशीची पाहणी केली असता, हे पीक मात्र समाधानकारक स्थितीत असल्याचे निदर्शनास आले.

पाहणीदरम्यान जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी उपस्थित कृषी अधिकाऱ्यांकडून पिकांची सद्यस्थिती, उपलब्ध पर्जन्यमान, पावसाच्या खंडाचा पिकांवर झालेला परिणाम आणि शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत देण्यात येत असलेले तांत्रिक मार्गदर्शन याबाबींची सविस्तर माहिती घेतली. तसेच उपस्थित शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत, त्यांना दिलासा देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले.या पाहणी दौऱ्याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, उपविभागीय कृषी अधिकारी उज्ज्वल आगरकर तसेच तालुका कृषी अधिकारी प्रथमेश माने उपस्थित होते.

## राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये

नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती प्रविण एस. पाटील यांनी या निमित्ताने जिल्ह्यातील विविध न्यायालयांना भेटी दिल्या. त्यांनी चांदुर बाजार येथील राष्ट्रीय लोक अदालतीचे उद्घाटन केले. याप्रसंगी त्यांनी न्यायिक अधिकारी, वकील आणि पक्षकारांशी संवाद साधून तडजोडीसाठी प्रोत्साहन दिले. यावेळी प्रमुख जिल्हा न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर यांची प्रमुख उपस्थिती होती.

**५६ लाखांची उल्लेखनीय तडजोड आणि 'विशेष मोहीम' -** अमरावती जिल्हा मुख्यालयातील लोक अदालतीमध्ये मोटर अपघात नुकसानभरपाई (एमएसीपी) संदर्भातील एका प्रकरणात उल्लेखनीय यश आले. पक्षकारांमधील सामोपचारानंतर विमा कंपनीने ५६ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. ही तडजोड जिल्हा न्यायाधीश-१ ए. जी. जोशी, प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) हरीश शेंडे आणि जिल्हा न्यायाधीश-८ गिरीश देशमुख यांच्या पॅनेलसमोर झाली.

उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ७ ते ११ सप्टेंबर २०२६ दरम्यान राबविलेल्या विशेष मोहिमेत १ हजार ३०७ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला, ज्यामुळे लोक अदालतीला मोठी गती मिळाली.

## जिल्ह्यात तडीपारीच्या १६३ प्रकरणांचा

आहेत. तर कलम ५६ अंतर्गत एकूण ६० प्रकरणे प्राप्त झाली होती, त्यापैकी ५४ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

दर्यापूर उपविभागाअंतर्गत कलम १६३ अंतर्गत १० आणि कलम ५६ अंतर्गत ४ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. दर्यापूर मधील २ प्रकरणे खारिज करण्यात आली असून कलम १६३ अंतर्गत प्रलंबित १० प्रकरणांवर आज, १६ सप्टेंबर २०२५ रोजी अंतिम आदेश होणार आहेत.

अचलपूर उपविभागात कलम ५६ अंतर्गत ३८ प्रकरणे प्राप्त झाली होती, यातील ३६ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून २ प्रकरणे प्रलंबित आहेत. चांदुर रेल्वे उपविभागात कलम ५६ अंतर्गत ५ पैकी ४ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून १ प्रकरण प्रलंबित आहे. झाडा (ता. धामणगाव रेल्वे) येथील एक प्रकरण फेरचौकशी अहवालासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी चांदुर रेल्वे यांच्याकडे प्रलंबित आहे.

मोर्शी येथे कलम १६३ अंतर्गत ७ आणि कलम ५६ अंतर्गत ८ प्रकरणे पूर्णपणे निकाली काढण्यात आली आहेत. धारणी उपविभागात कलम ५६ अंतर्गत दाखल एक प्रकरण निकाली काढण्यात आले. तिवसा आणि भातकुली येथे कलम १६३ अंतर्गत सर्व ८८ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. तर कलम ५६ अंतर्गत प्राप्त २ प्रकरणांपैकी १ निकाली काढण्यात आले असून, प्रलंबित १ प्रकरणावर आज, १६ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

## बोर्डीनाला मध्यम प्रकल्पावर

तरी इच्छुकांनी विहित मुदतीत आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## तडीपार आरोपी तलवारीसह

घातक शस्त्र असल्याचीही माहिती मिळाल्याने पथकाने तातडीने कारवाई केली. दोन पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी राज देऊळकरच्या घरावर अचानक छापा टाकला. घराची व परिसराची झडती घेतली असता राज देऊळकर तेथेच आढळून आला. पोलिसांनी घेतलेल्या झडतीत त्याच्याकडून स्टीलची तलवार मिळून आली. पंचांसमक्ष तलवार जप्त करण्यात आली. तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्यासह परवानगीशिवाय अवैधरीत्या शस्त्र बाळगल्याप्रकरणी राज देऊळकरविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे तडीपार आरोपींच्या हालचालींवर पोलिसांचे लक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## डॉ. एकता पांडे यांनी संपादन केली

ही पदवी 'कार्डिओव्हॅस्क्युलर अँड रेस्पिरेटरी फिजिओथेरपी' या विषयात प्राप्त केली आहे. हृदय व फुफ्फुसांशी संबंधित गंभीर आजार, शस्त्रक्रियेनंतर रुग्णांचे पुनर्वसन तसेच श्वसनविकारांवरील उपचारात ही शाखा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. सध्याच्या काळात वाढत्या हृदय व श्वसनविकारांच्या पार्श्वभूमीवर अशा तज्ज्ञ फिजिओथेरपिस्टची भूमिका अत्यंत मोलाची ठरणार असून, रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यास मदत होणार आहे. आपल्या या यशाचे श्रेय डॉ. एकता यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्याम गणवीर, कार्डिओव्हॅस्क्युलर व रेस्पिरेटरी फिजिओथेरपी विभागप्रमुख डॉ. अभिजीत दिवटे, उपप्राचार्य डॉ. सुवर्णा गणवीर, मस्क्युलोस्केलेटल फिजिओथेरपी विभागप्रमुख डॉ. दीपक अनप, कार्डिओव्हॅस्क्युलर व रेस्पिरेटरी फिजिओथेरपी विभागाचे प्राध्यापक डॉ. अरविंद कुमार दास यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि आई-वडिलांसह कुटुंबीयांना दिले आहे. डॉ. एकता यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल त्यांचे वडील राजेंद्र पांडे यांच्यासह सर्व नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील मान्यवरांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा

अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सोहळ्याला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.मनाली क्षीरसागर मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या तर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,अमरावतीचे प्राचार्य डॉ.आशिष महल्ले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, ॲड. जे.व्ही.पाटील पुसदेकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्रा.केशवराव गावंडे, सुरेशदादा खोटरे, प्रा.सुभाष बनसोड, सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, डॉ.अमोल महल्ले, विजय ठोकळ या सोहळ्याला प्रामुख्याने उपस्थित होते.

आजच्या सोहळ्यात श्री मन्नालाल गुप्ता विद्यालय, चांदूर रेल्वे शाळेचे मुख्याध्यापक नितीन कडू यांना उत्कृष्ट मुख्याध्यापक पुरस्काराने तर शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, राजंदा, जि. अकोला या शाळेला माध्यमिक शाळा गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या कनिष्ठ महाविद्यालय शिक्षिका डॉ.कांचन अरुण ठाकरे यांना स्व.वनमालाताई कोहळे स्मृती उत्कृष्ट कनिष्ठ महाविद्यालयीन महिला शिक्षक पुरस्काराने तर याच महाविद्यालयाच्या प्रयोगशाळा सहाय्यक डॉ.वैशाली देशमुख यांना स्वा.हिरोजी उलेमाले स्मृती उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी पुरस्काराने गौरविण्यात आले. शिवाजी बहुउद्देशीय शाळेच्या शिक्षिका सौ.अर्चना अभय ढोबळे यांना स्व.जुगलकिशोरजी अग्रवाल उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, राजंदा येथील हेमंत पाथ्रीकर यांनी शाळांमधील स्व.बी.एस.उर्फ डॅडी देशमुख उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार पटकावला. संस्थेंतर्गत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे वाटप ही या कार्यक्रमात करण्यात आले. चित्रकला महाविद्यालयातून २०२४ -२५ मध्ये प्रथम येणाऱ्या गुंजन धोटे, दुर्गा लांजेवार व दीपिका नानोटकर यांना स्व. अभिषेक बोंडे स्मृती पुरस्काराने गौरविण्यात आले.

या सोहळ्यात विज्ञान संगणक व इलेक्ट्रॉनिक्स या विषयात पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थिनींना देखील पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.या मध्ये शिवाजी महाविद्यालय, अकोटच्या कु.अल्फिया परवीन शेख हसन, श्रीं शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,अकोलाच्या हिमांशू मोकडे व झुबिया सदफ मसरूर जावेद व महात्मा फुले महाविद्यालय वरुडच्या कु.दिव्या मानेकर यांचा समावेश होता. वाणिज्य शाखेत प्रथम येणाऱ्या श्रीं शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,अकोलाच्या कु.साक्षी काटोले हिला सुखदेवराव पाटील स्मृती पुरस्कार तर मराठी विषयात एम.ए.ला प्रथम येणाऱ्या शिवाजी महाविद्यालय, अकोटच्या कु.कोमल हरणे हिला स्व.अनुराधा मुळे स्मृती पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.पुरस्कार प्राप्त डॉ.रुपाली इंगोले, चत्रभुज कदम व अर्चना ढोबळे यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात सर्व मान्यवरांनी उपस्थितांना संबोधित केले. कुलगुरू डॉ.मनाली क्षीरसागर आणि प्राचार्य आशिष महल्ले यांच्या संस्थेच्या वतीने शाल, स्मृतिचिन्ह ,पुष्पगुच्छ व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी केले.संचालन अभिजित खोणे व अपर्णा देशमुख यांनी केले तर संस्थेचे स्वीकृत सदस्य डॉ.अंबादास कुलट यांनी आभार मानले.कार्यक्रमाला संस्थेचे आजीव सदस्य, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दर्यापूर नगरपरिषद क्षेत्रातील

आज (दि.१५) अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने देण्यात आले आहे.

नगरपरिषद दर्यापूरने वृक्षांच्या फाद्यांची छाटणी करण्यासाठी वृक्षकटाई कंत्राटदार किशोर पदमने यांना ८ सप्टेंबर २६ रोजी लेखी आदेश दिला होता.मात्र,या आदेशाचे उल्लंघन करून सुमारे १० ते १५ वर्षे वयाची १७ झाडे बुडापासून कापण्यात आलीत.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम,१९७५ मधिल कलम २१अंतर्गत कारवाई करावी तसेच भारतीय न्याय संहितेतील लागू तरतुदींनुसार गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे.

या प्रकरणात चार नगरसेवक - नगरसेविका व एका लिपिकाने कंत्राटदाराला तोंडी सूचना दिल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला असून,संबंधित व्यक्तींचा कंत्राटदारासोबत आर्थिक हितसंबंध आहे का?याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तोडलेल्या वृक्षांचे लाकूड नगरपरिषद कार्यालयाच्या ताब्यात जमा करणे अथवा नगरपरिषदेच्या मोक्षधाममध्ये वापरणे अपेक्षित असताना, त्याची परस्पर विल्हेवाट लावून काही लाकूड विकण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

त्यामुळे वृक्षतोडीसोबतच लाकडाची वाहतूक,विल्हेवाट आणि आर्थिक व्यवहाराचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.या संपूर्ण प्रकरणाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करावा,वृक्षतोडीची परवानगी व नगरपरिषदेचा आदेश तपासावा,सीसीटीव्ही फुटेज,व्हिडिओ व छायाचित्रांची पडताळणी करावी तसेच संबंधितांचे जबाब नोंदवावेत.चौकशीत सत्य आढळल्यास दोषींविरुद्ध कायद्यानुसार कठोर फौजदारी कारवाई करावी,अशी मागणी अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचिव आतिष शिरभाते,असलम मन्सुरी,दादा इंगळे,मधुकरराव घाडगे,आसिफ खाँ,सिकंदर खान,सुहास वानखडे,सचिन धुर्वे,जाकीर खाँ,जगदीश कांबे,अजीम भाई ऊर्फ बब्बु,राज इंगळे,सैय्यद जुबेर,आदीश इंगळे व सोनु शाह उपस्थित होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, १६ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## जिल्ह्यात अवैध धंद्यांना ऊत ; एलसीबीच्या कारवाईच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह ?

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील तालुक्यांच्या ठिकाणांसह प्रमुख बाजारपेठा आणि ग्रामीण भागातील गावांमध्ये विविध प्रकारचे अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. अवैध व्यवसायांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस दलामध्ये एलसीबीची टिम कार्यरत असते मात्र या यंत्रणेकडून विविध पथके कार्यरत असतानाही अनेक ठिकाणी या धंद्यांना लगाम बसत नसल्याने कारवाईच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

वाशिम, रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, मानोरा आणि कारंजा (लाड) या तालुक्यांच्या ठिकाणी प्रमुख बाजारपेठा, चौक तसेच गर्दीच्या परिसरात अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. ग्रामीण भागातील मोठ्या बाजारपेठेच्या गावांमध्येही परिस्थिती वेगळी नसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे अवैध धंद्यांवर नेमका अंकुश कोणाचा, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

एकीकडे अवैध व्यवसाय करणाऱ्यांची आर्थिक उलाढाल वाढत असल्याचे चित्र असताना, दुसरीकडे या धंद्यांच्या आहारी जाणाऱ्या शेतकरी, शेतमजूर आणि कामगार कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीवर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. त्यामुळे अशा अवैध धंद्यांविरोधात केवळ अधूनमधून कारवाई न करता सातत्याने प्रभावी मोहीम राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.


जिल्ह्यातील अवैध धंद्यांना अभय कुणाचे?
अधिकारी-पुढा-यांच्या कथित राजाश्रयाने अवैध धंदेवाईक मोकाट
जिल्ह्यात कमी पावसाने शेतकरी-मजूर संकटात
अवैध धंदेवाईकांना मात्र सुगीचे दिवस!

**अवैध धंद्यांवर तातडीने कारवाईची मागणी!**

जिल्ह्यात विविध ठिकाणी सुरू असल्याचा आरोप होत असलेल्या अवैध धंद्यांची पोलीस प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी. कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यात विशेष मोहीम राबवून अवैध व्यवसायांवर प्रभावी कारवाई करावी आणि संबंधित ठिकाणी सातत्याने तपासणी व निगराणी ठेवावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

वाशिम जिल्ह्याचा सर्वांगीण विकासाचा वेग वाढविण्यासाठी शासन आणि प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविले जात असताना अवैध धंद्यांचा वाढता विळखा हा सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्याही चिंतेचा विषय ठरत आहे. जिल्ह्याच्या विकासाच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असताना अवैध धंद्यांना मिळणारे कथित अभय नागरिकांच्या चर्चेचा विषय बनले आहे.

जिल्ह्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रशासनावर आवश्यक तो पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. अवैध धंद्यांमुळे निर्माण होणारे सामाजिक प्रश्न रोखण्यासाठी पोलीस आणि महसूल प्रशासनाने समन्वयाने कठोर पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे. दरम्यान, अवैध धंद्यांविरोधात ठोस आणि सातत्यपूर्ण कारवाई झाल्यासच या व्यवसायांना आळा बसू शकतो. त्यामुळे जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर पोलीस प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## महाअभियान : खासदार व आमदारांसह आधिका–यांनी केले नेत्रदान प्रतिज्ञापत्र सादर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

अंधत्व निर्मूलन आणि नेत्रदान चळवळीला बळकटी देण्यासाठी वाशिम जिल्ह्यात एका विशेष नेत्रदान प्रतिज्ञा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या महत्त्वपूर्ण प्रसंगी लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी स्वतः नेत्रदानाची प्रतिज्ञापत्रे सादर करून नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला.

यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजयजी देशमुख, वाशिम-मालेगाव (मानोरा/वाशिम-मंगरुळपीर) विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे आणि कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. साइताई ढाके यांनी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग घेत नेत्रदानाची प्रतिज्ञा केली.

हा सोहळा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, पोलीस अधीक्षक निकेश काटमोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यावेळी बोलताना उपस्थितांनी नेत्रदानाचे महत्त्व अधोरेखित केले. मृत्यूनंतर आपल्या डोळ्यांच्या माध्यमातून जगात प्रकाश निर्माण करणे हे सर्वात मोठे मानवी कार्य असल्याचे यावेळी सांगण्यात आले. जिल्ह्यात नेत्रदानाबाबत जनजगृती वाढवण्याच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जात आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ ठोबरे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक (ACS) डॉ. अविनाश पुरी, निवासी वैद्यकीय अधिकारी (RMO-OR) डॉ. प्रसाद शिंदे, नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे, संदीप आंबेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पावसाअभावी पिके संकटात; शेतकरी विवंचनेत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम- मंगरूळनाथ विधान सभा मतदारसंघातील ग्रामीण भागात मागील सुमारे तीस दिवसांपासून पावसाने दांडी मारल्याने खरीप पिके संकटात सापडली व पूर्णपणे नष्ट झाली आहेत. विशेषतः सोयाबीन पिकाला सध्या पाण्याची अत्यंत आवश्यकता असताना पावसाचा खंड पडल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर सावरगाव बर्डे, तामसी व पंचाळा फाटा परिसरातील शेतांमध्ये आमदार श्याम खोडे व जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली.



पावसाअभावी सोयाबीन, तूर, उडीद, मुंग च्या पिकांची वाढ खुंटत असून अनेक ठिकाणी पिके सुकण्याच्या अवस्थेत आहेत. येत्या काही दिवसांत पाऊस झाला तरी पिकांना अपेक्षित वाढ व उत्पादन मिळणे कठीण असल्याचे शेतकऱ्यांनी पाहणीदरम्यान सांगितले. त्यामुळे सद्यस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून मतदारसंघातील परिस्थिती दुष्काळसदृश आहे का, याचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्याच्या दृष्टीने हा पाहणी दौरा करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या अडचणी, पिकांची सद्यस्थिती आणि संभाव्य उत्पादनातील घट याबाबत प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. शेतातील प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून त्याची नोंद घेण्यात आली. दरम्यान, पावसाचा दीर्घ खंड कायम राहिल्यास शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता लक्षात घेता, पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून शासनस्तरावर आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. पाहणी दौऱ्यात जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, आरिफ शहा, वैशाली देवकर व तहसीलदार निलेश पळसकर यांच्यासह भाजप शहराध्यक्ष मनीष मंत्री, विनोद पाटील जाधव , सुभाष नानवटे, दत्ताभाऊ गोटे, तालुकाध्यक्ष एकनाथ कडपाटील, मंगरूळपीर तालुका अध्यक्ष रवींद्र ठाकरे, जगदीश देशमुख , गोपाल परांडे ,पांडुरंग कोठाळे जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस गोपाल गोटे, दत्तराव गोटे, मोहन गोरे ,गजानन कव्हर, माधव कड ,माधव कव्हर ग्रामीण परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## गणेशपूर - पाचंबा परिसरातील शेतकऱ्यांचा पीक नुकसानीबाबत तहसीलदारांना निवेदन

■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील गणेशपुर(पाचंबा) परिसरात गेल्या ४० ते ४५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने मूग, उडीद व सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटून ती सुकून गेल्याने शेतकऱ्यांचे संपूर्ण नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

या पार्श्वभूमीवर गावातील शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन परिसरात तातडीने पंचनामे करून कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली. तसेच शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १ लाख रुपये तातडीची आर्थिक मदत, पीक विम्याची २५ टक्के आगाऊ रक्कम तत्काळ व उर्वरित नुकसानभरपाई देण्याचे निर्देश, तसेच वीज बिल व कृषी कर्ज माफ करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली.

शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट असून शासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेऊन



शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी सरपंच शोभा जाधव विष्णू जाधव सरपंच प्रतिनिधी विजय मुटकुळे विलास गलांडे नाजू शेगर दीपक भोपाळे बबनराव भोसले महादू भोपाळे भगवान शेगर सुरेश शेगर प्रल्हाद ओम कामखेडे भोसले प्रकाश अभिमान हिवाळे भोसले ओमप्रकास ताकतोडे सचिन भोपळे चोपडे सरकटे भोसले खंडागळे यांच्यासह गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेशोत्सवात चार सांस्कृतिक उपक्रम

**अकोला :** भारतीय संस्कृतीचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने संस्कृती संवर्धन समिती, अकोलाच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवात चार अभिनव उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सामूहिक अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. बुधवार दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता मानाचा प्रथम क्रमांकाचा गणपती असलेल्या जुन्या शहरातील जयहिंद चौक, सितला माता मंदिर येथे श्री बाराभाई गणेशोत्सव मंडळ येथे महिलांसाठी सामूहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यात जास्तीत जास्त मातृशक्ती आणि भाविकांनी सहभागी व्हावे.

## गणेशोत्सवात महाबीजचा सामाजिक बांधिलकी उपक्रम

**महाबीज मुख्यालयात रक्तदान शिबिर; अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**



■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज), अकोला मुख्यालयात गणेशोत्सवानिमित्त भक्तिमय वातावरणात श्रीगणरायाचे थाटात आगमन झाले.गणेशोत्सवाच्या आनंदाला सामाजिक बांधिलकीची जोड देत महाबीजच्या वतीने मंगळवारी रक्तदान शिबिर संपन्न झाले.गणरायाच्या आगमनाची सुरुवातच 'रक्तदानातून जीवनदान' या सामाजिक संकल्पनेने करण्यात आली.

महाबीज मुख्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या रक्तदान शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपली.धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आदर्श महाबीज परिवाराने दिला. रक्तदान करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. रक्तदान हे केवळ सामाजिक कार्य नसून गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरणारे कार्य असल्याने महाबीज परिवारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## जनता व नवरंग गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर

**मालेगांव :** मालेगांव येथील पांडे वेटाळ व तेली वेटाळ येथील ५६ वर्षांपासून - असलेला नवरंग गणेश मंडळ व जनता गणेश मंडळ मालेगांव येथे दिनांक १५ सप्टेंबर रोजी नवरंग व जनता गणेश मंडळ यांच्या तर्फे आयोजित भव्य - रक्तदान शिबिराला उत्स्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला असून ७७ रक्तदात्यांनी रक्तदान केले यामध्ये महिलांनीही सहभाग नोंदविला आहे तसेच आरोग्य शिबीर चे आयोजन करण्यात आले औषधी चे वाटप करण्यात आले मालेगांव येथील पांडे वेटाळ व तेली वेटाळ मधील ५६ वर्षे जुना असलेला नवरंग गणेश मंडळ जनता गणेश मंडळ मालेगांव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर दिनांक १५ सप्टेंबर रोजी पार पडला.

## जिल्ह्यातील युवा शेतकऱ्याची जागतिक व्यासपीठावर उपस्थिती!

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील शेगी चे निवासी प्रगतिशील युवा शेतकरी शिवानंदन राठोड यांची विदर्भातून प्रगतिशील शेतकरी म्हणून ड्रायलँड काँग्रेस २०२६ साठी झालेली निवड तालुक्यासह वाशीम जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

नवी दिल्ली येथे १० ते १२ सप्टेंबरदरम्यान झालेल्या ड्रायलंड कांग्रेस ०२६ मध्ये कोरडवाहू शेती, हवामान बदल, जलव्यवस्थापन आणि शाश्वत शेती यावर जगभरातील तज्ज्ञ, संशोधक, धोरणकर्ते आणि शेतकरी एकत्र आले. या काँग्रेसचे आयोजन ईक्रिसॅट आणि आयसीएआर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

वाशीमच्या मातीतला शेतकरी आवाज या आंतरराष्ट्रीय चर्चेत पोहोचणे ही जिल्ह्यासाठी विशेष



उपलब्धी मानली जात आहे.

राठोड यांनी आपल्या मांडणीत शेतीसोबत शिक्षण, कमी पाण्यात अधिक उत्पादन आणि उपलब्ध पाण्याचे शास्त्रीय नियोजन' या मुद्द्यांवर विशेष भर दिला. त्यांनी विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांना जागतिक पातळीवरील चर्चेशी जोडण्याचा प्रयत्न केला.

वाशीमसारख्या तुलनेने कोरडवाहू भागात मोठ्या नदीप्रणाली किंवा मोठे जलप्रकल्प नसतानाही जलसंवर्धन, जलव्यवस्थापन आणि पाण्याचे नियोजन यांच्या माध्यमातून शेती अधिक सक्षम करता येऊ शकते, हा महत्त्वाचा संदेश या निमित्ताने पुढे आला.

राठोड यांनी महाराष्ट्र शासन तसेच वाशीम जिल्ह्यातील कृषी विभागाच्या जमीनी पातळीवरील उपक्रमांचा उल्लेख करताना शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष सहभागातून उभे राहणारे कृषी व जलव्यवस्थापनाचे मॉडेल महत्त्वाचे असल्याचे सांगितले. तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनातून शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात राबविलेल्या विविध प्रयोगांकडे आंतरराष्ट्रीय कृषी संशोधन क्षेत्राचे लक्ष वेधले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. काँग्रेसदरम्यान राठोड यांनी विविध देशांतील संशोधक, वैज्ञानिक आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधला. त्यांच्या मते, या संवादातून विदर्भ आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष अनुभव आंतरराष्ट्रीय पातळीवर मांडण्याची संधी मिळाली. ड्रायलँड कॉंग्रेस मध्ये २५ पेक्षा अधिक देशांतील ८०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते.


## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३९०/२०२६ प्रोसेस नं.१०५२३/२०२६

चौ.ता. २८/०९/२०२६ दिनांक : १७/०८/२०२६

**अर्जदार :** १. विश्वेश्वर केशवराव सिकाटोल रा. हनुमान नगर, लहान उमरी, उमरी प्र, अकोला. ता. जि. अकोला. २. रामेश्वर केशवराव सिकाटोल रा. हनुमान नगर, छोटी उमरी, उमरी प्र, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** ज्ञानेश्वर केशवराव सिकाटोल रा. हनुमान नगर, लहान उमरी, उमरी प्र, अकोला. ता. जि. अकोला.

**मयताचा पत्ता :-** मयत : केशवराव बाबुलाल सिकाटोल

**पत्ता :-** रा. लहान उमरी, हनुमान नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत केशवराव बाबुलाल सिकाटोल यांचे दि. ०१/ ०३ / २०२१ रोजी लहान उमरी, हनुमाननगर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसंल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


## सोयाबीनच्या शाश्वत व अधिक उत्पादनासाठी सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब आवश्यक

**सोयाबीन प्रशिक्षण, शेतीदिन व प्रक्षेत्रभेटीतून शेतकऱ्यांना एकात्मिक पीक व्यवस्थापनाचे मार्गदर्शन**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने राष्ट्रीय खाद्यतेलबिया अभियान तसेच भारतीय कृषी तंत्रज्ञान अनुसंधान प्रसार संस्थान (ATARI), पुणे यांच्या सौजन्याने तेलबिया प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत सोयाबीन पीक 'फुले किमया' वाणाचा शेतीदिन व प्रक्षेत्रभेट कार्यक्रम मौजे किन्ही घोडमोड, ता. मालेगाव, जि. वाशिम येथे मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आर. एल. काळे, प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम होते. मार्गदर्शक म्हणून डॉ. एस. के. देशमुख, कृषी विस्तार तज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम; तुषार देशमुख, पीकशास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम तसेच डॉ. रामटेके उपस्थित होते. प्रमुख मान्यवरांमध्ये वाळुकर, मंडळ कृषी अधिकारी, कृषी विभाग, मालेगाव, अशोकराव देशमुख, शिरपूर, गणेश इरतकर, शिरपूर,



कांबळे, पोलीस पाटील तसेच प्रयोगशील शेतकरी पुरुषोत्तम घोडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात तुषार देशमुख, पीकशास्त्रज्ञ व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे प्रभारी यांनी सोयाबीनच्या सुधारित उत्पादन तंत्रज्ञानातील महत्त्वाच्या बाबींची माहिती दिली. यामध्ये प्रमाणित व दर्जेदार बियाण्यांचा वापर, वेळेवर बियाणे बदल, योग्य पीक नियोजन, संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, बीजप्रक्रिया, तण व्यवस्थापन, कीड व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन आणि उत्पादन खर्चाचे शास्त्रीय पद्धतीने लेखांकन यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी उत्पादनाबरोबरच निव्वळ नफा आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर याकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. एस. के. देशमुख, कृषी विस्तार तज्ञ यांनी शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठांमार्फत उपलब्ध करून दिलेले हवामान-सुसंगत, संसाधन-कार्यक्षम आणि वैज्ञानिक पीक उत्पादन तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा प्रत्यक्ष शेतावर अवलंब करावा, असे आवाहन केले. उत्पादनक्षमता वाढविण्यासोबतच शाश्वत शेती आणि देशाच्या खाद्यतेल स्वयंपूर्णतेसाठी शेतकऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित 'शेत-शिवार फेरी' कार्यक्रमात शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २९० ■ बुधवार, १६ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# सहाव्या दिवशी रायपूर जंगलीचा तिढा सुटला

## खा.अमर काळेंच्या आंदोलनाला यश, सहा दिवसांच्या संघर्षानंतर प्रशासन नरमले

### -विशेष मदतीसाठी शासनाकडे प्रस्ताव, -आज सकाळी ११ वाजता रायपूर येथे अंत्यसंस्कार

**वर्धा / सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील रायपूर जंगली येथे वाघाच्या हल्ल्यात भगवान चंद्रभान धुर्वे यांचा मृत्यू झाल्यानंतर गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाला अखेर यश आले. खासदार अमर काळे यांच्या नेतृत्वाखाली कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी घेतलेल्या ठाम भूमिकेपुढे प्रशासनाने सकारात्मक पावले उचलली. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत मृताच्या कुटुंबीयांच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांनंतर कुटुंबीयांनी अंत्यसंस्कार करण्यास सकारात्मक भूमिका घेतली असून सातव्या दिवशी बुधवारी सकाळी ११ वाजता भगवान धुर्वे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**२५ लाखांची मदत स्वीकारण्याचे आवाहन**

शासन निर्णयानुसार वनविभागाकडून देय असलेली २५ लाख रुपयांची मदत कुटुंबीयांनी स्वीकारावी अशी विनंती प्रशासनाने केली. आंदोलनकर्त्यांच्या मागणीनुसार आदिवासी विकास विभाग आणि वनविभागाकडून प्रत्येकी १० लाख रुपयांची विशेष मदत मिळावी यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. आदिवासी विभागाकडून आकस्मिक निधीतून ५० हजार रुपयांची मदत देण्याची कार्यवाही करण्याचेही सांगण्यात आले.



### कुटुंबातील एकाला वनमजुरी

भगवान धुर्वे यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला हंगामी वनमजूर म्हणून काम देण्यात येणार आहे. आदिवासी विकास विभागाच्या न्युक्लिअस योजनेतून बचत गटाच्या माध्यमातून ७.५ लाख रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे कुटुंबाला रोजगाराचे साधन उभे करण्यास मदत होणार आहे.

कुटुंब सध्या कच्च्या घरात राहत असल्याने त्यांच्या वास्तव्याच्या जागेची पडताळणी करून पट्टा देण्याची कार्यवाही केली जाणार आहे. निकषात जागा बसत नसल्यास शासन नियमानुसार जागा खरेदीसाठी अर्थसहाय्य करून घरकुल योजनेचा लाभ देण्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. नागपूर येथे शिक्षण घेत असलेल्या कुटुंबातील १७ वर्षीय मुलाला वसतिगृह, शिष्यवृत्ती आणि अन्य शैक्षणिक लाभ मिळवून देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने पाठपुरावा करण्याचे निर्देश देण्यात आले.

### वाघांच्या बंदोबस्तासाठी उपाययोजना

वाघांची वाढती संख्या लक्षात घेऊन वनविभागाने ठोस उपाययोजना कराव्यात. प्राथमिक प्रतिसाद पथक स्थापन करावे. सर्वेलन्स कॅमेऱ्यांची संख्या वाढवावी आणि नागरिकांमध्ये जनजागृती करावी, असे निर्देश देण्यात आले. शेतरस्त्याच्या दुतर्फा जाळ्या उभारण्याच्या मागणीवर पुढील आठवड्यात ग्रामस्थांसोबत गावपातळीवर बैठक घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा आढावा घेण्याचे ठरले. ग्रामसभेचा ठराव प्राप्त झाल्यानंतर रायपूर जंगलीच्या पुनर्वसनाचा सविस्तर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले. भविष्यात शासनाच्या मदत निधीत वाढ झाल्यास वाढीव रक्कम पूर्वलक्षी प्रभावाने धुर्वे कुटुंबाला मिळावी यासाठी प्रस्ताव पाठविण्याबाबतही चर्चा झाली.

### आंदोलनाने प्रशासनाला दिला इशारा

आंदोलनस्थळी बोलताना रोहित पवार यांनी हा लढा केवळ भगवान धुर्वे यांच्या कुटुंबाचा नसून वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांपासून शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण जनतेच्या सुरक्षेचा असल्याचे सांगितले. केवळ तोंडी आश्वासन न देता मागण्यांबाबत लिखित निर्णय देण्याची मागणी त्यांनी केली. खासदार अमर काळे यांच्या नेतृत्वाला विविध संघटना, पदाधिकारी, शेतकरी आणि सामान्य नागरिकांनी पाठिंबा दिल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेनंतर आंदोलनाला तात्पुरता विराम मिळाला असला तरी वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांपासून कायमस्वरूपी संरक्षण आणि धुर्वे कुटुंबाला प्रत्यक्ष मदत मिळेपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.

# महामार्गावर खड्डे की ठेकेदारांची बेफिकिरी ?

## नागपूर वर्धा मार्गावर डांबराऐवजी खड्ड्यांत माती, टोल वसुली जोरात पण रस्त्यांची डागडुजी मात्र कागदावरच

### वाहनचालकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा संताप



**सेलू जनमाध्यम :** नागपूर वर्धा महामार्गावरील सेलडोह मार्गावर रस्त्याच्या देखभालीच्या नावाखाली सुरू असलेली तात्पुरती मलमपट्टी आता वाहनचालकांच्या जीवावर उठण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रस्त्यावर पडलेल्या जीवघेण्या खड्ड्यांमध्ये डांबर किंवा सिमेंटचे टिकाऊ साहित्य वापरण्याऐवजी थेट माती टाकून खड्डे बुजविण्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे संबंधित कंत्राटदाराच्या कामाच्या दर्जावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नागपूर वर्धा महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांकडून टोलची वसुली मात्र नियमितपणे केली जाते. टोलचे पैसे घेताना रस्त्याची सुविधा आणि सुरक्षित प्रवासाची जबाबदारी कुणाची हा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. खड्डे बुजविण्यासाठी माती टाकणे म्हणजे पावसाळ्यात संकटाला निमंत्रण देण्यासारखे असल्याची संतप्त प्रतिक्रिया वाहनचालकांनी व्यक्त केली.

पावसाचे पाणी पडताच ही माती वाहून जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर खड्डे पुन्हा जैसे थे होणार आणि दुचाकीस्वारांसह वाहनचालकांना अपघाताचा धोका कायम राहणार आहे. शिवाय रस्त्यावर माती पसरल्याने घसरण्याचा धोका अधिक वाढला आहे.

रस्त्याची देखभाल करणाऱ्या दिलीप बिल्डकॉन कंपनीच्या निष्काळजी कारभाराबाबत नागरिकांमध्ये नाराजी आहे. तात्पुरती मलमपट्टी थांबवून सेलडोह परिसरातील खड्ड्यांची तातडीने दर्जेदार डांबरी पद्धतीने दुरुस्ती करावी. संबंधित कंपनीच्या कामाची गुणवत्ता तपासून दोष आढळल्यास कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# कॉटन मार्केटच्या विहिरीत मृतदेह; आत्महत्या की घातपात?

## अंगाला दोरी बांधल्याचे आढळल्याने संशय वाढला, शवविच्छेदन अहवालाकडे लक्ष

**आर्वी जनमाध्यम :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कॉटन मार्केट परिसरातील विहिरीत मंगळवारी सकाळी एका व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने शहरात खळबळ उडाली. शेख शब्बीर शेख अल्ताफ वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे असे मृत व्यक्तीचे नाव असल्याची प्राथमिक माहिती आहे.

मंगळवारी सकाळी काही नागरिकांना विहिरीत मृतदेह तरंगताना दिसला. त्यांनी तातडीने आर्वी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत स्थानिकांच्या मदतीने मृतदेह विहिरीबाहेर काढला.



दरम्यान मृत व्यक्तीच्या अंगाला दोरी बांधल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनास आले आहे. त्यामुळे या घटनेमागे आत्महत्या आहे की घातपात याबाबत संशय निर्माण झाला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय आर्वी येथे पाठविला आहे.

बाजार समितीसारख्या गजबजलेल्या परिसरातील विहिरीत मृतदेह आढळल्याने नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास आर्वी पोलीस करीत आहेत.

### राजेंद्र टोणपे यांचे निधन



**वर्धा :** मसाळा वैशाली नगर येथील रहिवासी सेवानिवृत्त मुख्याध्यापक राजेंद्र ऊर्फ गजानन भाऊरावजी टोणपे वय (६४) ,यांचे नागपूर येथील इस्पितळात उपचारादरम्यान मंगळवारी सायंकाळी सात वाजता दुःखद निधन झाले, त्यांच्या पश्चात पत्नी मुलगा, स्नूषा, मुलगी जावई, भाऊ, दोन बहिणी नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे आज बुधवार दि १६ सकाळी ९ वाजता त्यांचे रहाते घरुन अंत्ययात्रा वैकुंठ धाम येथे निघणार आहे.

# रांगोळीत साकारला गणराय, १९ तासांच्या तपश्चर्येतून भक्तीचे दर्शन

## केळझरच्या सिद्धिविनायक मंदिराच्या प्रवेशद्वारावरील कलाकृतीने भाविकांचे वेधले लक्ष

**केळझर जनमाध्यम :** गणेश चतुर्थीनिमित्त केळझर येथील सिद्धिविनायक गणपती मंदिराच्या प्रवेशद्वारावर सिंदी रेल्वे येथील युवा कलाकार प्रविण झिंगुजी नेवारे वय २६ यांनी रांगोळीच्या माध्यमातून हुबेहूब गणपतीची मूर्ती साकारली. तब्बल १९ तास अविरत मेहनत घेत प्रविण यांनी ही आकर्षक कलाकृती साकारली.



रांगोळीच्या रंगातून साकारलेला गणराय पाहताच मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या शेकडो भाविकांचे पाऊल क्षणभर थांबत होते. भक्ती भावना आणि कलाकौशल्याचा सुंदर संगम घडविणाऱ्या या रांगोळीने गणेशोत्सवाच्या उत्साहात आणखी भर घातली. कलाकार प्रविण नेवारे यांच्या या अनोख्या भक्तिमय कलेचे मंदिर समितीने कौतुक केले. मंदिराचे अध्यक्ष माधव ईरुटकर सचिव सुभाष तेलरांधे आणि पत्रकार भरत घवघवे यांनी गुलदस्ता देऊन प्रविण नेवारे यांचे स्वागत व अभिनंदन केले.

# राजनी फाट्यावर अपघातात हातमजुराचा मृत्यू

## ४६ वर्षीय प्रवीण मुसळे यांचा दुर्दैवी अंत, अपघाताचे गूढ कायम

**आष्टी शहीद जनमाध्यम :** कारंजा तालुक्यातील राजनी फाट्याजवळ सोमवारी रात्री सात ते साडेसात वाजताच्या सुमारास झालेल्या अपघातात प्रवीण बाबारावजी मुसळे वय ४६ रा आनंदवाडी ता आष्टी जि वर्धा यांचा मृत्यू झाला. मुसळे हे हातमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार प्रवीण मुसळे हे दुचाकीने प्रवास करीत असताना राजनी फाट्याजवळ अपघात झाला. मात्र अपघात नेमका कसा घडला याची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.



अपघातानंतर मुसळे काही काळ रस्त्याच्या परिसरात पडलेल्या अवस्थेत होते. सुमारे अर्धा ते एक तासाने मार्गावरून जाणाऱ्या नागरिकांच्या निदर्शनास ते आले.

नागरिकांनी तातडीने ?म्बुलन्स तसेच मुसळे यांच्या मुलाला घटनेची माहिती दिली. ?म्बुलन्स घटनास्थळी पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी तपासणी करून प्रवीण मुसळे यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच कारंजा पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी कारंजा येथील रुग्णालयात पाठविण्यात आला. घटनास्थळी मुसळे यांच्या दुचाकीचे इंडिकेटर तसेच काही भाग तुटलेल्या अवस्थेत आढळून आले. मात्र अन्य कोणतेही वाहन घटनास्थळी आढळले नाही.

मुसळे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसून आले. अपघातानंतर मृतदेह रस्त्याच्या कडेला कसा पोहोचला यासह अन्य वाहनाचा सहभाग होता का याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. कारंजा पोलीस घटनेचा तपास करीत असून तपासानंतर अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

# शिक्षकांच्या वेतनवाढीवर गदा; गुरूजींच्या हातावर काळी फीत

## १,०८६ शिक्षकांवरील कारवाईचा निषेध

### मुख्यालयी निवासासाठी आधी शासकीय घरे द्या

**वर्धा जनमाध्यम :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर आणि खुलताबाद तहसीलमधील मुख्यालयी वास्तव्यास नसलेल्या १,०८६ शिक्षकांची वेतनवाढ रोखण्याच्या कारवाईने शिक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या कारवाईच्या निषेधार्थ तसेच शिक्षकांसाठी प्रत्येक गावात शासकीय निवासस्थाने उपलब्ध करून दिल्यानंतरच मुख्यालयी राहण्याची अट लागू करावी या मागणीसाठी गंगापूर येथे शिक्षकांनी जोरदार मोर्चा काढला.

विविध शिक्षक संघटनांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या या मोर्चात तहसीलमधील १०० टक्के शिक्षकांनी सामूहिक रजा घेऊन सहभाग नोंदविला. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष विजय साळकर राज्य प्रवक्ते नितीन नवले सोलापूर जिल्हा शाखेचे माजी अध्यक्ष सुरेश पवार तसेच राज्य शाखेच्या कन्नड आघाडीचे प्रमुख बसवराज गुरव यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. शिक्षकांवरील कारवाईचा निषेध करण्यासोबतच राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांसाठी प्रत्येक गावात शासकीय निवासस्थाने उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. शिक्षकांना निवासाची शासकीय सुविधा उपलब्ध नसताना केवळ मुख्यालयी वास्तव्यास नसल्याच्या कारणावरून कारवाई करणे अन्यायकारक असल्याची भूमिका शिक्षक संघटनेने मांडली.

राज्य नेते उदय शिंदे राज्याध्यक्ष विजय कोंबे राज्य महासचिव राजन कोरगावकर राज्य उपाध्यक्ष आनंदा कांदळकर राजन सावंत विलास कंटेकुरे महिला आघाडीच्या प्रमुख वर्षा केनवडे तसेच जुनी पेन्शन आघाडीचे प्रमुख प्रफुल्ल पुंडकर यांच्यासह राज्य पदाधिकाऱ्यांनी मंगळवार १५ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून शासनाच्या कारवाईचा निषेध नोंदविला. शिक्षकांवर कारवाई करण्यापूर्वी त्यांच्या मूलभूत निवासाच्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने पाहावे आणि प्रत्येक गावात शासकीय निवासस्थाने उपलब्ध करून द्यावीत. त्यानंतरच मुख्यालयी राहण्याची अट लागू करावी अशी मागणी शिक्षक समितीने केली आहे.

# प्रलंबित मागण्यांसाठी आरोग्य कर्मचाऱ्यांचा दणका; सीईओंचे तातडीने निपटाऱ्याचे निर्देश

### आरोग्य यंत्रणेचा कणा रस्त्यावर

**वर्धा जनमाध्यम :** आरोग्य यंत्रणेचा कणा असलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवारी जिल्हा परिषदेच्या मिनी मंत्रालयासमोर आरोग्य कर्मचाऱ्यांनी जोरदार धरणे आंदोलन केले. सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चाललेल्या या आंदोलनामुळे जिल्हा परिषद परिसरात आरोग्य कर्मचाऱ्यांचा आवाज घुमला.

आरोग्य कर्मचारी संघटना कृती समितीच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनात नियमित आणि कंत्राटी आरोग्य कर्मचारी अंशकालीन महिला परिचर तसेच विविध आरोग्य कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी आणि



सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांना दिले. यावेळी प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. आपल्या स्तरावरील मागण्यांचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देश सोमण यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

आरोग्य कर्मचाऱ्यांना दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत नियमित वेतन मिळावे. जिल्ह्यातील १२ प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील रिक्त कनिष्ठ लिपिकांची पदे तातडीने भरावीत. ऑनलाइन कामकाजासाठी स्वतंत्र व्यवस्था आणि आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती द्यावी तसेच १० २० आणि ३० वर्षांची कालबद्ध पदोन्नती लागू करावी. या प्रमुख मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्ती आणि रोखीकरणाच्या बिलांचा भरणा करावा. ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ओपीडीचे प्रमाण अधिक आहे तेथे अतिरिक्त औषध निर्माण अधिकाऱ्याचे पद मंजूर करावे. आंजी आणि तळेगाव तालुका प्राथमिक आरोग्य केंद्रातील बदल्यांचे आदेश रद्द करावेत. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित लाभ १५ दिवसांत द्यावेत. अंशकालीन महिला परिचरांचे थकीत मानधन आणि गणवेश निधी अदा करून रिक्त पदे भरावीत अशी मागणी करण्यात आली.

आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचे दोन वर्षांपासून रखडलेले इन्सेंटिव्ह देण्याची मागणीही करण्यात आली. कंत्राटी आरोग्य सेविकांना वेतन स्लिप आणि गोपनीय अहवालाची प्रत उपलब्ध करून देण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना जिल्हा हिवताप हत्तीरोग कर्मचारी संघटना औषध निर्माण अधिकारी संघटना आयटक संलग्न अंशकालीन महिला परिचर संघटना आणि कंत्राटी नर्सेस युनियन या संघटनांनी आंदोलनात सहभाग घेतला.

आंदोलनाचे नेतृत्व दिलीप उटाणे सिद्धार्थ तेलतुंबडे बाबाराव कनेर चंद्रकांत मुटकुळे देवेंद्र थेटे हेमंत उघडे शैलेश मिश्रा वंदना उईके अर्चना सहारे संगीता रेवडे दीपक घाबर्डे पंकज आगलावे आदींनी केले.


**जिल्हा परिषद, वर्धा**

**बांधकाम विभाग, प्रशासकीय ईमारत, सिव्हिल लाईन, वर्धा**

**ई-मेल-eezpworkswardha@gmail.com दुरध्वनी क्र.०७१५२-२४२६१८**

**ई-निविदा सुचना क्र.१२ सन २०२६-२७**

बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वर्धा यांचेमार्फत तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम - २५१५-२५२१/३१ लेखाशिर्षाअंतर्गत श्री गोविंदप्रभू देवस्थान, भिष्णूर ता. आष्टी जि. वर्धा या तिर्थक्षेत्राच्या विकास आराखडयातील कामे कार्यान्वित करण्याकरीता ई-निविदा सुचना क्रमांक १२ सन-२०२६-२७ या निविदेतील अटि व शर्तीची पुर्तता करणारे नोंदणीकृत पात्र कंत्राटदार यांचेकडून स्पर्धात्मक निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदा कागदपत्र व ई-निविदाची सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथे उपलब्ध असून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा भरावयास उपलब्ध कालावधी दिनांक ०९/०९/२०२६ दुपारी १२.०० ते दिनांक ०५/१०/२०२६ सायं. ०५.०० पर्यंत राहील. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल असल्यास वरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

जा.क्र./ई-निसु-१२/जिपबां/निलि-६३६/२०२६-२७ दिनांक १५/०९/२०२६

**स्वा/-**

**कार्यकारी अभियंता,**

**बांधकाम विभाग, जि.प.वर्धा**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# एमपीएससीवरील विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी तुकाराम मुंढेंसारख्या अधिका-यांची गरज-आ.पवार




## कृषी सेवा परीक्षेतील आक्षेपांवर रोहित पवारांची भूमिका

**नागपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कृषी सेवा परीक्षेतील कथित पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचा परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास ढासळला आहे. त्यामुळे आयोगाच्या अध्यक्षपदी राजकीय जवळीक असलेल्या व्यक्तीऐवजी तुकाराम मुंढेंसारख्या सक्षम अधिका-यांची नियुक्ती करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी केली. रोहित पवार आज नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. एमपीएससीचा पेपर फुटेल, असे कधी वाटले नव्हते. मात्र, पेपरफुटीची घटना घडल्यानंतर विद्यार्थ्यांचा तसेच सर्वसामान्यांचा परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास राहिलेला नाही, असे पवार म्हणाले. आयोगाच्या अध्यक्षपदी एखाद्या राज्यकर्त्याचा मित्र आहे म्हणून त्याची नियुक्ती करण्यापेक्षा तुकाराम मुंढे यांच्यासारख्या चांगल्या आणि सक्षम अधिका-यांना जबाबदारी दिल्यास परीक्षा यंत्रणेवरील विश्वास पुन्हा निर्माण होण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले. परीक्षा प्रक्रियेवरील विद्यार्थ्यांचा विश्वासच राहिला नसल्याने यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांवरही विद्यार्थी आक्षेप घेतील, अशी शक्यता रोहित पवार यांनी व्यक्त केली. परीक्षा पारदर्शकपणे होत असल्याची खात्री विद्यार्थ्यांना पटवून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी**

एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी ही विद्यार्थ्यांच्या आंदोलनातील प्रमुख मागणी होती. मात्र, मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या चर्चेत या मागणीचा समावेश झाला नसल्याने विद्यार्थी शांत बसणार नाहीत, असा दावा पवार यांनी केला. मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतक-यांना हेक्टरी ५० हजार आणि शेतीमजुरांना कुटुंबामागे २५ हजार रुपयांची मदत जाहीर करण्याची अपेक्षा असल्याचे पवार यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा शुल्कात सवलत न देता अकादमीच्या शुल्कातही सवलत देणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.कर्जमाफी अर्धवट देउन शेतक-यांची फसवणूक केल्याप्रमाणे यावेळी मदत देउ नये. कोणत्याही अटी न लावता मदत जाहीर करावी, अशी मागणीही त्यांनी केली. आतापर्यंत १२ लाख शेतक-यांना १० हजार कोटी रुपये मिळाले असून, आणखी ४३ लाख शेतक-यांचे २५ हजार कोटी रुपये देणे बाकी असल्याचा दावा त्यांनी केला.

सरकार संवाद साधण्यात कमी पडतेय- मनोज जरांगे यांच्या मुंबई दौ-याबाबतही पवार यांनी भूमिका मांडली. सरकारकडून ज्या पद्धतीने चर्चा व्हायला हवी होती, तशी चर्चा झाली नाही. कोणीही आंदोलनाला बसले तरी सरकार संवाद साधण्यात कुठेतरी कमी पडत आहे, अशी टीका त्यांनी केली. जरांगे पाटील हे राजकीय पक्षाचे नसून सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यामुळे ते कोणत्याही राजकीय पक्षाचे ऐकतील असे वाटत नाही. मात्र, मुंबईत सणासुदीचा काळ असल्याने कोणत्याही व्यक्तीला त्रास होउ नये, अशी अपेक्षा आहे. मागील आंदोलनावेळी हाटेल, पाणी आणि स्वच्छतागृहांच्या सुविधांचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे सरकार आणि जरांगे पाटील यांनी चर्चेतून याचा विचार करावा, असे आवाहन पवार यांनी केले.

## कर्जमाफी नव्हेतर कर्जवसुली योजना

### आमदार रोहित पवार म्हणतात, आमदार-खासदार फोडण्याच्या राजकीय दहिहंडीत सरकार व्यस्त

**अकोला :** दुष्काळी परिस्थितीमुळे सोयाबीन, तूर, कापूस उत्पादक शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले. शेजारच्या कर्नाटक राज्यात महिन्याभरापूर्वीच दुष्काळ जाहीर झाला. आपल्या राज्यात मात्र सरकारने शेतक-यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. अहंकारी सरकारला शेतक-यांना मदत देण्यासाठी भाग पाडू. राज्यातील सत्ताधारी इतर पक्षांचे आमदार-खासदार फोडण्याच्या राजकीय दहिहंडीतच व्यस्त आहेत, अशी खरमरीत टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आ. रोहित पवार यांनी आज केली. वाशीम जिल्ह्यातील कारंजा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने आयोजित शेतक-यांच्या विविध मागण्यांसाठी आयोजित शेतकरी आक्रोश मोर्चात सहभागी होत त्यांनी शेतक-यांशी संवाद साधला. यावेळी माजी आ. सुनील भुसारा, सलील देशमुख, युवा नेते अँड. ज्ञायक पाटणी, रविकांत वरपे, पंकज बोराडे, अरविंद इंगोले, ज्योती गणेशपुरे, बाबाराव खडसे, अमित खडसे आदींसह स्थानिक पदाधिकारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आमदार-खासदारांची बोली; निधी विकासासाठी की खाण्यासाठी?**

पुढे ते म्हणाले, सत्ताधा-यांकडून आमदार-खासदारांची बोली लावली जात आहे. तुमच्या खासदारांची किंमत ७० ते ८० कोटींची लावली. २०० ते ३०० कोटींची कामे देउ, त्यातून ३० टक्के कमिशन खा, असे सांगितले गेले. निधी कशासाठी दिला जातो? विकास कामांसाठी की खाण्यासाठी? यांच्या खाण्यामुळे तर समस्या निर्माण झाली आहे. सरकार व काही रील्स स्टार अधिकारी शेतक-यांना विसरून गेले आहेत.

**कर्जमाफी नव्हे कर्जवसुली-** शेतक-यांच्या आंदोलनानंतर कर्जमाफीचा शासन निर्णय सरकारने काढला. मात्र, तो वाचल्यावर त्यात घातलेल्या अटी पाहून डोक्यावर हात मारावा लागला. कोणी शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरूच नये, अशा अटी शासनाने घातल्या आहेत. कर्जमाफी नव्हे तर कर्जवसुलीची ही योजना आहे, असा आरोप आ. पवार यांनी केला.

**हेक्टरी ५० हजार मदत द्यावी-** आतापर्यंत पंचनामे पूर्ण होउन शेतक-यांना मदत दिली गेली पाहिजे होती. पावसाने पाठ फिरवल्याने सोयाबीन, तूर, कापूस यांसह इतर सर्व पिके उद्ध्वस्त झाली आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतक-यांना हेक्टरी ५० हजार मदत द्यावी. शेतमजूर कुटुंबांना प्रत्येकी २५ हजार मदत देण्याची आमची मागणी आहे. जनावरांसाठी चारा छावण्या, पिकविम्याची तातडीने नुकसान भरपाई द्यावी, अशी भूमिका आ. पवार यांनी मांडली. मोर्चामध्ये शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## 'यासाठी कोणालाही जबाबदार धरू नका

# शिक्षण संस्थाचालकाने डोक्यात गोळी झाडून केली आत्महत्या

**लातुर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील पद्मानगर भागातील राहत्या घरात शिक्षण संस्थाचालक संजीव चंद्रभानू सोनवणे यांनी स्वतःच्या रिव्हाल्व्हरने डोक्यात गोळी झाडून घेत आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी (१५ सप्टेंबर) सकाळी उघडकीस आली असून, याबाबत एमआयडीसी पोलिसांत नोंद झाली आहे.पोलिसांनी सांगितले, संजीव सोनवणे (वय ६७) यांनी आपल्या राहत्या घरी सोमवार ते मंगळवार पहाटेदरम्यान टोकाचे पाउल उचलले. घटनास्थळी उपाधीक्षक समीरसिंह साळवे, पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्यासह पोलीस पथकाने पाहणी केली. ठसे तज्ज्ञ पथक, फारेन्सिक व्हॅनला पाचारण



करण्यात आले होते. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात मंजू चंद्रभानू सोनवणे (वय ५५) यांनी दिलेल्या माहितीवरून नोंद केली असून, सहायक पोलीस निरीक्षक पाटील तपास करत आहेत.

**मुंबईवरून बहीण आली अन् घटना उघड झाली-** मुंबईवरून सकाळी संजीव सोनवणे यांची बहीण लातुरातील घरी आली. त्यांनी घराला बाहेरून लावलेले कुलूप काढायला लावले. त्यावेळी संजीव सोनवणे यांचा मृतदेह घरात आढळला. घरी एकटेच असणा-या सोनवणे यांना रात्रीचे जेवण दिल्यानंतर शेजारच्या व्यक्तीने सोनवणे यांच्या सांगण्यावरून बाहेरून कुलूप लावले होते, असे पोलिसांनी सांगितले.

**अमेरिकेतून कुटुंबीय परतल्यावर अंत्यविधी-** संजीव सोनवणे यांचा मुलगा सध्या अमेरिकेतील कॅलिफोर्नियात वास्तव्याला असल्याने कुटुंबीय परतल्यानंतरच अंत्यविधी केला जाणार असल्याचे वैद्यकीय महाविद्यालयातून सांगण्यात आले. १७ सप्टेंबरपर्यंत शवागृहात पार्थिव ठेवून कुटुंबीयांची प्रतिक्षा केली जाणार आहे. दरम्यान, ही घटना कळल्यानंतर निकटवर्तीयांना मोठा धक्का बसला आहे. संजीव सोनवणे यांच्या सुसाईड नोटमुळे आत्महत्येच्या कारणमीमांसेला पूर्णविराम मिळाल्याचे तपास अधिकारी म्हणाले.

**शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान-** संजीव सोनवणे यांनी श्री चंद्रभानू सोनवणे महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात योगदान दिले होते. नामांकित महाविद्यालयाप्रमाणे अल्पावधीत त्यांच्या महाविद्यालयाने निकालाचा उच्चांक गाठला होता. वैद्यकीय, अभियांत्रिकी प्रवेश पूर्वपरीक्षांसाठी विशेष वर्ग आणि त्याच्या निकालासाठी महाविद्यालयाने लौकिक मिळविला होता. अशा स्थितीत एकटेपणामध्ये त्यांनी स्वतःला संपविल्याची बातमी ऐकून अनेकांनी शोक व्यक्त केला.

**सुसाईड नोट लिहिली अन् स्वतःला संपवले-** मी माझ्या स्वत?च्या जबाबदारीने गोळी झाडून घेत आहे. यासाठी कुणालाही दोषी ठरवू नये. याची चौकशीही करु नये, अशा आशयाची सुसाईड नोट घटनास्थळी आढळून आली आहे. प्रथमदर्शनी त्यांनी स्वतः डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याचे स्पष्ट दिसत आहे. कुटुंबीय अमेरिकेत आहेत. ते घरात एकटेच होते, अशी माहिती लातूरचे डीवायएसपी समीरसिंह साळवे यांनी दिली.

## आणखी 15 दिवस पावसाची शक्यता धूसर!

**नागपूर /प्रतिनिधी-** राज्यभरात बळीराजा पावसाच्या प्रतिक्षेत आहे. मात्र, पुढची १५ दिवस विदर्भात मान्सूनच्या पावसाची शक्यता नसल्याने शेतक-यांनी मान्सूनच्या पावसाची वाट न पाहता सिंचनाच्या पर्यायी उपाययोजनेवर लक्ष केंद्रित करावे, असा सल्ला नागपूर वेधशाळेने दिला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला की, विदर्भात मान्सूनचा पाउस कोसळतो. मात्र, सध्या पुढील काही दिवस बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची



शक्यता दिसत नसल्याची माहिती नागपूर वेधशाळेचे वैज्ञानिक प्रवीण कुमार यांनी दिली.सध्या अल निनोचा प्रभाव कायम असून सप्टेंबर महिन्यातही सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद होण्याची शक्यता आहे. स्थानिक वातावरणीय परिस्थितीमुळे छोट्या छोट्या भागात पाउस पडेल. पण मान्सूनच्या सक्रिय पावसाची सध्या २ आठवडे शक्यता नसल्याचे प्रवीण कुमार यांनी सांगितले. पुढच्या काही दिवसांमध्ये पावसाची खूप कमी शक्यता आहे. कारण पुढील काही दिवस बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता दिसत नाही. पुढील ४ ते ५ दिवस पावसाची खूप कमी शक्यता आहे. त्यातच पुढचे १५ दिवस पावसाची शक्यता नसल्याने आता शेतक-यांनी पर्यायी मार्गांचा वापर केला पाहिजे. अल निनो आता मोठ्या प्रमाणावर सक्रिय झालेला आहे, असे प्रवीण कुमार यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत मराठवाडा, विदर्भासह राज्यभरात दुष्काळसदृश परिस्थिती आहे. अल निनोच्या पार्श्वभूमीवर सप्टेंबरदेखील कोरडा जाण्याचा जागतिक हवामान संस्थेने गेल्या महिन्यात दिलेला अंदाज पूर्णतः खरा ठरला आहे. यामुळे संपूर्ण हंगाम वाया गेला असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. परिस्थिती दिवसेंदिवस भयाण होत जाणार आहे. त्यामुळे सरकारने दुष्काळ घोषित करून हेक्टरी किमान ५० हजार आणि शेतमजुरांना किमान २५ हजाराची मदत घोषित करावी, अशी मागणी केली.

## ५ ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे पंचनामे, टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची तयारी सुरू; मुख्यमंत्र्यांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी ::** राज्यात मोसमी पावसाच्या खंडामुळे खरीप हंगाम धोक्यात आल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५ ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे तातडीने पंचनामे सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. अधिकृत पंचनामे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होणार असले तरीही टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी होईल.राज्यात मोसमी पावसाने ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात ओढ दिल्यामुळे राज्यभरातील खरीप हंगाम अडचणीत आला असून, लोकप्रतिनिधींकडून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्यावर मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रीय आपत्ती निधीच्या (एनडीआरएफ) निकषांनुसार दुष्काळी स्थितीचे पंचनामे पाच ऑक्टोबरपासून सुरू करण्याच्या सूचना दिल्या.



ग्रामीण भागातील सर्वच मंत्र्यांनी पावसाअभावी खरीप हंगामाची स्थिती अत्यंत नाजूक आहे. महिनाभरापासून पावसाने दडी मारल्यामुळे पिके करपली आहेत. कमी दिवसांत येणारी मूग, मटकी, चवळी सारखी कडधान्य पिके वाया गेली आहेत. सिंचनाची सोय नसलेल्या ठिकाणी पिकांची काढणी करून काही हाती लागेल, अशी स्थिती नाही. उस पिकाची वाढ खुंटली आहे. उसाच्या नव्या लागणी पाण्याअभावी अडचणीत आल्या आहेत.यंदाच्या मोसमी पावसाच्या हंगामात जूनमध्ये पाउस सक्रीय झाला नव्हता. जुलैमध्ये चांगला पाउस पडल्यामुळे पेरण्यांनी सरासरी गाठली. धरणे भरली. पण, ऑगस्टपासून सप्टेंबरमध्यापर्यंत पावसाने मोठी ओढ दिली आहे. एकूण २० जिल्ह्यांतील ८६ तालुक्यांत ३० दिवसांपर्यंत पावसाचा खंड पडला आहे. उत्तर महाराष्ट्रात ३१, पश्चिम महाराष्ट्रात १७, मराठवाड्यात १६, विदर्भात २२, असा एकूण ८६ तालुक्यांत पावसाचा खंड पडला आहे. आहिल्यानगरमधील कर्जत आणि पुण्यातील शिरूरमध्ये ४३ दिवसांहून जास्त खंड पडला आहे, तर खामगाव (बुलढाणा), संगमनेर (आहिल्यानगर), परांडा (धाराशिव), देवळाली, कळवण (नाशिक), इंदापूर (पुणे), फलटण (सातारा) आणि माळशिरस (सोलापूर) येथे ४० दिवस खंड पडला आहे. ३० दिवसांहून जास्त खंड पडलेले तालुके २७ असून, २५ ते ३० दिवस खंड पडलेले तालुके २६ आहेत.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे सोमवारपासून मराठवाड्यातील दुष्काळी स्थितीची पाहणी करणार आहेत. अकोला, वाशिम, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांत पहिल्या टप्प्यात पाहणी करतील. दुस-या टप्प्यात अहिल्यानगर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत पाहणी करणार आहेत. पावसाअभावी खरीप पिके अडचणीत आली आहेत. शेतकरी हवालदील झाला आहे. यंदा कोकणापासून - विदर्भापर्यंत सर्वच विभागांत पिके करपू लागली आहेत. पावसाने जास्त ओढ दिलेल्या ठिकाणी खरीप पिकांसह, फळबागांची पाहणी करणार आहेत, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

राज्यात पावसाचा मोठा खंड पडला आहे. अनेक ठिकाणी महिनाभर पाउस पडला नाही. टंचाई निवारणाच्या उपाययोजना तातडीने सुरू केल्या जातील. एनडीआरएफच्या निकषांनुसार पाच ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे पंचनामे सुरू होतील. शेतक-यांना वा-यावर सोडणार नाही. अडचणीच्या काळात शेतक-यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

## पंजाबचा दौरा झाला, आता गुजरातची वेळ

**मुंबई/प्रतिनिधी :** कॉकरोच जनता पार्टी आणि त्याचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी ग्रामीण भागात असलेल्या सरकारी शाळांमधील दुरवस्था दाखविण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे. महाराष्ट्रासह अन्य राज्यातही मोहिम राबवण्यात आली आहे. ही मोहिम पंजाब, कर्नाटकातही



राबवण्यात आली आहे. आता शाळांबाबतची ही मोहिम गुजरातमध्येह राबवण्यात येणार असल्याचे संकेत अभिजीत दिपके यांनी दिले आहेत. 'ज्या राज्यांबाबत आमच्यावर प्रश्न उपस्थित केले जात होते त्या राज्यांमध्ये आम्ही गेलो आहे. पण आश्चर्य वाटते की, कोणीही गुजरातला भेट देण्यास सांगत नाही, असे विधान अभिजीत दिपके यांनी केले आहे. दीपके म्हणाले, ''तुम्ही पंजाबला का जात नाही?' आम्ही गेलो. 'तुम्ही झारखंडला का जात नाही?' आम्ही गेलो. 'तुम्ही कर्नाटकला का जात नाही?' आम्ही गेलो. अद्याप कोणीही गुजरातबद्दल विचारत नाही हे आश्चर्यकारक आहे.' या विधानामुळे आता काकरोच जनता पार्टी गुजरातमधील सरकारी शाळांची पाहणी करु शकते, असे बोलले जात आहे.दीपके आणि त्यांच्या टीमने यापूर्वी महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि दिल्ली यांसारख्या भाजपशासित राज्यांमध्ये 'स्कूल ठिक करो' मोहीम राबवली होती. पंजाब आणि विरोधी पक्षांच्या इतर राज्यांमध्ये त्यांनी कमी दौरे केल्याबद्दल सोशल मीडियावर टीका झाल्यानंतर, त्यांनी या तीन राज्यांमधील काही शाळांना भेट दिली. सीजेपीच्या पंजाबमधील व्हिडिओबद्दल आणखी प्रश्न निर्माण झाले, यामध्ये 'आप' सरकारच्या एका शाळेचे कौतुक केलेल्या एका माडेल स्कूलचा समावेश होता. भाजपशासित राज्यांमधील मोडकळीस आलेल्या शाळा दाखवून, पंजाबमध्ये केवळ दोन वर्षांपूर्वी बांधलेल्या शाळेचचे कौतुक केल्याबद्दल सीजेपीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.

## मीटरचे वाचन मिळत नाही किंवा मीटर नादुरुस्त?

## महावितरण आता थेट स्मार्ट मीटर बसवणार

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर : मीटरचे वाचन मिळत नसल्याने सरासरी वीजबिल येते किंवा नादुरुस्त मीटरमुळे चुकीचे बिल आकारले जाते? अशा ग्राहकांचे जुने मीटर तातडीने बदलून त्या जागी अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसविण्याचे निर्देश महावितरणने दिले आहेत. ग्राहकांना



त्यांनी प्रत्यक्ष वापरलेल्या विजेचेच अचूक बिल मिळाले पाहिजे, असे महावितरणचे संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी यांनी स्पष्ट केले.

**कोणते मीटर बदलण्यात येणार?**

ज्या मीटरचे वाचन मिळत नाही किंवा जे मीटर नादुरुस्त आहेत, ते तातडीने बदलले जाणार आहेत. त्यांच्या जागी स्मार्ट मीटर बसविण्यात येतील. जुन्या बिगरस्मार्ट मीटरधारकांना दिल्या जाणा-या सरासरी आणि अनियमित बिलांचाही आढावा घेतला जाणार आहे.

**स्मार्ट मीटरविषयीच्या शंकांचे काय?**

स्मार्ट मीटरच्या अचूकतेविषयी ग्राहकांच्या मनातील शंका आणि गैरसमज दूर करण्याची जबाबदारी अधिका-यांना देण्यात आली आहे. त्यांनी ग्राहकांशी प्रत्यक्ष संवाद साधून मीटरचे कामकाज, वीजवापराची नोंद आणि देयकनिर्मितीविषयी जनजागृती करावी. ग्राहकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्याचे निर्देशही देण्यात आले.

**नवीन वीजजोडणीस विलंब झाल्यास काय?**

प्रलंबित वीजजोडण्या विनाविलंब द्याव्यात. महावितरणच्या मानक कार्यपद्धतीनुसार निर्धारित वेळेत ग्राहकांना जोडणी मिळाली पाहिजे. या कामात हयगय किंवा निष्काळजीपणा झाल्यास संबंधित अधिका-यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा गडकरी यांनी दिला.

**थकबाकीदारांवर कोणती कारवाई होणार?**

वीजबिल न भरणा-या थकबाकीदारांचा पुरवठा नियमानुसार खंडित केला जाईल. थकबाकीमुळे स्मार्ट मीटरद्वारे स्वयंचलितपणे पुरवठा खंडित झाल्यानंतरही बिल न भरणा-या ग्राहकांच्या ठिकाणी प्रत्यक्ष तपासणी होईल. अनधिकृत वीजवापर किंवा चोरी आढळल्यास कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

**वीजचोरीबाबत काय निर्देश आहेत?**

वीजचोरीविरोधातील विशेष शोधमोहीम तीव्र करण्यात येईल. वीजचोरीचे देयक मिळाल्यानंतरही भरणा न करणा-यांविरुद्ध पोलिसांत गुन्हे दाखल केले जातील. चालू आर्थिक वर्षाअखेर वीजहानी एकेरी आकड्यावर आणण्याचे उद्दिष्ट अभियंत्यांना देण्यात आले.

**बैठकीत आणखी कोणता आढावा घेतला?**

वीजबिल वसुली, लघुदाब गैरकृषी वीजविक्री, पीसी झिरो ग्राहकांची देयके, दहा किलोवॅटपेक्षा अधिक क्षमतेचे छतावरील सौर प्रकल्प, वीस अश्वशक्तीवरील कृषी ग्राहकांची थकबाकी, नादुरुस्त वितरण रोहित्रे आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०च्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. नागपुरातील विद्युत भवनमध्ये नागपूर व अमरावती परिमंडळांची ही बैठक झाली. बैठकीला मुख्य अभियंते मंगेश कोहाट, दिलीप दोडके, राजेश नाईक, अधीक्षक अभियंते स्वप्निल गोतमारे, अमित परांजपे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## आता कुठं जायचं, मुंबईला जायचं!;

# कडेकोट पोलिस बंदोबस्तात मनोज जरांगे अखेर मुंबईकडे रवाना

**वडीगोद्री (जि. जालना) :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील अखेर मोजक्या सहका-यांसह मुंबईकडे रवाना झाले आहेत. बुधवारी सकाळी आरोग्य तपासणी झाल्यानंतर त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि गावातील दोन मंदिरांत दर्शन घेउन तडक मुंबईच्या दिशेने प्रस्थान केले. उपोषणाचा १८ वा दिवस असताना जरांगे पाटील यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. त्यांचे हे ११ वे उपोषण असणार असून, मुंबईकडे जाण्याची त्यांची ही तिसरी वेळ आहे.

**६४८ पोलिसांचा तगडा फौजफाटा तैनात-** जरांगे पाटील यांच्या दौ-याच्या पार्श्वभूमीवर अंतरवाली सराटी ते शहागड मार्गावर कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**अधिकारी व कर्मचारी-** ३ उपविभागीय पोलिस अधिकारी, १० पोलिस निरीक्षक, ३० सहायक व उपनिरीक्षक, ३०० पोलिस अंमलदार, २६५ होमगार्ड आणि आरसीपीच्या दोन प्लाटून असा मिळून एकूण ६४८ जणांचा बंदोबस्त तैनात आहे.

**संवेदनशील नाकेबंदी-** अंतरवाली सराटी, वडीगोद्री, धुळे-सोलापूर महामार्गावरील डावा कालवा, वडीगोद्री टी-पाईंट उड्डाणपूल, राजस्थानी हाटेल, गहिनीनाथ नगर, महाकाळा, अंकुशनगर आणि पैठण फाटा (शहागड) या सर्व प्रमुख ठिकाणी पोलिसांचा कडक पहारा आहे.

**सुरक्षेत मोठी वाढ; दोन गाड्या, दोन रुग्णवाहिका-** जरांगे पाटील यांच्या



ताफ्यात एक डिफेंडर आणि एक फार्च्युनर अशा दोन गाड्यांसह दोन रुग्णवाहिका आहेत. जालना पोलिसांच्या दोन अंगरक्षकांव्यतिरिक्त आता छत्रपती संभाजीनगरच्या अतिरिक्त स्पेशल प्रोटेक्शन युनिटचे अंगरक्षक तैनात करून त्यांच्या सुरक्षेत मोठी वाढ करण्यात आली आहे.त्यांच्यासोबत श्रीराम कुरणकर, सरपंच पांडुरंग तारख, बद्रीनाथ तारख, स्वप्निल तारख, संजय कटारे, गंगाधर काळकुटे, किशोर बलांडे आणि गणेश काळे हे मोजके सहकारी आहेत.

**घोषणांनी दणाणला अंतरवाली परिसर-** जरांगे पाटील अंतरवालीतून निघताच उपस्थित हजारो समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली. आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं, आता कुठं जायचं? मुंबईला जायचं!, एक मराठा, लाख मराठा, आणि लढेंगे, जितेंगे अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

## कांदा ४ हजारांवर; लासलगावात दराचा नवा विक्रम

**लासलगाव :** दोन वर्षांपूर्वी चार हजार रुपयांचा टप्पा ओलांडलेला कांद्याचा दर पुन्हा एकदा चार हजारांपार गेला आहे. लासलगाव बाजार समितीत उन्हाळ कांद्याला सप्टेंबर महिन्यात ४३५१ रुपये प्रतिक्विंटलचा सरासरी दर मिळत आहे. बाजारातील हा दर शेतक-यांना समाधान देणारा असला तरी कांद्याच्या दराने तेजी पकडली आणि शेतक-यांच्या हातातील कांदा मात्र संपत आला, अशी विरोधाभासी परिस्थिती निर्माण झाली आहे.मात्र, ही तेजी शेतक-यांसाठी कितपत फायदेशीर ठरणार, हा प्रश्न आहे. हंगामाच्या सुरुवातीला दर कमी असल्याने अनेक शेतक-यांनी आर्थिक गरजेतून आणि कांदा खराब होण्याच्या भीतीने कमी दरातच कांदा विकून टाकला.आता दर वाढले असताना त्यांच्या शेतमालाचा मोठा हिस्सा बाजारात येउन गेलेला आहे. त्यातच यंदा बदलत्या हवामानाचा कांदा उत्पादनाला फटका बसला. पाउस, वातावरणातील बदल आणि त्याचा कांद्याच्या प्रतवारीवर झालेला परिणाम, यामुळे बाजारात चांगल्या प्रतीचा कांदा मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे दरवाढीची संधी निर्माण झाली असली तरी या तेजीच्या काळात विक्रीसाठी कांदा शिल्लक असलेल्या शेतक-यांची संख्या कमी आहे.यंदा बदलत्या हवामानाचाही कांदा उत्पादनावर परिणाम झाला. अवकाळी पाउस, ढगाळ वातावरण आणि तापमानातील चढ-उतारामुळे कांद्याची प्रत, टिकवणक्षमता आणि उत्पादनावर परिणाम झाल्याचे शेतक-यांचे म्हणणे आहे. त्यामुळे बाजारात चांगल्या प्रतीच्या कांद्याची आवक मर्यादित राहिल्याने दराला आधार मिळत आहे. दर वाढले, पण कांदा संपला; त्यामुळे यंदाची कांदा तेजी शेतक-यांच्या नुकसानीची भरपाई करणार की केवळ बाजारातील आकडा वाढवणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. कांद्याचा दर चार हजारांपार गेल्याने बाजारात तेजीचे चित्र दिसत असले, तरी सुरुवातीला कमी दरात विक्री केलेल्या शेतक-यांसाठी ही तेजी काहीशी हुकलेली संधी ठरत आहे. गेल्या वर्षी ११९२ रुपयांच्या सरासरी दराने कांदा विकावा लागलेल्या शेतक-यांना यंदाचा ४३५१ रुपयांचा दर दिलासा देणारा असला, तरी त्याचा प्रत्यक्ष फायदा घेण्यासाठी त्यांच्या हातात पुरेसा कांदा उरलेला नाही.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## भारताचा प्रभाव

**ब्रिक्स शिखर परिषदेमध्ये १४० परिच्छेदांच्या घोषणापत्रावर भारताने ११ सदस्य देशांची सामूहिक सहमती घडवून आणली. त्यासाठी भारताने वापरलेले कौशल्य प्रत्येक बहुराष्ट्रीय संघटनांच्या अध्यक्ष देशांना अनुकरणीय ठरणारे आहे. जागतीक बदलत्या सत्तासमतोलाला संस्थात्मक आकार देण्याचे प्रयत्न संथगतीने होत आहेत. संयुक्त राष्ट्रे, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांसारख्या संस्था आजही राजकीय-आर्थिक वास्तवाचे मोठे प्रतिबिंब आहेत. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेचे जागतिक अर्थव्यवस्थेतील वजन वाढले असले तरी जागतिक निर्णयप्रक्रियेत त्यांचा वाटा त्या प्रमाणात वाढलेला नाही. या विसंगतीतून ब्रिक्सला मिळालेला राजकीय अवकाश यंदाच्या शिखर परिषदेने विस्तारला.गेल्या २० वर्षांत जागतिक अर्थव्यवस्था सुमारे अडीच पटींनी वाढली असताना ब्रिक्स देशांचा एकत्रित जीडीपी सुमारे साडेचारपट वाढला. एवढी मोठी आर्थिक शक्ती एका व्यासपीठावर आणणे सोपे आहे; पण तिला एकाच भूमिकेवर शिक्कामोर्तब करायला लावणे अशक्यप्राय. पण, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि टीम मोदीने ही किमया साधली. याबाबत जगभरात भारताची प्रशंसा होत आहे. युद्धामुळे इराण आणि यूएईसारख्या ब्रिक्स सदस्यांच्या संबंधांत प्रचंड ताण आहे. रशिया-युक्रेन संघर्षाबाबतही सर्व सदस्यांची भूमिका समान नाही. चीन-भारत सीमाप्रश्न संपलेला नाही. अमेरिकेशी प्रत्येक सदस्याचे संबंध निराळे आहेत. अशा स्थितीत सर्वसंमतीने घोषणापत्र मंजूर करून घेतानाच कोणत्याही एका देशाला लक्ष्य करण्याऐवजी संघर्ष वाढविणाऱ्या कृती टाळण्याचे, कमाल संयम राखण्याचे आणि संवाद व मुत्सद्देगिरीच्या मार्गाने प्रश्न सोडविण्याचे सूत्र भारताने मांडले आणि त्याला सर्व सदस्यांनी मान्यता दिली. मतभेद मिटल्याचा आभास निर्माण करण्यापेक्षा, मतभेद असूनही सहमतीचा किमान पाया शोधणे, ही भारताची रणनीती यशस्वी ठरली.ब्रिक्स जागतिक अजेंडा ठरवणारा प्रभावशाली गट बनायचा असेल तर हेच सूत्र घेऊन मार्गक्रमण करावे लागेल. ब्रिक्सचे वर्णन पश्चिमविरोधी असे करणे सोपे असले तरी ते अपुरे आहे. कारण, रशिया आणि चीनला अमेरिकाकेंद्रित व्यवस्थेला उघड आव्हान देण्यात स्वारस्य असू शकते; पण भारताला अमेरिकेशी तंत्रज्ञान, गुंतवणूक, संरक्षण आणि व्यापाराचे संबंध वाढवायचे आहेत, युरोपशी भागीदारी मजबूत करायची आहे, ग्लोबल साऊथच्या प्रश्नांवर स्वतंत्र भूमिका मांडायची आहे आणि रशियाशीही दीर्घकालीन संबंध टिकवायचे आहेत. या पार्श्वभूमीवर, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेतील प्रतिनिधित्व, सुरक्षा परिषदेतील सुधारणा, जागतिक व्यापार संघटनेची मनमानी, हवामान, वित्तपुरवठा, विकसनशील देशांचे कर्ज, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ऊर्जा सुरक्षा या मुद्द्यांवर नव्या अर्थव्यवस्थांचा आवाज वाढविण्यासाठी ब्रिक्स उपयुक्त आहे. नवी दिल्ली घोषणापत्रात बहुपक्षीय व्यवस्थेच्या सुधारणेला दिलेले स्थान त्यादृष्टीने महत्त्वाचे ठरते. न्यू डेव्हलपमेंट बँक ही ब्रिक्सने निर्माण केलेली संस्था. जून २०२६ पर्यंत बँकेने १४१ प्रकल्पांसाठी सुमारे ४४ अब्ज डॉलरचा वित्तपुरवठा मंजूर केला आणि सुमारे २५ अब्ज डॉलर प्रत्यक्ष वितरित केले.भारतातील ३५ पायाभूत प्रकल्पांसाठी बँकेकडून सुमारे १०.५ अब्ज डॉलरची मंजुरी मिळाली असून, भारत बँकेच्या वित्तपुरवठ्यातील दुसऱ्या क्रमांकाचा लाभार्थी आहे. ब्रिक्सला खऱ्या अर्थाने वेगळी आर्थिक ओळख निर्माण करायची असेल तर या संस्थेची कर्जक्षमता, खासगी भांडवल खेचण्याची ताकद आणि स्थानिक चलनांत वित्तपुरवठा करण्याचे प्रमाण वाढवावे लागेल. भारताने सदस्यांच्या स्थानिक चलनांत व्यापार आणि गुंतवणूक व्यवहार वाढविणे, तसेच पेमेंट आणि मेसेजिंग यंत्रणांची परस्पर सुसंगतता तपासणे हा अधिक व्यवहार्य मार्ग असल्याचे निदर्शनास आणून दिले. रशियासोबतचा रुपयातील व्यापार आता इतर देशांसोबतही शक्य होणार आहे. यामुळे 'ब्रिक्स' सदस्य देशांचे अर्थकारण आणि जागतिक महत्त्वही वाढणार आहे. भारत हा बिगरपाश्चात्त्य देशांच्या हिताचा पुरस्कर्ता आहे; पण तो अमेरिका किंवा पाश्चात्त्य जगाचा शत्रू नाही. या समतोल भूमिकेमुळेच भारताची आंतरराष्ट्रीय पत वाढली आहे. जागतिक संघर्षाच्या काळात भारताकडे एक शांततादूत आणि मध्यस्थ म्हणून पाहिले जात आहे. ब्रिक्सच्या माध्यमातून भारतीय व्यापार क्षेत्रासाठी २१ देशांची विशाल बाजारपेठ खुली झाली आहे. युरोप, अमेरिकेच्या बाजारपेठांवरील पारंपरिक अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि तेथील जाचक अटींवर मात करण्यासाठी ब्रिक्स हे प्रभावी माध्यम ठरत आहे.जागतिक स्तरावरील संस्थांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी ब्रिक्सने दिलेली हाक समयोचित आहे. अमेरिकेच्या प्रभुत्वाखालील जागतिक संस्था जुन्या रचनेवर चालत आहेत. विसाव्या शतकातील संस्थांनी २१ व्या शतकातील आव्हानांचा सामना करणे अशक्य आहे, हे भारत सातत्याने सांगत आहे. सुरक्षा परिषदेत भारताला कायमस्वरूपी स्थान मिळणे ही काळाची गरज आहे. ब्रिक्सने या संस्थांमधील सुधारणांसाठी लावलेला जोर हा संपूर्ण 'ग्लोबल साऊथ'चा आवाज म्हणून महत्त्वाचा आहे. भारत आणि चीनच्या शीर्षस्थ नेत्यांमधील भेट दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल आहे. सीमेवर शांतता प्रस्थापित केल्याशिवाय इतर क्षेत्रांतील सहकार्य पूर्ण क्षमतेने होऊ शकत नाही, हा संदेश भारताने ठामपणे चीनला दिला. दुसरीकडे, रशियासोबतचे पारंपरिक आणि विश्वासार्ह मैत्रीचे संबंध अधिक दृढ करतानाच ऊर्जा सुरक्षा आणि संरक्षण क्षेत्रातील सहकार्याला गती दिली.अमेरिका, क्वाड आणि जी-७ देशांसोबतचे संबंध मजबूत ठेवतानाच रशिया, चीनचा समावेश असलेल्या ब्रिक्स आणि शांघाय सहकार्य संघटनेसारख्या मंचांवरही प्रभाव कायम ठेवणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणातील स्वायत्ततेचे मोठे निदर्शक आणि यश आहे. पुढील दशकात ब्रिक्सचा भारताला सर्वात मोठा फायदा व्यापारापेक्षा नेतृत्वाच्या अवकाशात मिळू शकतो. आफ्रिका, दक्षिण अमेरिका, पश्चिम आशिया आणि आग्नेय आशियातील अनेक देशांना अमेरिका आणि चीन यापैकी एक बाजू निवडायची नाहीये. त्यांना पायाभूत सुविधा, डिजिटल तंत्रज्ञान, स्वस्त वित्तपुरवठा आणि निर्णयप्रक्रियेत अधिक प्रतिनिधित्व हवे आहे. भारत यामध्ये मोठी भूमिका बजावू शकतो. विकास, वित्त, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, आरोग्य, औषधनिर्मिती, कृषितंत्रज्ञान आणि लघुउद्योग या क्षेत्रांत भारत स्वतःच्या विकासअनुभवाशी ब्रिक्सला जोडू शकतो. ब्रिक्स हे भारतापुढील जागतिक समस्यांचे अंतिम उत्तर निश्चितच नाही; मात्र अमेरिका-चीन यांच्यातील स्पर्धेने आखलेल्या जगात स्वतःसाठी तिसरी जागा निर्माण करण्याचे ते प्रभावी साधन ठरू शकते. दिल्ली परिषदेने त्या शक्यतेला बळ आणि आकार दिला आहे. ब्रिक्समध्ये भारत कशा प्रकारे मध्यवर्ती राहतो, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. भारत जागतिक नियमांना आकार देणारा सूत्रधार बनला आहे. आर्थिक विकास, तांत्रिक प्रगती, परराष्ट्र धोरणातील कौशल्य आणि मानवतावादी दृष्टिकोन यांच्या बळावर भारताने टाकलेले हे पाऊल भविष्यात अत्यंत निर्णायक ठरणार, यात शंका नाही.**

# जीडीपी वाढीभोवतीचे संशयधुके

**गेले काही दिवस देशाच्या जीडीपीच्या वाढीबद्दल उलटसुलट चर्चा सुरु आहेत. जीडीपी वाढ सशक्त दिसत असली तरी मापनपध्दतीतील अस्पष्टता, रोजगारअभाव, कमी खासगी गुंतवणूक, रुपयाचे अवमूल्यन आणि कमजोर बचत यांमुळे वाढीच्या विश्वासार्हतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात.**



'कोशमूलो हि राजेति प्रवादः सर्वलौकिकः' वरील संस्कृत सुभाषिताचा अर्थ असा आहे की, 'राजा किंवा राज्याचे अस्तित्व हे त्याच्या तिजोरीवर, म्हणजेच आर्थिक शक्तीवर, अवलंबून असते, हा जगप्रसिद्ध नियम आहे.' आता कोणत्याही देशाची आर्थिक शक्ती ही तो देश दर वर्षी स्वतःच्या भौगोलिक सीमेमध्ये किती प्रमाणात अंतिम वस्तू व सेवांचे उत्पादन करतो, यावर ठरविली जाते. यालाच सकल देशांतर्गत उत्पादन, म्हणजेच 'ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट' किंवा 'जीडीपी', असे म्हटले जाते. जीडीपीत दर वर्षी होणारी वाढ हे देशाच्या अर्थव्यवस्थेचे आरोग्य आणि विकास दर्शविणारे एक मुख्य मापक आहे.

३१ ऑगस्ट २०२६ रोजी भारताच्या सांख्यिकी मंत्रालयाने २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीसाठी जो जीडीपी डेटा प्रसिद्ध केला, त्यानुसार चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहीत, गेल्या वर्षीच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत, भारताच्या वास्तविक जीडीपीत ७.८ टक्के एवढी वाढ झाली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ७.० टक्के या अंदाजापेक्षा, तसेच बाजार-विश्लेषकांच्या ६.९ टक्के ते ७.१ टक्के या अंदाजापेक्षा प्रत्यक्षातील वाढ कितीतरी अधिक नोंदविली गेली.

खरे तर पहिल्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेपुढे कितीतरी गंभीर आव्हाने होती. पश्चिम आशियाई भागातील ताणतणाव, भडकलेल्या कच्च्या तेलाच्या किमती, पुरवठा-साखळीत निर्माण झालेले अडथळे, आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढती अनिश्चितता व त्याचा निर्यातीवर होऊ शकणारा विपरीत परिणाम, यावर्षीचा विलंबित पावसाळा व नंतर पडलेल्या पावसाचे विषम वितरण अशा अनेक समस्या होत्या. या समस्यांचा विचार करून, तसेच 'उच्च वारंवारता निर्देशांकां'नी पहिल्या तिमाहीचे जे चित्र दाखविले होते ते लक्षात घेऊन जसे की,खालावलेले उत्खनन, मंदावलेली वीज-निर्मिती, जीएसटी ई-वे बिल्समधील घट, आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढलेली तूट, रुपयाचे अवमूल्यन इत्यादी रिझर्व्ह बँकेने तसेच बाजार-विश्लेषकांनी पहिल्या तिमाहीतील आर्थिक वाढीविषयी सावधपणे अंदाज केले होते. त्यामुळेच पहिल्या तिमाहीसाठीच्या डेटामधून जेव्हा सणसणीत वाढलेला जीडीपी दिसून आला, तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. अनेकांनी संशयाची सुई रोखायला सुरुवात केली.

त्यात २०२६ या वर्षाच्या सुरुवातीलाच भारताने जीडीपी मोजण्याच्या पद्धतीत काही ठोस बदल केले आहेत; जसे की २०११-१२ या वर्षाऐवजी २०२२-२३ हे वर्ष आता आधारवर्ष म्हणून वापरण्यास सुरुवात केली आहे. तसेच या नवीन प्रणालीत किंमत-बदलातील जुळवणी स्वतंत्रपणे उत्पादनाच्या मूल्यमापनासाठी आणि कच्च्या मालाच्या खर्चासाठी केली गेली आहे. त्यासाठी नव्याने बनविण्यात आलेला 'उत्पादक किंमत निर्देशांक' वापरण्यात आला आहे, ज्यात अधिक मोठ्या संख्येने घटक उत्पादने समाविष्ट केली गेली आहेत.

मात्र यापूर्वी जेव्हा केव्हा सरकारने जीडीपी मापनाची प्रणाली बदलली होती, तेव्हा त्यासोबत संपूर्ण 'स्त्रोत आणि पद्धती' दस्तऐवज प्रसिद्ध केला होता; पण यावेळी तसे केलेले नाही. त्यामुळे जीडीपी मापनात केलेल्या सुधारणांचे बारकावे अभ्यासकांना समजून घेता आले नाहीत. यामुळे प्रणब सेन यांच्यासारखे तज्ज्ञदेखील, जे भारताचे पहिले प्रमुख सांख्यिकी अधिकारी होते, नाराज झाले आहेत. त्यांच्या मते, दोन दशकांहून अधिक काळ भारतातील सांख्यिकी तज्ज्ञांनी 'उत्पादक किंमत निर्देशांक' बनविण्यासाठी खर्च केला होता; पण उत्पादकांकडून कधीच हवा असलेला उत्पादक-किमतींचा डेटा मिळाला नव्हता. कारण ते उत्पादकांचे एक प्रकारे 'ट्रेड सीक्रेट' असते. तसेच उत्पादक उत्पादित वस्तू निरनिराळ्या वितरकांना निरनिराळ्या किमतींना विकत असतात. त्यामुळे त्या किमतींची सरासरी मिळणे गरजेचे असते. सेन यांच्या मते, ही सर्व माहिती कशी गोळा केली गेली आहे, यावर सरकारने प्रकाश टाकणे गरजेचे आहे. एकाएकी उत्पादक सहकार्य कसे करू लागले, असा प्रश्न ते उपस्थित करतात. तसेच जुने व नवे उत्पादक किंमत-विषयक निर्देशांक काही वर्षांसाठी एकत्रितपणे प्रकाशित केले पाहिजेत, जेणेकरून अभ्यासकांना त्यांच्यातील नेमका फरक समजून घेता येईल. कच्च्या मालसंबंधीची सांख्यिकीही प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. कच्च्या मालसंबंधीचा डेटा वापरता येण्यासाठी संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी 'पुरवठा व वापर तक्ता' उपलब्ध असणे गरजेचे असते. गेल्या काही वर्षांत हे कामदेखील थांबविण्यात आले आहे. असे अनेक महत्त्वाचे मुद्दे भारताचे पहिले प्रमुख सांख्यिकी अधिकारी प्रणब सेन यांनी मांडले आहेत.

भारताचे भूतपूर्व प्रमुख सरकारी अर्थतज्ज्ञ अरविंद सुब्रमण्यन यांनी हा प्रश्न 'विश्वासाच्या कमतरते'चा असल्याचे प्रतिपादन केले आहे. अनेक वर्षे जनगणना न होणे, अचानकपणे 'उपभोगासंबंधित सर्वेक्षण' मागे घेण्यात येणे, कोविड तसेच नोटाबंदीच्या काळातील आर्थिक परिस्थितीचे योग्य प्रकारे मूल्यमापन न होणे, विशेषतः अनौपचारिक क्षेत्रासाठी, अशी अनेक कारणे या 'विश्वासाच्या कमतरते'मागे असल्याचे ते अधोरेखित करतात.

आता नव्या पद्धतीने मोजण्यात आलेल्या प्रत्यक्ष जीडीपी सांख्यिकीकडे बघू. नव्या आधारवर्षाच्या संदर्भात, गेल्या वर्षीच्या तुलनेत भारताचा पहिल्या तिमाहीतील वास्तविक जीडीपी निश्चितच ७.८ टक्क्यांनी वाढलेला आहे. पहिल्या तिमाहीतील एकूण आर्थिक वाढ समाधानकारक होती, हे काही उच्च वारंवारता निर्देशांकांमधूनही दिसून आले आहे. उदाहरणार्थ, एकूण निर्यातीमधील वाढ १६.१ टक्के वार्षिक वाढ; बँकांच्या क्रेडिटमधील वाढ १८.१ टक्के वार्षिक वाढ; स्वयंचलित वाहनांच्या विक्रीतील वाढ २५.९ टक्के वार्षिक वाढ; टिकाऊ उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातील वाढ सुमारे ८.० टक्के वार्षिक वाढ इत्यादी. यातून एवढे तरी निश्चितपणे म्हणता येते की भारतीय अर्थव्यवस्थेतील काही क्षेत्रांची वाढ समाधानकारकपणे होत आहे आणि पहिल्या तिमाहीतील आर्थिक आव्हाने लक्षात घेता या क्षेत्रांची लवचिकता निश्चितपणे सुधारलेली आहे.

मग इतकी अस्वस्थता कशामुळे आहे? तर जीडीपी मापनाच्या नवीन पद्धतीमुळे गेल्या वर्षातील, म्हणजेच २०२५-२६ या वर्षातील पहिल्या तिमाहीचे जीडीपी, चालू किमतींत, ८६.०५ लाख कोटी रुपयांपासून ८०.०० लाख कोटी रुपयांपर्यंत, म्हणजेच ७.६ टक्क्यांनी, घसरले आहे. आता जेव्हा जेव्हा जीडीपी मापनाची प्रणाली बदलते, तेव्हा तेव्हा आधीच्या वर्षातील जीडीपीचे आकारमान कमी झालेले दिसते. पण यावेळीची घट लक्षणीय प्रमाणात असल्यामुळे, आधीच्या वर्षातील जीडीपी प्रत्यक्षापेक्षा कितीतरी अधिक दाखविले गेले होते, हा अभ्यासकांचा दावा खरा ठरला आहे. भारतात अजूनही अनौपचारिक क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या जीडीपीचे अचूकपणे मापन होत नाही, हे पुन्हा पुन्हा दिसून आले आहे.

दुसरा मुद्दा असा आहे की, विपरीत आर्थिक परिस्थितीतदेखील जर एखाद्या देशाचा जीडीपी इतका सकसपणे वाढत असेल, तर तेथील तरुणांमधील १५ ते २९ वयोगटातील बेरोजगारी १६.२ टक्के एवढी वाढलेली का आहे? अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या सर्वेक्षणानुसार, आज भारतातील २५ वर्षांपेक्षा कमी वय असलेले ४० टक्के पदवीधर बेरोजगार आहेत. तसेच जी काही गुंतवणूक आज भारतात होत आहे, तिचा प्रमुख हिस्सा केंद्र सरकारने पायाभूत सुविधांमध्ये केलेल्या गुंतवणुकीचा आहे. खासगी क्षेत्राची गुंतवणूक आजही गेल्या दहा वर्षांतील सर्वांत कमी पातळीवर आहे. निव्वळ थेट परदेशी गुंतवणूक चालू वर्षात दोन वेळा शून्याच्या खाली गेली होती. भारतीय रुपयाचे सातत्याने अवमूल्यन होत आहे, तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट सतत वाढत आहे. घरगुती क्षेत्राच्या बचतीचा दर कमालीचा खालावला आहे आणि 'कर्जे काढून सण साजरे करण्याची' प्रवृत्ती बळावली आहे. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात श्रीमंत लोक ज्या वस्तू विकत घेतात, त्यांचे उत्पादन व आयात वाढत आहे; पण सर्वसामान्य लोक ज्या वस्तू व सेवा वापरतात, त्यांची निर्मिती खालावलेली आहे. तसेच जर अर्थव्यवस्था एवढी जोमाने वाढत असेल, तर निव्वळ जीएसटीची वाढ केवळ पाच टक्के कशी?

यापूर्वीचा आर्थिक इतिहास पाहिला तर असे जाणवते की, जेव्हा जेव्हा भारतीय अर्थव्यवस्था सातत्याने दर वर्षी सुमारे ८ टक्के आर्थिक वाढ नोंदवत होती, तेव्हा इतर सर्व निर्देशांकदेखील जोमाने वाढत होते; जसे की निर्यात, खासगी क्षेत्राची गुंतवणूक, परदेशातून येणारे गुंतवणुकीचे ओघ, बँक क्रेडिट, घरगुती क्षेत्राचा बचत दर, रुपयाची आंतरराष्ट्रीय व्यापारातील ताकद, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा ताळेबंद, रोजगार-निर्मिती इत्यादी. मग अलीकडच्या वर्षांत ही तफावत नक्की कशामुळे दिसून येत आहे?

तसेच गेली काही वर्षे भारतीय अर्थव्यवस्था जर इतक्या जोमाने वाढत असेल, तर रिझर्व्ह बँक तसेच भारत सरकारवर अर्थव्यवस्थेस जोरदार प्रोत्साहन देण्याचा एवढा दबाव का आहे? महागाई वाढण्याचे इतके संकेत मिळत असतानादेखील रिझर्व्ह बँकेने व्याजदर लक्षणीयरीत्या घटविले आहेत, तसेच मोठ्या प्रमाणात पैसाकरणदेखील केले आहे. भारत सरकारनेदेखील प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष कर मोठ्या प्रमाणात कमी केले आहेत. तसेच अलीकडच्या काळात भारताचे परदेशी चलन जे वाढले आहे, त्याचा खूप मोठा भाग परदेशी लोकांच्या ठेवींचा आहे. या ठेवी देशासाठी कर्जच आहेत. अजून पाच वर्षांनी जेव्हा या ठेवींच्या मुद्दलासकटच्या परतफेडीची वेळ येईल, तेव्हा आपल्या देशासाठी खऱ्या परीक्षेचा काळ असेल.

अशा प्रकारचे संशयाचे वातावरण हे कोणत्याही प्रगतीच्या नेहमीच आड येते. वाईटाबरोबर चांगल्यावरही धुके जमत जाते. त्यामुळे या संदर्भात दोन गोष्टी सुचविण्यास आवडतील. एक तर सांख्यिकी मंत्रालयाने जीडीपी मापनाच्या नवीन प्रणालीचा 'स्त्रोत आणि पद्धती' हा दस्तऐवज अभ्यासकांसाठी तातडीने प्रकाशित केला पाहिजे. तसेच भारतीय धोरणकर्त्यांनी जीडीपीच्या उजव्या कामगिरीचा सकारात्मक परिणाम रोजगार-निर्मिती, खासगी गुंतवणूक व रुपयाची ताकद यांवर का होत नाही आहे, याच्या मूळाशी जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण उच्च जीडीपीचे रूपांतर सर्वांसाठीच्या अधिक चांगल्या जीवनमानामध्ये का होत नाही, हाच खरा कळीचा प्रश्न आहे.

**(साभार म.टा.संवाद)**

## गणेश चतुर्थीत लोककलांना स्थान द्या...

आजच्या आधुनिक युगात भारतीय संस्कृतीतील लोककला इतिहास जमा होत असल्याचे दिसून येते आहे.आजच्या घडीला लोककला जिवंत ठेवणे महत्वाचे आहे कारण समाज प्रबोधनासह मनोरंजन करणारी लोककला आजही श्रेष्ठ ठरत आहे.लोकांनी लोकांसाठी आणि लोकांच्या भाषेत निर्माण केलेली, मनोरंजनासोबतच प्रबोधन करणारी कला म्हणजे लोककला आहे प्राचीन काळापासून समृद्ध लोककला परंपरा आहे, जी ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. या कलेतून अनेक कलाकार निर्माण होवू शकतात त्यासाठी गणेश महोत्सवामध्ये लोककलाकारांना त्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव देण्यासाठी गणेश मंडळानी पुढाकार घेऊन व्यासपीठ निर्माण करुन दिले पाहिजे. त्यामुळे गण, काकड आरती, जात्यावरील ओव्या, वासुदेव, पिंगळा, हेळवी, बहुरुपी, कडकलक्ष्मी, धनगरी ओव्या, पोतराज, नंदिबैलं, कोळीनृत्य, शायरी, गोंधळ, वाघ्यामुरळी, कीर्तन, भजन, गवळण, तमाशा, पोवाडा, बेंजो, बँड, लेझीम, ढोलपथक, हालगी, आणि लावणी यासारख्या लोककलांना स्थान मिळाल्यामुळे समाज प्रबोधनासह मनोरंजन होवून अनेकांना रोजगार मिळेल.

**राजू जाधव**

## स्त्रियांची शोकांतिका?

आजच्या या आधुनिक युगात स्त्रिया शिकल्या, नोकरीवर जायला लागल्या, सोबतच घर सुद्धा सांभाळत असताना, आजही पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये ९०३ स्त्रिया मग त्या उच्च वर्गीय, मध्यमवर्गीय किंवा गरीब घरच्या सर्व स्त्रियांना दुय्यम वागणूक कुटुंबामध्ये मिळत असते. स्वयंपाक घर म्हणजे फक्त स्त्रियांच कार्यक्षेत्र अशी पुरुषांची मानसिकता असते. स्वयंपाक घरात जाऊन कुठलाही पदार्थ करण्याची तयारी त्यांची नसते. मग ती स्त्री आजारी असली तरी तिनेच स्वयंपाकाचा कार्यभार सांभाळावा हा आग्रह सर्व कुटुंबियांकडून असतो. लग्नानंतर आई-वडिलांचे घर सोडून आलेली स्त्री, तिचा आधार सासरच असते आणि सासरी जर तिला अशी वागणूक किंवा घरातून बाहेर काढण्याची भाषा केली जात असेल, तर त्या स्त्रीने कोणाकडे बघायचे? म्हणजे कुठेतरी एक क्षण असा येतो की तिला आधारहीन वाटायला लागते.सततच्या आघातांमुळे ती सुद्धा कमजोर पडू शकते. यावेळी तिला भक्कम आधाराची गरज असते. माहेरच्या लोकांनी तिला तेवढीच मदत करून भक्कम आधार देणे इथे अपेक्षित आहे. जेणेकरून तिने घेतलेला निर्णय तिच्यासाठी योग्य होईल.

डॉ. भारती हेडाऊ,यवतमाळ

## गणेश मंडपांत जुगार नकोच!

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपात रात्री पत्त्यांचे डाव रंगणे आता सामान्य झाले आहे. श्रीच्या मंडपाची राखण करण्यासाठी जागरण करावे लागते आणि त्यासाठी नुसतेच बसण्याऐवजी मंडपात पत्त्यांचे डाव बसवले जातात. त्यावर जुगार खेळला जातो. प्रत्येक डावाला एक ठराविक रक्कम डावात जिंकलेली व्यक्ती 'टीप' म्हणून मंडपातील दान पेटीत टाकते. यामुळे दानपेटीतील अर्पणाची रक्कम वाढत असल्याने मंडळालाही आर्थिक लाभ होतो. ज्यामुळे अनेक ठिकाणी आयोजकांकडूनच रात्री पत्त्यांचे मोठमोठे डाव मांडले जातात. काही ठिकाणी तर श्रीच्या मंडपाहुन मोठा मंडप खास जुगार खेळण्याकरिता उभारला जातो. गणेश मंडपात जागरणच करायचे आहे, तर त्यासाठी अन्य मार्गही आहेत.

**- जगन घाणेकर**

## 'गणेशोत्सव'

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या संस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग बनला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२५ पासून गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिलेला आहे. राज्य शासनाने शासन निर्णयात राज्य महोत्सवांमध्ये अधिकाधिक व्यक्ती, संस्था आणि विविध समाज घटक यांना सामाजिक सलोख्यासाठी एकत्रित आणणे, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील गणेशोत्सवाला प्रोत्साहन देणे,विविध संस्कृतिक विषयाचे जतन आणि संवर्धन करणे यांना प्राधान्य दिले आहे महाराष्ट्राची संस्कृतिक ओळख घट्ट होणार, लोकसहभागातून हा सोहळा केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा संस्कृतिक ठरणार याच शब्दात प्रशासनाने राज्य महोत्सवाचे गेल्या वर्षी वर्णन केले. त्यानिमित्त मराठी संस्कृती, कलाकार,परंपरा यांना प्रोत्साहन देण्यासाठीचे प्रयत्न, 'ऑपरेशन सिंदूर', स्वदेशी वस्तूच्या व्यापाराविषयी जागृति असे एक ना अनेक उपक्रम राबवण्याचे आवाहन केले गेले आणि गणेश भक्तांनी ते उत्साहाने राबवलेही.



गेल्या वर्षी 'राज्य महोत्सव' घोषित केला खरा पण नियमावलीच्या पालनाचे काय? नियमावली ही स्पष्ट नाही. राज्य महोत्सव आदर्श करायचा असेल, संस्कृतिक जोपासना करायची असेल तर, मूर्तीच्या उंचीचे काही नियम नाहीत,ध्वनी प्रदूषणाची मर्यादा नाही, डीजेच्या वापरावर बंदीही नाही. केवळ सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाने, प्रोत्साहनाने काय साध्य होणार? नैसर्गिक घटकांपासून अशास्त्रीय मूर्ती बनवायला प्रोत्साहन आणि शास्त्रानुसार वाहत्या पाण्यात होणारे मूर्ती विसर्जन थांबवणे या कृती पर्यावरण पूरक आहेत का? ध्वनी आणि वायू यांचे यांच्या प्रदूषणाचे काय? आता याच कथित कारणाच्या आडून धर्मांधाने श्री गणेश मूर्तीवर अंडी फेकली. साधा धक्का लागला तरी हिंदूंची हत्या करणारे धर्मांध 'श्री गणेश मूर्ती' आणि मिरवणूक यांच्यावर आक्रमण करायला कोणतेही पुढे कारण करू शकतात. आज धर्मांधाने श्री गणेश मूर्तीवर अंडी फेकली उद्या गोमास फेकतील तेव्हा पोलीस प्रशासन काय करणार हिंदूंनाच शांततेचे आव्हान करणार का?

लोकमान्य टिळकांनी ब्रिटिशांना सत्ताच्युत करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाचे माध्यम वापरले. याच गणेशोत्सवाचे निमित्त जागृत हिंदूंनी करून घेऊ नये, असे वाटत असल्यास हिंदूंच्या सण वारांच्या निमित्ताने आक्रमण करणाऱ्यांवर ' मकोका' 'रासुका' कायद्याअंतर्गत आणि बुलडोझर द्वारे कारवाई करणार का?राज्य महोत्सवाचे फलक काढायला लावणे हे पोलीस प्रशासन आणि सरकार यांनी स्वतःच्या कार्यक्षमतेवर उपस्थित केलेले प्रश्नचिन्हच आहे.

**लीना गाडगीळ**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# गणेशोत्सवाच्या तोंडावरच डीजे-बँडवर निर्बंध का?

## दाखल गुन्हे मागे घेऊन एसआयटी चौकशी, सकल हिंदू समाजाची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १५ : गणेशोत्सव आणि दुर्गोत्सवाच्या तोंडावरच बँड-बाजा, वाद्य पथक आणि डीजेवर निर्बंध लादण्याच्या प्रशासनाच्या भूमिकेविरोधात सकल हिंदू समाज संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. 'ऐन उत्सवाच्या वेळीच निर्बंध का?' असा सवाल संघटनेचे समन्वयक प्रवीण प्रजापती यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला.**



प्रजापती यांच्या म्हणण्यानुसार, गणेश मंडळे उत्सवाची तयारी अनेक महिने आधीपासून करतात. मंडप, सजावट, विद्युत व्यवस्था तसेच बँड-बाजा, ढोल-ताशा व अन्य वाद्य पथकांचे नियोजन आणि बुकिंगही आधीच केले जाते. यवतमाळातील अनेक मंडळांनी अकोला, अमरावती, नागपूर, छत्तीसगड, राजस्थान आदी ठिकाणांहून पथके बुक करून त्यांना आगाऊ रक्कम दिली आहे. मात्र, उत्सवाच्या अवघ्या चार दिवस आधी निर्बंध लादल्याने मंडळांसह कलाकारांचेही आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप त्यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाने डीजेवर सरसकट बंदी घातलेली नसून ध्वनीची मर्यादा निश्चित केली आहे, असा दावा प्रजापती यांनी केला. त्यामुळे ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे पालन करून डीजे व बँड-बाजाला परवानगी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, डीजे संचालकांच्या परवानगी मोर्चात सहभागी झालेल्या युवकांवर विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला. हे युवक महाविद्यालयीन विद्यार्थी व नोकरदार असल्याने गुन्ह्यांचा त्यांच्या भवितव्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे संबंधित गुन्हे तातडीने मागे घ्यावेत आणि संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली. मनसेचे जिल्हा संपर्कप्रमुख अनिल हमदापुरे यांनीही प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अलीकडे दहीहंडीच्या कार्यक्रमांमध्ये डीजेला परवानगी देण्यात आली. मग गणेशोत्सव आणि दुर्गोत्सवाच्या वेळीच निर्बंध का, असा सवाल त्यांनी केला. ही दुहेरी भूमिका असल्याचा आरोप करत आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला. पत्रकार परिषदेला यवतमाळचे राजा मंडळाचे अध्यक्ष मनोज पसारी, मनसे जिल्हाध्यक्ष देवा शिवरामवार उपस्थित होते.

# हक्काच्या रेशनवरही दुकानदाराची 'टाळाटाळ'..! टेंभी ग्रामस्थांचा तहसीलदारांकडे धाव

## टेंभी ग्रामस्थांचा तहसीलदारांकडे धाव, कमी धान्य, अपमानास्पद वागणुकीचे आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी-जामणी, दि. १५ :** तालुक्यातील टेंभी येथील स्वस्त धान्य दुकानाच्या कारभारावर ग्रामस्थांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. लाभार्थ्यांना शासनाकडून मिळणारे धान्य व साखर नियमित आणि योग्य प्रमाणात दिली जात नसल्याचा आरोप करीत ग्रामपंचायतीच्या सरपंचांसह शिधापत्रिकाधारकांनी झरी-जामणी तहसीलदार तथा अन्नपुरवठा अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली आहे.

तक्रारीनुसार, रेशनचे धान्य व साखर देताना दुकानदाराकडून टाळाटाळ केली जाते. तसेच लाभार्थ्यांशी अपमानास्पद वर्तन होत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. यापूर्वी समज देऊनही कारभारात सुधारणा झालेली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. काही लाभार्थ्यांना हक्का पेक्षा कमी धान्य दिल्याचा आरोप असून, एका लाभार्थ्याला तब्बल पाच किलो कमी धान्य मिळाल्याचे तक्रारीत नमूद आहे. रेशनच्या हक्कासाठीही लाभार्थ्यांना हेलपाटे मारावे लागत असतील, तर अन्नपुरवठा यंत्रणेची भूमिका काय? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. संबंधित दुकानाच्या व्यवहाराची सखोल चौकशी करून आरोप सिद्ध झाल्यास नियमानुसार कारवाई करावी आणि लाभार्थ्यांना पूर्ण व नियमित धान्य-साखर मिळावी, अशी मागणी करण्यात आली. निवेदनाची प्रत उपविभागीय अधिकारी, केळापूर यांनाही देण्यात आली. यावेळी अमोल जुमनाके, रमेश चिकाराम, प्रकाश मेश्राम यांच्यासह टेंभीतील शिधापत्रिकाधारक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## थोडक्यात

### मालाताई देशमुख यांची महिला काँग्रेसच्या यवतमाळ जिल्हा उपाध्यक्षपदी निवड



**महागाव:** महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या मार्गदर्शनाखाली यवतमाळ जिल्हा महिला काँग्रेसच्या संघटन विस्तारामध्ये महागाव तालुक्यातील पक्षाच्या ज्येष्ठ व निष्ठावंत कार्यकर्त्या मालाताई देशमुख यांची यवतमाळ जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. यवतमाळ जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा वंदना आवारी यांनी या निवडीची अधिकृत घोषणा केली. जिल्ह्यात महिला काँग्रेसचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आवारी यांनी उपाध्यक्षांची कार्यकारिणी जाहीर केली आहे. मालाताई देशमुख यांनी यापूर्वी महिला काँग्रेस कमिटीच्या महागाव शहराध्यक्षपदाची सूत्रे पाच वर्षे अत्यंत कुशलतेने सांभाळली. त्यानंतर महिला काँग्रेसच्या महागाव तालुकाध्यक्षपदी ही पाच वर्षांचा यशस्वी कार्यकाळ पूर्ण केला. त्यांच्या कार्यकाळात महागाव शहरातील प्रभाग क्रमांक १ आणि प्रभाग क्रमांक ८ मधील देशी दारूची दुकाने कायमस्वरूपी बंद करण्यासाठी स्थानिक महिलांनी जो एल्गार पुकारला होता, त्या आंदोलनात माला देशमुख यांचे लक्षणीय योगदान होते.



### मोबाईलच्या युगात पाढ्यांचे 'पारायण'गणेशोत्सवात संस्कार केंद्राचा अनोखा उपक्रम

**राळेगाव :** मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे विद्यार्थ्यांमधील पाठांतराची सवय कमी होत असताना, गणेशोत्सवाच्या निमित्ताने राळेगाव तालुक्यातील संस्कार केंद्रांनी पारंपरिक पाठांतराला आधुनिक संदर्भ देणारा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. कला, वाणिज्य महाविद्यालय, राळेगावच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय युवा संघटन व माजी विद्यार्थी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने 'गणेशोत्सवानिमित्त पाढे पाठांतर पारायण' आयोजित करण्यात आले आहे. १६ ते २४ सप्टेंबरदरम्यान सायंकाळी ६ ते ८ या वेळेत हा उपक्रम होणार आहे. संस्कार केंद्रांतील विद्यार्थी गणेशोत्सव साजरा करणाऱ्या गावांतील निवडक घरांना भेट देऊन सामुदायिक प्रार्थना म्हणतील. त्यानंतर १ ते २० पर्यंतचे पाढे, वर्गमूळ व घनमूळ यांचे सामूहिक पठण केले जाईल. राळेगाव, वरूड (ज), वान्हा, जळका, पिंपळखुटी व रामतीर्थ येथील सहा संस्कार केंद्रांतील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांची एकाग्रता व स्मरणशक्ती वाढविण्यासोबतच पाठांतराची परंपरा जपण्याचा उद्देश आहे. उपक्रमाला ग्रामस्थांनी सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



### पानांतून साकारला 'गणराया' चिमुकल्यांनी दिला पर्यावरणपूरक उत्सवाचा धडा!

**झरी-जामणी :** गणेशोत्सवाच्या उत्साहाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत गुरुकुल विद्यालयातील नर्सरीच्या चिमुकल्यांनी विविधरंगी पानांपासून गणपती बाप्पाची आकर्षक प्रतिकृती साकारली. सुप्रिया मॅम व अनुष्का मॅम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या अभिनव उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध आकार, रंग व पोत असलेल्या पानांचा कल्पकतेने वापर करून चिमुकल्यांनी कलागुणांना वाव दिला. 'निसर्गाशी नाते जोडूया, पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करूया' असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कृतीतून पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला. मुख्याध्यापक विलास चिट्टलवार, शैक्षणिक विभागाचे विकास अग्रवाल व शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पैनगंगेच्या पात्रात महसूल पथकाची धडक!

## रेती माफियांचे थर्माकोलचे ताफे जाळून नष्ट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. १५ :** उमरखेड तालुक्यातील बंदी भागात पैनगंगा नदीपात्रातून सुरू असलेल्या कथित अवैध रेती उत्खननाविरोधात महसूल विभागाने धडक कारवाई करत रेती माफियांच्या अवैध उत्खननाला चाप लावला आहे. डोंगरगाव येथील पैनगंगा नदीपात्रात सोमवारी सायंकाळी सुमारे ६ वाजता महसूल पथकाने अचानक धाड टाकली. मात्र, पथकाची चाहूल लागताच रेती माफियांनी घटनास्थळावरून पळ काढला.



महसूल पथक घटनास्थळी पोहोचले असता नदीपात्रातून थर्माकोलच्या ताफ्यांवर रेती साठवून ती नदीकाठावर आणली जात असल्याचे निदर्शनास आले. पथकाने घटनास्थळी आढळून आलेले थर्माकोलचे ताफे तेथेच जाळून नष्ट केले. या कारवाईमुळे पैनगंगा नदीपात्रात बेकायदेशीर रेती उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून महसूल विभागाच्या कारवाईची परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे. या दरम्यान, रेती माफियांनी पैनगंगा नदीच्या काठावर केलेल्या रेतीसाठ्याचीही महसूल विभागाने गंभीर दखल घेतली आहे. या रेतीसाठ्याचा पंचनामा करण्याच्या सूचना मंडळ अधिकारी आढाव व डोंगरगावचे तलाठी कनकापुरे यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नदीपात्रातील अवैध रेती उत्खननाचे आणखी धागेदोरे समोर येण्याची शक्यता आहे. तहसीलदार राजू सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्या पथकाने ही कारवाई केली. कारवाईत मंडळ अधिकारी गजानन सुरोशे, महसूल सेवक योगेश मारकवार, महसूल सेवक उदल राठोड तसेच चालक मुखीमुद्दीन सलाउद्दीन सहभागी होते

# काळी (दौ.) वनविभागातील वन्य प्राण्यांच्या हैदोसामुळे शेतकरी झाले हैराण!

## वनपरिक्षेत्र अधिकारी,व वनक्षेत्रपाल,कार्यालयात गैरहजर शेतकऱ्यात संताप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १५ :** काळी (दौ.) वन परिक्षेत्रामध्ये वन्य प्राण्यांनी अक्षरशः हैदोस घातला असून शेतकऱ्यांच्या शेतामधील उभ्या पिकांची नासाडी करीत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामधील उभे पिके नष्ट होऊन शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे.



काळी (दौलत.) वनपरिक्षेत्रामध्ये वन्य प्राण्यांच्या हैदोसामुळे शेतकरी हवालदिल झाला असून वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांकडे शेतकरी आपली तक्रार कैफियत देण्याकरिता संबंधित कार्यालयांमध्ये गेले असता संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी तसेच वनक्षेत्रपाल मुख्यालयी हजरच राहत नसल्यामुळे शेतकऱ्यामध्ये संताप व्यक्त होत आहे. वन्य प्राण्यांनी शेत पिकांच्या केलेल्या नासाडी बाबत कोणाकडे तक्रार करावी हा यक्षप्रश्न शेतकरी यांना भेडसावत आहे. काळी (दौलत.) वनपरीक्षेत्रा मध्ये वन्य प्राण्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये शेतकऱ्यांचे बळी सुद्धा गेलेले आहे. वन्य प्राण्यांच्या वाढत्या हैदोषामुळे शेतकऱ्यांना शेतामध्ये आपली शेत कामे करणे ही फार अवघड होऊन बसले आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी, वनक्षेत्रपाल तथा वनरक्षक आदी कर्मचारी मुख्यालय शोधूनही सापडत नसल्यामुळे शेतकऱ्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. काळी (दौ.) वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी, वनक्षेत्रपाल, वनरक्षक यांनी मुख्यालय राहून वन्य प्राण्यांच्या बंदोबस्तासाठी योग्य ती उपाययोजना करावी.अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने केल्या जात आहे. काळी (दौ.) वनपरिक्षेत्रातील अधिकारी,कर्मचारी मुख्यालय न राहिल्यामुळे परेशानी त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशाराही शेतकऱ्यांकडून देण्यात आला आहे. वरिष्ठ उपवनसंरक्षक अधिकाऱ्यांनी या बाबीची योग्य ती खबरदारी घेऊन संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी तसेच वनक्षेत्रपाल, वनरक्षक यांना योग्य ती तंबी देऊन वन्य प्राण्यांच्या बंदोबस्तासाठी योग्य ती कार्यवाही करून मुख्यालयी राहण्याबाबत आदेश करावे. अन्यथा काळी (दौ.) वनपरिक्षेत्राचे अधिकारी, कर्मचारी मुख्यालय राहत नसल्यास त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करावी अशी ही मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केल्या जात आहे.



# सैनिकांच्या कल्याणासाठी रजनी देशपांडेंची पाच लाखांची देणगी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १५ :** देशाच्या रक्षणासाठी प्राणाची बाजी लावणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत ज्येष्ठ नागरिक तथा निवृत्त जिल्हा परिषद शिक्षिका रजनी विनायकराव देशपांडे यांनी सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी तब्बल पाच लाख रुपयांची देणगी दिली. या रकमेचा धनादेश त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अनिरुद्ध बक्षी यांच्याकडे सुपुर्द केला.

यावेळी निवृत्त नायब तहसीलदार विनायक बळीराम थोडगे व सामाजिक कार्यकर्ते बजरंग पांडुरंग नामदेववार उपस्थित होते.ध्वजदिन निधीतून शहीद सैनिकांच्या युद्धविधवा, युद्धात अपंगत्व आलेले सैनिक, माजी सैनिक, त्यांच्या विधवा तसेच अवलंबितांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. देशपांडे या सामाजिक उपक्रमांना सातत्याने मदत करीत असून, सैनिकांच्या त्यागाला दिलेली ही देणगी सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरली आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या वतीने अनिरुद्ध बक्षी यांनी देशपांडे यांचे आभार मानत त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# ३० वर्षांवरील नागरिकांची आरोग्य तपासणी..!

## 'निदान लवकर, उपचार वेळेत' वर भर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १५ :** ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यात 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत 'तीस वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. १ सप्टेंबर ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या मोहिमेत जिल्ह्यातील ३० वर्षे व त्यावरील प्रत्येक नागरिकाची आरोग्य तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. बदलती जीवनशैली, वाढता ताण आणि व्यायामाचा अभाव यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच विविध प्रकारच्या कर्करोगाचा धोका वाढत आहे.



त्यामुळे आजार गंभीर होण्यापूर्वीच त्यांचे निदान करून उपचार सुरू करण्यावर या मोहिमेत भर दिला जात आहे. मधुमेह, रक्तदाबासह मुख, स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगाची मोफत तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला जाणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांच्या निर्देशानुसार आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांनी नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण किंवा उपजिल्हा रुग्णालय तसेच आरोग्य शिबिरात जाऊन तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी केले आहे.



**महागाव :** महागाव शहरातील युवा उद्योजक प्रियांश उदय नरवाडे यांच्या घरी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी गणपती बाप्पाचे मोठ्या उत्साहात आणि आनंदात स्वागत करण्यात आले. आणि भगवान शंकराच्या आकर्षक पिंडीच्या दिखाव्यासह विलोभनीय दृश्यमध्ये गणपती बाप्पा विराजमान झाले.

# पांढरकवडा येथे खड्ड्यांचे साम्राज्य सणासुदीत अपघाताची भीती..!

## काँग्रेसकडून रस्ते दुरुस्तीची मागणी प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १५ :** पांढरकवडा शहरातील प्रमुख रस्त्यांवर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले असून, सण-उत्सवाच्या काळात प्रशासनाच्या दुर्लक्षाचा फटका नागरिकांना बसत आहे.



शहरातील अनेक मार्गांची दुरवस्था झाल्याने वाहनचालक, पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील रस्त्यांवर नागरिकांची वर्दळ वाढली आहे. मात्र, ठिकठिकाणी असलेल्या खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला असून वाहतुकीलाही अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे उत्सवाच्या काळात तरी प्रशासनाला रस्त्यांची आठवण यावी, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. या प्रश्नाकडे लक्ष वेधत अनीस पोसवाल यांनी नगर परिषद प्रशासनाकडे निवेदन देऊन शहरातील प्रमुख रस्त्यांची तातडीने पाहणी करून खड्डे बुजविण्याची मागणी केली. केवळ दिखाऊ डागडुजी न करता रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणीही करण्यात आली. यावेळी मनोज भोयर, अमर पाटील, प्रेम राठोड, इकराम अली, संतोष राऊत, अनिल कीनाके,करीम, खुशाल शेंडे,सूरज जयस्वाल,साहिल मेश्राम यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अखेर प्रक्षोभक भाषण प्रकरणी हर्षू ठाकूर विरुद्ध एफआयआर

## एमआयएमचे माजी नगरसेवक सय्यद अफसर यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १५ :** प्रक्षोभक तसेच दोन समाजांमध्ये तणाव निर्माण करणारे भाषण केल्याच्या आरोपावरून उमरखेड शहर पोलिसांनी हर्ष उर्फ हर्षू ठाकूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, एमआयएमचे माजी नगरसेवक सय्यद अफसर सय्यद कासम (४०) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला.



सिद्धेश्वर दहीहंडी महोत्सवाच्या वेळी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील कथित वक्ते हर्ष उर्फ हर्षू ठाकूर यांनी मुस्लिम समाजाला उद्देशून प्रक्षोभक वक्तव्य केल्याचा आरोप आहे. या भाषणादरम्यान मुस्लिम समाजावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करत आर्थिक व व्यावसायिक संबंध तोडण्याचे आवाहन केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या वक्तव्यामुळे उमरखेड शहरात भीती व तणावाचे वातावरण निर्माण होऊन दोन समाजांमध्ये जातीय तेढ व दंगल भडकवण्याचा प्रयत्न झाल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. पोलिसांनी लेखी तक्रारीच्या आधारे एफआयआर क्रमांक ८९५/२०२६ अंतर्गत बीएनएस कलम १९६(१), २९९ व ३५३(२) नुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. यावेळी एमआयएमचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष सय्यद इरफान ताऊ, माजी नगरसेवक मुजीब बागवान, अड.सय्यद इलियास, अब्दुस्समद प्रिन्स, सय्यद गाझी,अज़ीम शेख,ज़बूर शेख, अहमद पटेल, शेख इनायत, नाजिर आतिश, इमरान शेख, सय्यद सरफराज, शेख लाल ,शागिरोद्दीन यांच्यासह एमआयएमचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पावसाच्या आगमनाने पिकांना मिळाली नवसंजीवनी

## जिल्ह्यात सरासरी पर्जन्यमान १२.१ मिमी

**अमरावती/का.प्र.**

पावसाने दीर्घ खंड घेतल्यानंतर अखेर जिल्ह्यात पुन्हा पावसाची हजेरी लागली आहे. १४ सप्टेंबरच्या सकाळपर्यंतच्या २४ तासांत जिल्ह्यात सरासरी १२.१ मिमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. विशेषतः चिखलदरा, अंजनगाव, मोर्शी आणि अमरावती तालुक्यांत तुलनेने चांगला पाऊस झाला.

जिल्ह्यात चिखलदरा तालुक्यात सर्वाधिक २४.४ मिमी, तर अंजनगाव सुर्जीमध्ये २०.४ मिमी पाऊस झाला. मोर्शीत १६.५ मिमी, अमरावतीत १५.५ मिमी, धारणी १३.४ मिमी, वरूड १०.८ मिमी, धामणगाव रेल्वे १०.९ मिमी, दर्यापूर ९.९ मिमी, अचलपूर ९.१ मिमी, चांदूर बाजार ९.१ मिमी, चांदूर रेल्वे ८.७ मिमी आणि भातकुलीत ८ मिमी पावसाची नोंद झाली. नांदगाव खंडेश्वरात ९ मिमी, तिवसात ३.४ मिमी पाऊस पडला. २४ तासांच्या आकडेवारीत चिखलदरा २४.४ मिमी पावसासह जिल्ह्यात आघाडीवर राहिला. त्यापाठोपाठ अंजनगाव सुर्जी २०.४ आणि मोर्शी १६.५ मिमी असा क्रम आहे. दुसरीकडे तिवसा तालुक्यात केवळ ३.४ मिमी पाऊस झाल्याने या भागातील शेतकऱ्यांना अद्याप समाधानकारक पावसाची प्रतीक्षा कायम आहे. पावसाचा खंड संपला असला तरी जिल्ह्याची पावसाची तूट अद्याप मोठी आहे. त्यामुळे पुढील दोन-तीन दिवसांत

**पिकांना ओलाव्याची गरज भासणार**

पावसाचा मोठा खंड पडल्याने खरीप पिकांवर ताण निर्माण झाला होता. जिल्ह्यात जूनपासून आतापर्यंत ४६५.४ मिमी पाऊस झाला असून तो सरासरीच्या ५९.७टक्के आहे. जून ते सप्टेंबरची सामान्य सरासरी ८६२ मिमीच्या तुलनेत आतापर्यंत केवळ ५४ टक्के पाऊस झाला आहे. त्यामुळे सध्याच्या सरींमुळे पिकांना तात्पुरता आधार मिळाला असला तरी पिकांची गरज भागविण्यासाठी आणखी दमदार आणि सलग पावसाची आवश्यकता आहे. सोयाबीन, कापूस, तूर आणि इतर खरीप पिकांसाठी जमिनीत ओलावा टिकणे महत्त्वाचे असताना या पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. विदर्भातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे. पावसाचे सातत्य राहते का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



जलपूर्ती गणेशोत्सव मंडळ - वर्ष ३५वे , जळपूर कॉलनी,विद्युत नगर अमरावती येथे गणपती बाप्पाचे आगमन पारंपरिक पद्धतीने लेझिम, ताळ व मृदुंगाच्या गजरात झाले.
-विराज विजयराव देशमुख



श्री बाल मंडळ, जीवनपुरा अचलपुर



आदर्श बाल गणेश मंडळ, रायपुरा अचलपुर


# 'झनक'च्या 'मून'पासून 'टिम्सी विराणी'पर्यंत...

## सावीच्या अभिनय प्रवासाला 'रेट्रो बाप्पा'ची अनोखी सलामी!

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

गणरायाच्या आगमनासोबत प्रत्येक घरात भक्ती, उत्साह आणि आकर्षक सजावटीची लगबग सुरू होते. मात्र, चांदूर रेल्वेच्या धनराज नगरातील रहिवासी आणि सध्या अमरावतीतील सातुर्णा परिसरात वास्तव्यास असलेल्या चिमुकली अभिनेत्री सावी अक्षय जैन हिच्या घरी यंदाची गणेशोत्सव सजावट काहीशी वेगळीच ठरली आहे. 'झनक' मालिकेतील 'मून'पासून 'क्यूंकि सास भी कभी बहू थी-२' मधील 'टिम्सी विराणी'पर्यंतच्या सावीच्या अभिनय प्रवासाला 'रेट्रो बाप्पा'च्या माध्यमातून अनोखी सलामी देण्यात आली आहे.

स्टार प्लस वाहिनीवरील लोकप्रिय हिंदी मालिका 'झनक' तसेच विविध मालिकांमधून आपल्या अभिनयाची छाप पाडणाऱ्या सावीने अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. नुकतीच तिने 'क्यूंकि सास भी कभी बहू थी-२' या मालिकेत 'टिम्सी विराणी'ची भूमिका साकारत आपल्या अभिनय प्रवासात आणखी एक महत्त्वाचे



पाऊल टाकले आहे. मोठ्या कलाकारांसोबत काम करण्याची संधी मिळत असल्याने तिच्या या प्रवासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

चिमुकल्या वयात अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवून विविध मालिकांमध्ये काम करण्यापासून 'टिम्सी विराणी'च्या भूमिकेपर्यंतचा सावीचा प्रवास तिच्या कुटुंबासाठी तसेच अमरावती जिल्ह्यासाठी अभिमानाचा विषय ठरत आहे. तिच्या मेहनतीला, स्वप्नांना आणि अभिनय क्षेत्रातील वाटचालीला गणरायाच्या चरणी अर्पण करण्याच्या भावनेतून ही संकल्पना साकारण्यात आली आहे.आई चंचल जैन आणि वडील अक्षय जैन यांनी एकत्रितपणे ही संपूर्ण थीम साकारली असून, त्यांच्या कल्पकतेला आणि सावीच्या अभिनय प्रवासाला सोशल मीडियावरही कौतुकाची दाद मिळत आहे. 'लाइट्स... कॅमेरा... ब्लेसिंग्स!' या संकल्पनेतून साकारलेला हा 'रेट्रो बाप्पा' यंदाच्या गणेशोत्सवात सावीच्या कुटुंबासाठी केवळ सजावट नसून, तिच्या अभिनय प्रवासाच्या आठवणी जपणारी आणि तिच्या पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद देणारी एक सुंदर भावनिक भेट ठरली आहे.

# कुऱ्हा पोलीस स्टेशन हद्दीत ३५ गणेश मंडळांची स्थापना

## १५ गावांत 'एक गाव, एक गणपती'

**कुऱ्हा**- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कुऱ्हा पोलीस स्टेशनच्या हद्दीत यंदा एकूण ३५ गणेश मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. विशेष म्हणजे परिसरातील १५ गावांनी 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबवून सामाजिक एकोपा व शांततेचा संदेश दिला आहे.गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. .'एक गाव, एक गणपती' उपक्रमामुळे गावातील नागरिक एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करीत असून सामाजिक सलोखा, एकता आणि बंधुभाव वाढण्यास मदत होत आहे. गणेशोत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.कुऱ्हा पोलीस स्टेशनच्या हद्दीत गणेशोत्सवाच्या निमित्ताने सर्व मंडळे व नागरिकांनी शांतता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जपत उत्सव साजरा करण्याचा निर्धार केला आहे.

# सोमेश्वर संस्थानमध्ये श्रावणमासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**

सालाबादप्रमाणे यंदाही श्री सोमेश्वर संस्थान, भाजीबाजार, अमरावती येथे पवित्र श्रावणमासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिभावाने व उत्साहात पार पडले.

श्रावणमासाच्या कालावधीत सव्वा लाख 'ॐ नमः शिवाय' जप, सव्वाकोटी मंत्रजप, भजन, शिवमहिम्न स्तोत्र पठण, महिला अभिषेक व पुरुष अभिषेक, तसेच चारही श्रावणी सोमवारनिमित्त विशेष महाआरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.श्रावणमासाची सांगता व समारोपानिमित्त महाआरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन यज्ञ, महाआरती व महाप्रसादाचा लाभ घेतला. विशेष म्हणजे, मुसळधार पाऊस सुरू असतानाही भक्तांच्या लाटा महाप्रसाद ग्रहण



करण्यासाठी सातत्याने सोमेश्वर मंदिराकडे येत होत्या. प्रतिकूल वातावरणातही भाविकांच्या चेहऱ्यावरील श्रद्धा, उत्साह आणि भगवान सोमेश्वरांवरील अढळ भक्ती यांचा जणू प्रत्यक्ष साक्षात्कार यावेळी झाला.

यज्ञ, महाआरती व महाप्रसादाच्या धार्मिक सोहळ्यास माजी मंत्री श्री जगदीश गुप्ता, नगरसेवक श्री रतवा तसेच नगरसेविका पांडे वहिनी यांची विशेष उपस्थिती लाभली. मान्यवरांनी भगवान सोमेश्वरांचे दर्शन घेऊन महाआरती व महाप्रसाद कार्यक्रमात सहभाग नोंदविला.मुसळधार पावसातही कोणत्याही भक्ताने जागा सोडून जाण्याची घाई केली नाही तसेच कोणतीही नाराजी अथवा उद्वेग व्यक्त केला नाही. सर्व भाविकांनी अत्यंत शांततेने, संयमाने व शिस्तीने रांगेत राहून महाप्रसाद ग्रहण केला. सतत व सुरळीतपणे महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. महिला भाविकांची उपस्थिती विशेष लक्षणीय होती.

धार्मिक उपक्रमात शंकर बुटे व श्री उल्हास बपोरीकर यांनी हिरिरीने सहभागी होत विविध कार्यक्रमांची जबाबदारी पार पाडली.मंदिर परिसराची महिनाभर स्वच्छता व देखभालीची जबाबदारी विजय पांडे,राजाखारकर व सुरेंद्र बुरंगे यांनी जबाबदारीने पार पाडली. तसेच सतीश देशपांडे यांनी 'ॐ नमः शिवाय' सव्वाकोटी मंत्रजप करणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक व्यवस्था केली.रांगोळी व सजावटीमध्ये मनोज झळके व नरेंद्र दोडके यांनी विशेष सहभाग घेऊन जबाबदारीने कार्य केले.शिवमहिम्न स्तोत्र पठण, भजन तसेच अभिषेक कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी श्री उल्हास बपोरीकर व योगेंद्र उपाध्ये यांनी पार पाडली.या सर्व भव्य धार्मिक आयोजनाच्या यशामागे श्री अजय पिंपळगावकर यांनी विशेष पुढाकार घेऊन अथक परिश्रम घेतले. तसेच श्री प्रशांत महाजन, समस्त विश्वस्त मंडळ व सर्व भक्तगणांनी यज्ञ, महाआरती व महाप्रसादाच्या आयोजनाची संपूर्ण सूत्रे सांभाळत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

यशस्वी आयोजनासाठी प्रशांत महाजन व अन्य भक्तगण गुप्ता बंधू, उमेश आसरकर, मंगेश साऊरकर, सतीश बेंबळकर तसेच बहुसंख्य भक्तगणांनी अथक परिश्रम घेतले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे महाप्रसादाचा हा भव्य उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.


# पांडवांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या वायगावचा जागृत सिद्धिविनायक!

## उजव्या सोंडेची अद्भुत मूर्ती; महाभारतकालीन आख्यायिकेपासून आजच्या भक्तीपरंपरेपर्यंतचा श्रद्धेचा प्रवास

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

भातकुली तालुक्यातील श्रीक्षेत्र वायगाव हे धार्मिक श्रद्धेसोबतच पौराणिक आणि ऐतिहासिक वारसा जपणारे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून परिचित आहे. गावातील उजव्या सोंडेच्या सिद्धिविनायकाची अद्भुत गणेशमूर्ती भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असून, दरवर्षी महाराष्ट्रासह शेजारील राज्यांतून हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात.

वायगावाच्या सिद्धिविनायकाशी महाभारतकालीन आख्यायिका जोडली गेली आहे. महाभारतातील विराट पर्वाच्या काळात पांडव अज्ञातवासात असताना चिखलदरा परिसरात आले होते. अज्ञातवासाची सांगता करताना परतीच्या प्रवासात त्यांनी



वायगाव येथील गणेशमूर्तीचे दर्शन घेतल्याची आख्यायिका आजही सांगितली जाते. त्यामुळे या गणेशस्थानाला धार्मिक श्रद्धेबरोबरच पौराणिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

**भूमीत लपलेला गणराय पुन्हा भक्तांच्या सेवेत**

सुमारे सहा शतकांपूर्वी वायगाव परिसरात खोदकाम सुरू असताना ही गणेशमूर्ती आढळून आल्याचे सांगितले जाते. मुघल आक्रमणाच्या काळात मूर्तीभंजनाची भीती असल्याने मूर्ती सुरक्षित ठेवण्यासाठी ती भूमिगत करण्यात आली होती, अशी स्थानिक परंपरा आहे. अचलपूर, दर्यापूर, खोलापूर आदी भागांत मुघलांची ठाणी असल्याने वायगावातील गणेशमूर्ती बराच काळ भूमिगत ठेवण्यात आल्याचे सांगितले जाते.

काळाच्या ओघात इंगोले कुटुंबाच्या घराजवळ ही मूर्ती पुन्हा सापडली. त्यानंतर तिची वाडारूपी मंदिरात प्रतिष्ठापना करण्यात आली. भाविकांची वाढती संख्या आणि श्रद्धेचा ओघ लक्षात घेऊन इंगोले कुटुंबाने पुढाकार घेत ट्रस्टची स्थापना केली. कुटुंबीयांनी स्वतःची शेती देत भव्य मंदिराची उभारणी केली. सध्या मंदिराचे व्यवस्थापन इंगोले व पाटील कुटुंबातील सदस्यांकडून केले जाते.

**दहा दिवस भक्तिमय वातावरण**

वायगाव सिद्धिविनायक मंदिरात वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम होत असले तरी भाद्रपद शुक्ल चतुर्थी ते पौर्णिमा या कालावधीत गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दहा दिवसांच्या या उत्सवात अन्नदान, ज्ञानदान, भजन, कीर्तन, हरिपाठ यांसह विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन केले जाते.

गणेश जयंती उत्सवही येथे मोठ्या भक्तिभावाने साजरा होतो. या काळात महाराष्ट्रासह मध्य प्रदेश आणि इतर शेजारील राज्यांतून हजारो भाविक वायगाव येथे दाखल होतात. त्यामुळे उत्सवाच्या काळात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारून जातो.

**सिद्धिविनायक मूर्तीचे आगळेवेगळे वैशिष्ट्य**

उजव्या सोंडेची अद्वितीय गणेशमूर्ती

मूर्तीच्या उजव्या बाजूस सिद्धी, तर डाव्या बाजूस रिद्धी

चरणांवर पद्म व शंख चिन्हांची कोरीव नक्षी

हातातील माळ आणि मोदक हे समृद्धीचे प्रतीक मानले जाते

उत्तरायण व दक्षिणायण संक्रांतीच्या दिवशी सूर्योदयाची पहिली किरणे थेट मूर्तीवर पडतात, अशी मंदिराशी संबंधित श्रद्धा आहे

श्रद्धा, आख्यायिका आणि इतिहासाचा अनोखा संगम

मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायकानंतर महाराष्ट्रात उजव्या सोंडेची अशी वैशिष्ट्यपूर्ण सिद्धिविनायक मूर्ती वायगाव येथे असल्याची स्थानिक श्रद्धा आहे. त्यामुळे या मंदिराला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.महाभारतकालीन आख्यायिका, शेकडो वर्षांचा इतिहास आणि अखंड भक्तिपरंपरा यांचा संगम असलेले वायगावचे सिद्धिविनायक मंदिर आजही भाविकांसाठी श्रद्धेचे जागृत स्थान आहे. काळ बदलला, पिढ्या बदलल्या; मात्र वायगावच्या गणरायावरील भक्ती आणि विश्वासाची परंपरा आजही तितकीच अखंड आहे.

## संक्षिप्त

### खल्लार पोलीस स्टेशन हद्दीत २२ गावात एक गाव एक गणपती

**खल्लार/वार्ताहर**

गणेश चतुर्थीच्या पर्वावर घरोघरी गणपतीची स्थापना करण्यात आली.तर बऱ्याच ठिकाणी सार्वजनिक गणपतीची स्थापन करण्यात आली.पोलिस स्टेशन खल्लार हद्दीतील एकूण ३२ सार्वजनिक गणेश मंडळानी गणपतीच्या स्थापना शांततेत पार पडल्या आहेत.

यामध्ये नालवाडा,चिपर्डा,कसबेगव्हान,आराळा, कमालपूर या पाच गावांमध्ये एक गाव दोन गणपती बसविण्यात आले आहेत. तर २२ गावात एक गाव एक गणपतीची स्थापना करण्यात आली आहे. एकुण २७ गावांमध्ये ३२ गणपतीची स्थापना शांततेत पार पडली आहे. खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील गणेशोत्सव हा शांततेत पार पाडावा, उत्सवा दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठाणेदार अमोल मुडे सार्वजनिक गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करीत आहेत. गणेशोत्सव साजरा करीत असतांना डीजेला परवानगी देण्यात आली नाही. केवळ दोन बेस साऊंड सिस्टमला परवानगी दिली आहे त्यापेक्षा जास्त नाही. यामुळे डीजे साउंड सिस्टमला यावर्षी आळा बसला आहे.

### संत गजानन महाराज संजीवन समाधी दिनानिमित्त स्तोत्र पठण



**अमरावती-** ऋषीपंचमी तसेच संत गजानन महाराज यांच्या संजीवन समाधी दिनाचे औचित्य साधून पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात भक्तिमय वातावरणात सामूहिक स्तोत्र पठण व महाआरतीचे आयोजन करण्यात आले. या आध्यात्मिक उपक्रमामुळे महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.कार्यक्रमाची सुरुवात संत गजानन महाराजांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून करण्यात आली. त्यानंतर प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे स्तोत्र पठण केले. सामूहिक स्वरात करण्यात आलेल्या स्तोत्र पठणाने वातावरणात चैतन्य निर्माण झाले. त्यानंतर संत गजानन महाराजांची भक्तिभावाने महाआरती करण्यात आली.यावेळी 'गण गण गणात बोते' या पवित्र मंत्राचा सामूहिक जयघोष संपूर्ण परिसरात घुमला. भक्ती, श्रद्धा आणि सकारात्मक ऊर्जेने भारलेल्या या वातावरणामुळे विद्यार्थ्यांसह उपस्थित सर्वांना आध्यात्मिक अनुभूती मिळाली.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि संतपरंपरेचे संस्कार रुजावेत, तसेच सकारात्मक विचारांना चालना मिळावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'गण गण गणात बोते'च्या जयघोषात भक्तिमय वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# जिल्ह्यात जन्म-मृत्यूचे चार हजार ५२७ दाखले प्रलंबित

## डिजिटायझेशनचा अडथळा, जुन्या नोंदींच्या प्रक्रियेला 'ब्रेक'

**अमरावती/का.प्र**

वारसा हक्क,बँक व्यवहार, विमा किंवा मालमत्तेच्या कामासाठी आवश्यक असलेला जन्म-मृत्यूचा दाखला मिळविण्यासाठी नागरिकांना आता डिजिटायझेशनच्या प्रक्रियेत अडकावे लागत आहे. जुन्या नोंदींचे डिजिटायझेशन, कागदपत्रांची पूर्तता, आधार ओटीपी प्रमाणीकरण आणि जिल्हास्तरीय मंजुरी या प्रक्रियेमुळे जिल्ह्यात तब्बल ४ हजार ५२७ जन्म-मृत्यू दाखले प्रलंबित आहेत. यामध्ये ३ हजार १४८ जन्म दाखले आणि १ हजार ३७९ मृत्यू दाखल्यांचा समावेश आहे.

शासनाने बनावट जन्ममृत्यू दाखल्यावर आळा घालण्यासाठी क्यूआर कोड असलेले डिजिटल दाखले देण्याची व्यवस्था सुरू केली. सीआरएस नागरिक नोंदणी प्रणाली) पोर्टलवरून ही प्रक्रिया राबविली जात आहे. मात्र, जुन्या नोंदींचे डिजिटायझेशन पूर्ण झालेले नसल्याने प्रत्यक्षात या नव्या प्रणालीचा फटका नागरिकांना बसत आहे. जिल्ह्यातील या अडचणींबाबत वरिष्ठ स्तरावर मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. आवश्यक कागदपत्रांसह प्रक्रिया पूर्ण करून आलेले प्रस्ताव निकाली काढले जात असल्याचे जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

ग्रामपंचायतींकडील जुन्या जन्म-मृत्यू नोंदी अद्याप पूर्णपणे डिजिटल झालेल्या नाहीत. ८ जून २०२६ पासून 'अँड ओल्ड इव्हेंट' टॅबद्वारे जुन्या नोंदी डिजिटायझेशन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानंतर संबंधित नोंद जिल्हास्तरीय मंजुरीसाठी पाठविली जाते. प्रत्येक नोंदीसाठी आधार ओटीपीद्वारे प्रमाणीकरणाची अट असल्याने प्रक्रियेला आणखी वेळ लागत आहे.

मंजुरी मिळविण्यासाठी अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागत आहे. जुन्या मूळ प्रमाणपत्राची स्कॅन प्रत, नोंदणी रजिस्टरमधील नमुना १ आणि नमुना २ मधील नोंद तसेच निबंधकांकडे केलेल्या अर्जाची प्रत एकत्र करून पीडीएफ स्वरूपात सीआरएस पोर्टलवर अपलोड करावी लागते. यापैकी एखाद्या बाबीची पूर्तता न झाल्यास दाखला देण्याची प्रक्रिया पुढे सरकत नाही.मृत्यू दाखला हा केवळ एक प्रमाणपत्र नसून त्यावर अनेक महत्त्वाच्या कायदेशीर प्रक्रिया अवलंबून असतात. वारसा हक्क निश्चित करणे, बँक खाते आणि विम्याची प्रक्रिया, मालमत्ता हस्तांतरण यांसारखी कामे मृत्यू दाखल्याशिवाय अडकतात. त्यामुळे प्रलंबित दाखल्यांमुळे संबंधित कुटुंबांची गैरसोय वाढत आहे.

बोगस दाखले रोखणे आणि दाखल्यांची पडताळणी सुलभ करणे हा डिजिटल क्यूआर कोड प्रणालीमागील गासनाचा उद्देश आहे. मात्र, नवीन प्रणाली लागू करताना जुन्या नोंदींचे डिजिटायझेशन आणि प्रशासकीय प्रक्रिया परळीत होणे तितकेच आवश्यक आहे. अन्यथा बनावट दाखले रोखण्याच्या उद्देशाने सुरू केलेली व्यवस्था खरी रज असलेल्या नागरिकांसाठीच अडथळा ठरण्याची शक्यता आहे.

# बाबा, हिंदू राष्ट्र आणि मांस मच्छी!



**या** तीस वर्षाच्या तरुणाचे नाव आहे धीरेंद्र कृष्ण गर्ग.आता त्याला परमपूज्य गुरुदेव श्री धीरेंद्र कृष्ण शास्त्री महाराज वा बागेश्वर धाम सरकार असे संबोधले जाते. मध्य प्रदेशमधील बागेश्वर धाम या मंदिराचे ते प्रमुख आहेत. त्यांना तो वारसा घरातूनच मिळालेला आहे. म्हणजे पूर्वी वडील पुजारी होते. त्यापूर्वी आजोबा. हा मुलगा मात्र खूपच हुशार निघाला. लहानपणापासूनच गावातल्या लोकांसमोर व्याख्यान द्यायचा. मानसशास्त्रीय अभ्यास चांगला होता. समोरच्याच्या मनात काय आहे हे ओळखण्याची कला आत्मसात झाली. मनकवडा बनला. भक्तांना चमत्कार दिसू लागले. भक्त नमस्कार करू लागले. भक्तांची संख्या वाढली. घरातली गरिबी संपली.

दरम्यान अशा साधू संतांना हेरून त्यांचा वापर आपल्या राजकीय पोळ्या भाजण्यासाठी पुढारी मंडळीकडून होऊ लागला. निवडणुका जवळ आल्या की नुसत्या राजकीय नेत्यांच्या सभा लावून काम होत नव्हते. वातावरण निर्मितीसाठी अशा बाबा लोकांचे मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ लागले. प्रचंड पैसा खर्च करून लाखोंच्या संख्येने भाविक गोळा केले जाऊ लागले. मग त्या राजकीय पक्षांना साजेशी वक्तव्ये हे बाबा लोक जाहीरपणे करू लागले. बाबांसोबत व्यासपीठावर पंतप्रधान,मुख्यमंत्री, अनेक मंत्री दिसू लागले. बाबा लोकंही कधी 'हिंदू राष्ट्र बनाना है!' अशी गाणी गाऊ लागले. राजकारण आणि धर्म हातात हात घालून एकमेकांची काळजी करत आहे, असं चित्र निर्माण होऊ लागलं.

हा बाबाही काही मागे राहिला नाही. साक्षात पंतप्रधान मोदी साहेबांनी त्याला छोटा भाई म्हणून संबोधले होते. भक्तांची संख्या शेकडोहून हजारात, हजाराहून लाखांत आणि लाखांतून करोडोमध्ये कशी झाली कळलेच नाही. बाबा जे म्हणतील ते भक्त करायला लागले. बाबांनी हिंदू राष्ट्र स्थापन करण्याची मोहीम सुरु केली. लोकांच्या झुंडी सोबत येऊ लागल्या.


बंगालमध्ये तीन दिवसांचा कार्यक्रम होता. मुख्यमंत्री स्टेजवर होते. रात्री जेवायला सोबत होते. इतर मंत्री, आमदार, खासदार कार्यक्रमात होते. ठरल्याप्रमाणे हजारो लोकांच्या झुंडी होत्या. कार्यक्रम बंगाल मध्ये असला तरी लोकांमध्ये अनेक जन उत्तर भारतातील गो पट्ट्यातून तेथे नोकरी धंदा करण्यासाठी आलेले होते. बाबाने हिंदू राष्ट्र पिपाणी वाजवली. मग आपल्या आवडी निवडी सांगू लागले. 'मा दुर्गा के उत्सवमे आप लोग नॉनवेज खाते मुझे पसंद नही...तरह तरह का गंधा खाना बनाया जाता है...मुझे पसंद नही...आनेवाली नवरात्रीमे हर हिंदू जागे, और ऐसे लोगोको बाहर निकाले, वे पाखंडी है...' गर्दीतल्या उत्तर भारतीय लोकांनी प्रतिसाद दिला.

आपल्याभोवती जे तेज निर्माण झालेले आहे त्यामध्ये आप्पलपोट्या राजकीय नेत्यांचा जास्त वाटा आहे हे बाबा विसरले. पण हिंदू रीतीरिवाज, परंपरा, खानपान, देविदेवतांना भोग देण्याच्या प्रथा, या प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या असतात, हे बाबा विसरले. बंगालमध्ये मांस मच्छी चा भोग असतो. आसाममध्ये कामाख्या देवीसमोरही बळी दिला जातो. प्रत्येक ठिकाणी देवीदेवतांसमोर शाखाहारी नैवेद्यच दिला जातो असं नाही. बाबा आपल्या धुंदीत होते. समस्त हिंदूंना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न करत होते. पण झालं उलटंच!

बाबांनी खानपानावरून लोकांना डिक्टेट करण्याचा प्रयत्न केल्याबरोबर बाबांचे फोटो डोक्यावर घेऊन नाचणारे बंगालमधील भक्तही बिथरले. संपूर्ण राज्यभर लोकांनी बाबांच्या फोटोवर चप्पल चा वापर करून फटके मारले. बाबा मुर्दाबाद च्या घोषणा दिल्या. जनता शिवीगाळ करू लागली. सकाळ संध्याकाळ बाबांच्या सेवेत असलेले भाजपचे हिंदुप्रेमी मुख्यमंत्रीसुद्धा घाबरले. आपला आणि बाबाच्या बोलण्याचा काही संबंध नाही, हे दाखवू लागले. गुपचूप मंदिरात जाऊन मांस मच्छी खाऊ लागले. त्याचे व्हिडीओ आणि फोटो व्हायरल करू लागले. बाबावर कारवाई करा. गुन्हा दाखल करा. बाबांना अटक करा. लोक अशा मागण्या करू लागले. बाबाही घाबरले. 'मला असं म्हणायचं नव्हतं...चुकीचा अर्थ काढला...' असं लंगडं स्पष्टीकरण देऊ लागले. धर्म कुठलाही असो...लोकांच्या खाण्यापिण्यावर बंधनं घालायला लागलो की सगळं काही मुळासकट हलायला लागते

**दिलीप लाठी**

## गणेश वंदना



प्रथम पुजेचा
मान तुम्हा
अगाध तुमची
त्रिभुवनी किती..

कार्यारंभी करीता
हृदयस्थ प्रार्थना
विघ्ने सारी हरती
पुर्ण होती मनोकामना..

बुध्दीची देवता तुम्ही
देईजे मम सद् बुध्दी
कृपादृष्टीने होवो
माझी कार्य सिध्दी..

**अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

# फक्त ट्रेण्डमध्येच नाही, प्रत्यक्षातही मनोहारी होते ८० चे दशक..

**मा**गील दोन दिवसांपासून सोशल मीडियावर ८० च्या दशकातील छायाचित्रे, त्या काळातील गाणी, कपडे, सायकली, रेडिओ, दूरदर्शन, शाळेच्या आठवणी, जुन्या वस्तू, गावाकडचे जीवन आणि त्या काळातील शहरी संस्कृती पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर व्हायरल होताना दिसत आहे. 'आमच्या काळात असे होते', 'ते दिवसच वेगळे होते', '८० चे दशक म्हणजे खरे आयुष्य' अशा प्रतिक्रिया मोठ्या प्रमाणावर उमटत आहेत. आजच्या पिढीला हा काळ साधा, निरागस आणि सुंदर वाटतो. मात्र या गोड आठवणींच्या पडद्यामागे आर्थिक संघर्ष, सामाजिक बंधने, अपुऱ्या सुविधा आणि अनेक कठीण वास्तवही दडलेले होते. म्हणूनच ८० च्या दशकाकडे केवळ जुन्या आठवणींच्या भावनिक नजरेतून पाहण्याऐवजी त्या काळातील चांगुलपणा आणि मर्यादा दोन्ही समजून घेणे गरजेचे आहे.

**नाती घट्ट होती; पण कांही बंधनेही होती**

८० च्या दशकातील कुटुंबव्यवस्था आजच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर संयुक्त किंवा विस्तारित स्वरूपाची होती. एकाच घरात आई-वडील, मुले, आजी-आजोबा, काका-काकू, आत्या आणि चुलत भावंडे अशी अनेक माणसे एकत्र राहत असत. घर म्हणजे केवळ चार भिंती नव्हत्या; ते भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विश्व होते. वडील हे घरातील प्रमुख निर्णय घेणारे व्यक्तिमत्त्व मानले जात. त्यांचा शब्द अनेकदा अंतिम असे. मुलांनी मोठ्यांसमोर प्रश्न विचारणे किंवा आपले मत ठामपणे मांडणे अनेक घरांत सहज स्वीकारले जात नसे. आईची जबाबदारी तर प्रचंड असे. घर, मुले, शेती, जनावरे किंवा कौटुंबिक व्यवसाय सगळे सांभाळताना अनेक महिलांनी स्वतःच्या इच्छा आणि करिअरला दुय्यम स्थान दिले.

मुलांचे बालपण मात्र मोकळ्या जागांमध्ये फुलत असे. अंगण, रस्ते, शेत, माळरान आणि शाळेचे मैदान हीच त्यांची खेळाची मैदाने होती. लगोरी, कबड्डी, खो-खो, विटीदांडू, लपंडाव, गोट्या, भोवरा अशा खेळांतून शरीरासोबत मैत्री, संघभावना आणि कल्पकता विकसित होत असे. पण या नात्यांमध्ये प्रेमासोबत शिस्त, भीती, सामाजिक अपेक्षा आणि कुटुंबाच्या निर्णयांचे ओझेही होते. प्रेमविवाह, वेगळे करिअर किंवा मुलींनी स्वतंत्र जीवन निवडणे अनेकदा सहज स्वीकारले जात नसे.

शिक्षण म्हणजे सुविधा नव्हे, तर संघर्ष

आज इंटरनेट, स्मार्टफोन, ऑनलाइन शिक्षण, डिजिटल पुस्तके आणि असंख्य शैक्षणिक साधने सहज उपलब्ध आहेत. ८० च्या दशकात शिक्षण मिळवणे अनेक विद्यार्थ्यांसाठी संघर्षाचे होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळा किंवा महाविद्यालय गाठण्यासाठी मैलोनमैल चालावे लागे किंवा सायकलवर प्रवास करावा लागे. काही विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर शेती, मजुरी किंवा घरकामही करावे लागे. प्रत्येकाला नवीन पुस्तके मिळतीलच असे नव्हते. मोठ्या भावंडांची जुनी पुस्तके वापरणे, मित्रांकडून पुस्तके घेणे आणि वहीचा प्रत्येक पान जपून वापरणे सामान्य बाब होती. त्या काळात माहितीचा मुख्य आधार शिक्षक, पाठ्यपुस्तके, ग्रंथालये आणि वर्तमानपत्रे होते. माहिती कमी होती, पण तिची किंमत मोठी होती. शिक्षकांचे स्थानही वेगळे होते. शिक्षक म्हणजे केवळ विषय शिकवणारी व्यक्ती नव्हे, तर मार्गदर्शक आणि अनेकदा पालकासारखा आधार देणारी व्यक्ती असे. गरीब विद्यार्थ्याला पुस्तके मिळवून देणे, फी भरण्यास मदत करणे किंवा अभ्यासासाठी प्रोत्साहन देणे अशा अनेक आठवणी आजही अनेकांच्या मनात आहेत. अर्थात, त्या काळातील शिक्षणपद्धतीत कठोर शिस्त आणि शिक्षेची पद्धतही होती, जी आजच्या दृष्टिकोनातून स्वीकारार्ह वाटेलच असे नसली तरीही त्यातील अनेक बाबी महत्त्वाच्या होत्या.

समाजव्यवस्थेत जवळीक आणि कांही बंधनेही

मोबाईल आणि सोशल मीडिया नसल्यामुळे प्रत्यक्ष भेटीगाठींना मोठे महत्त्व होते. गावातील एखाद्या घरात लग्न असो, आजारपण असो, दुःखद घटना असो किंवा घरबांधणीचे काम शेजारी आणि नातेवाईक मदतीला धावून येत. आज आपण 'नेटवर्क' म्हटले की इंटरनेटची जोडणी डोळ्यांसमोर येते; त्या काळात नेटवर्क म्हणजे माणसांची जोडणी होती. मात्र त्या काळातील समाज पूर्णपणे आदर्श होता असे म्हणणे चुकीचे ठरेल. जात, धर्म, वर्ग, आर्थिक स्थिती आणि लिंग यांचा सामाजिक जीवनावर मोठा प्रभाव होता. अनेकांना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक संधी मिळवताना अडथळ्यांना सामोरे जावे लागे. आपुलकी होती, पण सामाजिक विषमताही होती. माणुसकी होती, पण रूढी आणि परंपरेची बंधनेही होती.

**स्त्रीजीवन, त्यागाच्या पलीकडचे वास्तव**

८० च्या दशकाच्या आठवणींमध्ये आईचा त्याग मोठ्या प्रेमाने सांगितला जातो. पण त्या त्यागामागील वास्तव समजून घेणेही महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागातील अनेक स्त्रिया पहाटेपासून रात्रीपर्यंत काम करत. पाणी भरणे, स्वयंपाक, मुलांचे संगोपन, जनावरांची देखभाल,



शेतीतील कामे आणि घरातील वयोवृद्धांची सेवा या सगळ्या जबाबदाऱ्या त्यांच्या खांद्यावर असत. मुलींच्या शिक्षणाबाबतही अनेक मर्यादा होत्या. 'मुलगी लग्न करून दुसऱ्या घरी जाणार' या मानसिकतेमुळे तिच्या शिक्षणावर किंवा करिअरवर खर्च करण्यास काही कुटुंबे तयार नसत. तरीही याच काळात अनेक महिलांनी शिक्षण घेतले, नोकरी केली आणि डॉक्टर, शिक्षक, परिचारिका, अधिकारी अशा विविध क्षेत्रांत त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. म्हणून त्या काळातील स्त्री ही केवळ त्याग करणारी आई किंवा गृहिणी नव्हती; ती परिस्थितीशी संघर्ष करत स्वतःच्या अस्तित्वासाठी जागा निर्माण करणारी व्यक्तीही होती.

**कमी साधने, पण काटकसर आणि कल्पकता**

८० चे दशक आजच्या उपभोगवादी संस्कृतीपेक्षा खूप वेगळे होते. वस्तू सहज उपलब्ध नसल्यामुळे प्रत्येक वस्तूची किंमत जाणवायची. कपडे वारंवार बदलले जात नसत. सणासुदीला नवीन कपडे घेणे ही मोठ्या आनंदाची गोष्ट असे. चप्पल किंवा बूट फाटले तर ते दुरुस्त केले जात. जुन्या वस्तू फेकून देण्याऐवजी त्यांचा पुनर्वापर केला जाई. 'वापरा आणि फेका'ऐवजी 'जपा, दुरुस्त करा आणि पुन्हा वापरा' ही जीवनशैली होती. रेडिओ, सायकल, घड्याळ किंवा घरातील एखादी वस्तू अनेक वर्षे वापरली जाई. वस्तूंची किंमत केवळ पैशांत नव्हे, तर त्यांच्याशी जोडलेल्या आठवणींमध्येही मोजली जात असे.

**मनोरंजन कमी, पण आनंद सामूहिक**

रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट, नाटक, जत्रा, तमाशा, भजन, कीर्तन आणि गावातील सांस्कृतिक कार्यक्रम ही मनोरंजनाची प्रमुख साधने होती. घरात टीव्ही असणे हीच मोठी गोष्ट होती. एखादा लोकप्रिय कार्यक्रम लागला की, घरातील सर्वजण एकत्र बसत. कधी शेजारी-पाजारीही कार्यक्रम पाहायला येत. आज प्रत्येकाच्या हातात स्वतंत्र स्क्रीन आहे परंतु नात्यात दुरावा असल्याचे दिसून येते, मात्र त्या काळात एकाच स्क्रीनसमोर अनेक माणसे बसत. मनोरंजन कमी होते, पण सामूहिक आनंद मोठा होता आणि नात्यामध्ये जवळीकता असल्याचे दिसून येते.

पत्रांची वाट पाहणारे जग आज एखाद्याला समाजम माध्यमाद्वारे एखादा संदेश पाठवल्यानंतर काही सेकंदांत उत्तर मिळते. ८० च्या दशकात मात्र पत्र म्हणजे भावना शब्दांत जपण्याची प्रक्रिया होती. एखाद्या व्यक्तीचे पत्र येण्यासाठी अनेक दिवस वाट पाहावी लागे. पोस्टमन गावात आला की त्याच्याकडे सगळ्यांचे लक्ष असे. पत्र मिळाल्यानंतर ते पुन्हा पुन्हा वाचले जाई. प्रतीक्षा ही त्या काळातील संवादाचा अविभाज्य भाग होती. कदाचित म्हणूनच संवाद कमी असला तरी ही त्या काळात त्याची भावनिक किंमत अधिक होती.

**पैसा कमी होता, पण माणूस उपलब्ध होता**

त्या काळाच्या आठवणींमध्ये सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे परस्पर सहकार्याची भावना. घरात अन्न कमी असले तरी पाहुण्याला जेवू घालणे, शेजाऱ्याच्या दुःखात सहभागी होणे, गरजू विद्यार्थ्याला पुस्तक देणे, आजारी व्यक्तीला दवाखान्यात घेऊन जाणे किंवा प्रवासात अनोळखी व्यक्तीला मदत करणे या छोट्या – छोट्या कृतींमधून माणुसकी जपली जात असे. लोक श्रीमंत नसतील, पण एकमेकांसाठी वेळ होता. पैसा कमी होता, पण श्रम देण्याची तयारी होती. साधने कमी होती, पण माणसे एकमेकांसाठी उपलब्ध होती. कदाचित हीच त्या काळाची खरी संपत्ती होती. वर्तमानात मुबलक साधने असताना सुद्धा नात्यांना वेळ दिला जात नसल्यामुळे अनेक नाती वेळे अभावी तुटताना दिसून येतात.

मग ८० चे दशक खरोखरच सुवर्णकाळ होता का? हा प्रश्न आज विशेष महत्त्वाचा आहे. सोशल मीडियावर ८० चे दशक अनेकदा अत्यंत सुंदर, निरागस आणि परिपूर्ण काळ म्हणून दाखवले जाते. पण कोणताही काळ पूर्णपणे सुंदर किंवा पूर्णपणे वाईट नसतो. ८० च्या दशकात नाती घट्ट होती; पण वैयक्तिक मात्र स्वातंत्र्यावर बंधनेही होती. शिक्षकांचा आदर होता; पण कठोरता आणि भीतीही होती. कुटुंब एकत्र होते; पण व्यक्तीच्या इच्छांना अनेकदा कमी महत्त्व मिळत असे.

स्त्रियांचा त्याग मोठा होता; पण त्यांच्या स्वातंत्र्याला मर्यादा होत्या. जीवन साधे होते; पण त्या साधेपणामागे आर्थिक संघर्षही होता. म्हणून ८० च्या दशकाचे खरे मूल्यमापन करताना त्यातील चांगुलपणा जपण्या सारखा आहे आणि मर्यादांमधून शिकण्यासारखेही आहे, हे मान्य करावे लागेल.

जुन्या काळात परत नाही; तर जुन्या मूल्यांकडे परत जाने महत्त्वाचे आज विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जीवनात अभूतपूर्व बदल झाले आहेत. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील व्यक्तीशी क्षणात संवाद साधता येतो. शिक्षणाच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. आरोग्य, वाहतूक, माहिती आणि रोजगाराच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे. मात्र या प्रगतीसोबत एक प्रश्नही उभा राहतो आपण सुविधा वाढवल्या, पण माणसांमधील अंतर तर वाढवले नाही ना? ८० च्या दशकाकडे परत जाण्याची गरज नाही. त्या काळातील प्रत्येक गोष्ट पुन्हा आणण्याचीही गरज नाही. पण त्या काळातील काही मूल्ये आजच्या जीवनात नक्कीच आणता येतील कुटुंबासाठी वेळ, शिक्षकांविषयी आदर, श्रमाची प्रतिष्ठा, वस्तूंची जपणूक, गरजूंना मदत, शेजाऱ्याशी आपुलकी, स्त्रीचा सन्मान, शिक्षणाची तळमळ आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणसाकडे माणूस म्हणून पाहण्याची दृष्टी ही ८० च्या दशकाकडून घेतली तर वर्तमान मानवी जीवन सुखी होण्यसाठी निश्चितच मदत होईल. म्हणूनच ८० च्या दशकाचे फोटो, गाणी आणि फॅशन व्हायरल होत असताना केवळ 'ट्रेंड' व्हायरल करण्यापेक्षा त्या काळातील 'मूल्ये' व्हायरल करण्याची वर्तमानात गरज आहे.

थोडक्यात ८० चे दशक हे केवळ जुन्या वस्तूंचे, जुन्या गाण्यांचे किंवा जुन्या फॅशनचे दशक नव्हते. ते कमी साधनांत आयुष्य उभे करणाऱ्या, संघर्ष करणाऱ्या, मुलांना शिकवणाऱ्या, कुटुंब सांभाळणाऱ्या आणि पुढच्या पिढीसाठी चांगल्या भविष्याची पायाभरणी करणाऱ्या एका पिढीचे प्रतिनिधित्व करते. साधने बदलतात, जीवनशैली बदलते, पिढ्या बदलतात; पण माणुसकी, आपुलकी आणि नात्यांची ऊब यांना कोणताही पर्याय नसतो. आज जुन्या काळात परत जाण्याची गरज नाही; गरज आहे ती जुन्या काळातील चांगुलपणा नव्या काळात आणण्याची.

**प्रा. अंबादास नरसिंगराव पाचंगे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री स्वामी समर्थ विद्याप्रसारक मंडळाचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रावळगाव,
ता. मालेगाव, जि. नाशिक,

# ८०च्या दशकाची मैफिली

***मोठमोठे केस, रंगीबेरंगी पोशाख, डोळ्यांवर भडक 'फंकी' गॉगल्स, नाट्यमय पोझ आणि चेहऱ्यावर आत्मविश्वासाचा ओघळता अंदाज... गेल्या काही दिवसांत इंस्टाग्राम उघडला, की जणू काळाची चक्रे अचानक चार दशकं मागे फिरल्याचा भास होतो. प्रत्येक 'फीड'वर एकच रंगत दिसते, ऐंशीच्या दशकाची. फरक एवढाच, की ही खरी कालयात्रा नाही; ती कृत्रिम बुद्धिमत्तेला मिसळलेली काळाची सरमिसळ आहे.***

**आ**जच्या एका साध्या सेल्फीला काही क्षणांत ऐंशीच्या दशकाचा साज चढतो आणि वर्तमानातील चेहरा अचानक जुन्या चित्रपटातील एखाद्या दृश्यात पोहोचल्यासारखा वाटू लागतो. केशरचना बदलते, पोशाख बदलतो, प्रकाश बदलतो आणि छायाचित्राचा संपूर्ण काळच बदलून जातो. हातातला मोबाईल जणू काळाचा दरवाजा उघडतो आणि त्या दरवाजातून माणूस स्वतःलाच एका वेगळ्या युगात भेटतो. कदाचित याच कल्पनेने सध्या इंस्टाग्रामवर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे.

या लाटेचे सर्वांत वेगळे वैशिष्ट्य म्हणजे तिने वय, व्यवसाय आणि सामाजिक स्थान यांची सीमा सहज ओलांडली आहे. अगदी लहान मुलांपासून तरुणाईपर्यंत आणि सामान्य वापरकर्त्यांपासून कलाकार, प्रभावशाली व्यक्ती व सार्वजनिक जीवनातील मोठ्या चेहऱ्यांपर्यंत प्रत्येकजण या डिजिटल कालयात्रेच्या प्रेमात पडलेला दिसतो. ज्यांनी ऐंशीचे दशक प्रत्यक्ष जगले, त्यांच्यासाठी हा विस्मृतीत गेलेल्या दिवसांचा एक हलकासा स्पर्श आहे; तर त्या काळात जन्मलेली नसलेली पिढी कल्पनेतून घडवलेल्या जगात स्वतःला पाहण्याचा आनंद घेत आहे. अशा प्रकारे अनुभवलेला आणि कधीही न अनुभवलेला काळ एकाच 'फ्रेम'मध्ये येऊन उभा राहिला आहे.

सोशल मीडियावरील कोणत्याही प्रवाहाची खरी ताकद त्याच्या नवलाईत असते; पण तो लोकांच्या मनात घर करतो, जेव्हा त्यात प्रत्येकाला स्वतःचा चेहरा दिसतो. ऐंशीच्या दशकातील या एआय ट्रेंडने नेमके तेच साधले आहे. दुसऱ्याची प्रतिमा पाहण्यापेक्षा स्वतःलाच एखाद्या वेगळ्या काळात पाहण्याचे आकर्षण अधिक तीव्र असते. 'मी त्या काळात असतो तर कसा दिसलो असतो?' या सहज उमटणाऱ्या प्रश्नाला तंत्रज्ञानाने प्रतिमेचे उत्तर दिले आहे. पूर्वी अशी कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी पोशाख, मेकअप, स्टुडिओ आणि छायाचित्रकाराची गरज होती. आता काही सूचनांमधून कल्पनाशक्तीला दृश्यरूप मिळते. हा बदल केवळ तांत्रिक नाही. दृश्यनिर्मितीच्या क्षेत्रात सामान्य माणसालाही सहभागी करून घेणारा तो बदल आहे. ज्याच्याकडे महागडी साधने नाहीत, व्यावसायिक कौशल्य नाही, त्यालाही आता आपल्या मनातले दृश्य आकार देता येते. एआयने सर्जनशीलतेच्या दारावरचा 'प्रवेश फक्त काहींसाठी' हा फलक पुसून टाकण्यास सुरुवात केली आहे.

पण या रंगीबेरंगी खेळाकडे थोडे थांबून पाहिले, तर आरशात एक वेगळाच चेहरा दिसतो. आपल्याला खरंच भूतकाळाची ओढ आहे की स्वतःला सतत नव्या रूपात पाहण्याची? सोशल मीडिया आपल्याला केवळ व्यक्त होण्याची संधी देत नाही; तो नकळत स्वतःची प्रतिमा घडवण्याची सवयही लावतो. आपण जसे आहोत तसे दिसण्यापेक्षा आपण कसे दिसू शकतो, याचे अनेक पर्याय आता काही क्षणांत उपलब्ध होऊ लागले आहेत.

आज आपण स्वतःला ऐंशीच्या दशकात पाहत आहोत. उद्या एखाद्या राजवाड्यातील ऐतिहासिक व्यक्तिरेखा, परवा भविष्यकाळातील एखादे रूप आणि त्यानंतर कदाचित पूर्णपणे काल्पनिक जगातील स्वतःची ओळख तयार करू. ही कल्पनाशक्तीची विलक्षण मुक्तता आहे; पण त्याच वेळी वास्तव आणि कृत्रिमतेमधील सीमारेषा हळूहळू पुसली जात असल्याचेही संकेत आहेत. याच तंत्रज्ञानाचा सर्वांत मोठा लाभ आणि सर्वांत मोठा धोका एकाच ठिकाणी दडलेला आहे, प्रतिमा आता केवळ टिपली जात नाही, ती घडवलीही जाते आणि जेव्हा घडवलेली प्रतिमा वास्तवाइतकीच विश्वासार्ह वाटू लागते, तेव्हा डोळ्यांनी पाहिलेल्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवण्यापूर्वी विचार करावा लागतो. आजचा हा ट्रेंड निरागस मनोरंजनाचा आहे; पण उद्याच्या जगात याच क्षमतेतून दिशाभूल, बनावट ओळखी आणि परवानगीशिवाय प्रतिमा तयार करण्याची आव्हानेही उभी राहू शकतात. या उत्साहात गोपनीयतेचाही प्रश्न महत्त्वाचा ठरतो. फोटो म्हणजे फक्त चेहरा नाही. त्याच्या चौकटीत घरातील तपशील, आजूबाजूचे वातावरण किंवा इतर व्यक्ती नकळत येऊ शकतात. एखादी प्रतिमा एआय सेवेकडे देताना आपण तिची एक

डिजिटल प्रत आपल्या वैयक्तिक चौकटीबाहेर पाठवत असतो. म्हणून भीती नव्हे, तर सजगता आवश्यक आहे. विशेषतः मुलांचे फोटो किंवा इतर व्यक्तींच्या प्रतिमा वापरताना उत्सुकतेइतकीच जबाबदारीही असली पाहिजे. या चमकदार जगाचा एक अदृश्य पैलू पर्यावरणाशीही जोडलेला आहे. एखादी प्रतिमा तयार करण्यासाठी लागणारी संगणकीय शक्ती एका व्यक्तीला नगण्य वाटू शकते. मात्र, लाखो लोक एकाच वेळी असंख्य आवृत्त्या तयार करू लागले, तर



त्या छोट्या क्लिकमागे मोठ्या प्रमाणावर ऊर्जा वापरली जाते. भविष्यात तंत्रज्ञानाकडे पाहताना 'हे शक्य आहे का?' या प्रश्नाइतकाच 'हे आवश्यक आहे का?' हाही प्रश्न महत्त्वाचा ठरेल. अर्थात, सोशल मीडियाचे प्रवाह कायमचे नसतात. आज ऐंशीचे दशक 'फीड' वर झळकत आहे; उद्या त्याची जागा दुसरा रंग, दुसरा काळा किंवा दुसरी कल्पना घेईल. काही दिवसांनी मोठे केस, फंकी गॉगल्स आणि जुन्या फिल्मची छटा दिसेनाशी होईल. पण या लाटेने आपल्या डिजिटल भविष्यासमोर उभा केलेला प्रश्न सहज नाहीसा होणार नाही. कारण य काही दिवसांनी आपल्याला एक महत्त्वाची गोष्ट दाखवून दिली आहे, आता माणूस केवळ आपला फोटो जतन करत नाही; तो स्वतःच्या शक्य असलेल्या अनेक रूपांच निर्मिती करत आहे. वास्तवातील 'मी' आणि कल्पनेतील 'मी' यांच्यामध्ये आता केवळ एखाद्या आरशाचे अंतर राहिलेले नाही, तर ते अंतर काही शब्दांच्या सूचनांनी भरून निघत आहे. आज एआय आपल्याला चार दशकं मागे घेऊन जात आहे. उद्या ते आपल्यासाठी अशी जगं उभी करेल, जी कधी वास्तवात अस्तित्वातच नव्हती. पण त्या जगांच्या चकाकीत वास्तव आणि कल्पना यांच्यातील सीमारेषा पुसली गेली, तर प्रश्न तंत्रज्ञान कि पुढे गेले याचा राहणार नाही; प्रश्न आपण स्वतःपासून किती दूर गेलो याचा असेल. कारण कितीही नवी रूपं निर्माण झाली, कितीही नवी जगं आपल्या पडद्यावर उभी राहिली, तरी त्या सगळ्या कृत्रिम प्रतिमांच्या गर्दीत आपला खरा चेहरा ओळखता आला पाहिजे. कदाचित एआयच्या या विलक्षण कालयात्रेतील सर्वांत मोठे आव्हानही तेच असेल.

**साक्षी माने**

# वान नदीतील उत्खननाविरोधात कायदेशीर नोटीस

## २.५६ लाख ब्रास उत्खननाच्या मंजुरीवर प्रश्नचिन्ह; 'गाळ' की 'वाळू' यावरून शासनाच्या नोंदीत विसंगती

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा तालुक्यातील दानापूर येथील वान नदीपात्रातून अकोला-खंडवा ब्रॉडगेज रेल्वे प्रकल्पासाठी सुरू असलेल्या उत्खननाला आता कायदेशीर आक्षेप घेण्यात आला आहे. नदीपात्रातील नैसर्गिक संपत्तीचे उत्खनन, रॉयल्टी, पर्यावरणीय परिणाम आणि परवानगी प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित करीत सामाजिक कार्यकर्ते तथा पर्यावरण अभ्यासक रजनीश पोटे यांनी केंद्र व राज्य शासनातील संबंधित अधिकारी, रेल्वे प्रशासन, कंत्राटदारांना कायदेशीर नोटीस बजावली आहे.



रेल्वे प्रकल्पासाठी नदीपात्रातील साहित्य काढून रेल्वे भरावासाठी वापरण्याचा प्रस्ताव देण्यात आला होता. जिल्हाधिकाऱ्यांनी ५ मे २०२६ रोजी २ लाख ५६ हजार ७९५.२५ ब्रास उत्खननास मंजुरी दिल्याचे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे. हे प्रमाण सुमारे ७ लाख २६ हजार ७३० घनमीटर इतके असून, १० घनमीटर क्षमतेच्या डंपरचा विचार केल्यास सुमारे ७२ हजार ७०० डंपर फेऱ्या होण्याचा अंदाज आहे.

### वान नदीच्या भवितव्याचा प्रश्न

नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर उत्खनन झाल्यास नदीकाठाची धूप, पात्राची अस्थिरता, भूजल पातळीवर परिणाम, नैसर्गिक प्रवाहात बदल तसेच जैवविविधतेला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या परिसराशी संबंधित पर्यावरणीय संवेदनशीलता लक्षात घेता या उत्खननाचे स्वतंत्र शास्त्रीय व पर्यावरणीय मूल्यांकन झाले आहे का, याचाही खुलासा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### जुन्या परिपत्रकाच्या आधारे मंजुरी?

उत्खननास मंजुरी देताना ज्या परिपत्रकाचा आधार घेण्यात आल्याचे सांगण्यात येते, ते परिपत्रक सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य व अवैध ठरविल्याचा दावा नोटिशीत करण्यात आला आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतरही संबंधित परिपत्रकाच्या आधारे मंजुरी देण्यात आली असल्यास त्याची कायदेशीरता तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच १७ मार्च २०२५ पासून लागू असलेल्या नवीन नियमावलीनुसार आवश्यक समिती, तांत्रिक मूल्यांकन आणि पुनर्स्थापन आराखड्याची पूर्तता करण्यात आली आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

### 'गाळ' की 'वाळू'?

या प्रकरणात शासनाच्या विविध विभागांच्या नोंदींमध्येच विसंगती असल्याचा दावा करण्यात आला आहे. पाटबंधारे विभागाच्या शिफारस पत्रात संबंधित सर्वे क्रमांकांवरील साहित्य 'गाळ' असल्याचे नमूद आहे. तर जिल्हा सर्वेक्षण अहवालात बहुतांश सर्वे क्रमांक 'रेती घाट' म्हणून नोंद असल्याचे नोटिशीत म्हटले आहे. त्यामुळे नदीपात्रातून नेमके गाळ काढण्यात येत आहे की वाळू व इतर गौण खनिज, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणातील नैसर्गिक संपत्तीचा वापर कोणत्या कायदेशीर तरतुदीनुसार करण्यात येत आहे, तसेच त्यासाठी रॉयल्टी किंवा अन्य शासकीय महसूल आकारण्यात आला आहे का, याचा खुलासा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### मंजुरी तीन मीटरची; खड्डे २० फुटांपेक्षा खोल?

दानापूर ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी २६ मे २०२६ रोजी उत्खननाच्या खोलीबाबत तक्रार केली होती. मंजूर मर्यादेपेक्षा अधिक खोलीपर्यंत उत्खनन करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. काही ठिकाणी २० ते २१ फूट खोल खड्डे पडल्याचे सांगण्यात आले आहे. अधिकृत पाहणीपूर्वी काही खड्डे मातीने बुजविण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात किती उत्खनन झाले, किती साहित्य बाहेर काढण्यात आले आणि त्याची नोंद कुठे करण्यात आली, याची स्वतंत्र व पारदर्शक मोजणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### रेल्वे प्रकल्पाला विरोध नाही

रेल्वे प्रकल्पाला विरोध नसून विकासाच्या नावाखाली वान नदीची दीर्घकालीन हानी होऊ नये, अशी भूमिका रजनीश पोटे यांनी स्पष्ट केली. वान नदी ही सार्वजनिक नैसर्गिक संपत्ती असून तिच्या वापराबाबत पारदर्शकता आवश्यक आहे. मुख्यमंत्री, रेल्वेमंत्री, जलसंपदा विभाग व जिल्हाधिकारी यांच्याकडे यापूर्वी पत्रव्यवहार तसेच माहितीच्या अधिकारातून माहिती मागवूनही समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याने कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा लागल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, वान नदीपात्रातून नेमके कोणते साहित्य काढले जात आहे, किती प्रमाणात उत्खनन झाले आणि त्याला कोणत्या कायदेशीर आधारावर मंजुरी देण्यात आली, याचा खुलासा प्रशासनाने करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

**Change In Name**

I have change my name From "SHEIKH MUMTAZ ABDUL HAQUE" (As per Old Passport Name/ Wrong Name) -TO- "SHAIKH MUMTAZ SHAIKH ABDUL HAQ SIKALGHAR" (New Name as per on Two Photo ID) Address (If as per old passport or if change then as per Adhar) "MILAN NAGAR NEAR GAUTAM BUDDHA STACHU NAIGAON AKOLA 444003" Passport No. "J1108542" FILE NO. NGPZ05034810

**Change In Name**

I have change my name From "MOHD FAIZAN ABDUL SATTAR" (As per Old Passport And Other Documents Name/ Wrong Name) -TO- "MOHAMMAD FAIZAN ABDUL SATTAR" (New Name as per on Two Photo ID) Address (If as per old passport or if change then as per Adhar) "S/O DEEPAK CHOWK NEAR KAZI BANGLOW, HASHAM SETH MEMON COLONY AKOLA Passport No. FILE NO.

**जाहीर नोटीस**

**वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, अकोला**

गैरअर्जदार / गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस. ( वाचा : आदेश ४१ नियम १४ )

Civil M.A. No. 475/2026 — Fix for: 12/10/2026
प्रोसेस नं.३२४८/२०२६ — तारीख : ०९/०९/ २०२६

बनाम : 1) Siddharth S/O Gopaldas Sarda, R/o Sufalkrupa, Pannalal Nagar, Amravati, Tq. and Dist. Amravati

ज्याअर्थी या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी 'APPLICATION U/S 73 OF THE INDIAN TRUST ACT, 1882' दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी चौकशी तारीख १२/१०/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वत: किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला १२/१०/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक ०९ माहे सप्टेंबर सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

अकोला.
दिनांक :- ०९/०९/२०२६ (शिक्का)
आदेशानुसार
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

**जाहीर नोटीस**

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५२४/२०२६ — प्रोसेस नं.११४७२/२०२६
चौ.ता. १९/१०/२०२६ — दिनांक : ०८/०९/२०२६

**अर्जदार :** १. जानकीराम विठ्ठलराव चोपडे २. मंगेश जानकीराम चोपडे रा. फ्लॅट नं. एम–१, मा. अंबा अपार्टमेंट, विद्या विष्णु सराफ कॉलेज जवळ, सातव चौक, अकोला. ता. जि. अकोला. ३. योगेश जानकीराम चोपडे अर्जदार क्र. १ व ३ रा. सुभाष रोड, तेलीपूरा, ताजनापेठ, अकोला. ता. जि. अकोला. ४. श्रीमती सीमा नरेश दळवी रा. तेलीपूरा, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कल्पना जानकीराम चोपडे
**पत्ता :-** रा. फ्लॅट नं. एम-१, मा. अंबा अपार्टमेंट, विद्या विष्णू सराफ कॉलेज जवळ, सातव चौक, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ८४४६५८३४४३

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कल्पना जानकीराम चोपडे यांचे दि. १९/१२/ २०१८ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# छातीवर दगड ठेवून शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या

## शंभू सेना सामाजिक संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अभिनव आंदोलन

### कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी





■ प्रतिनिधी | अकोला ■

पावसाने पाठ फिरवली, खरीप पिके संकटात आली आणि शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर कायम आहे. अशा दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची व्यथा शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी शंभू सेना सामाजिक संघटनेने मंगळवारी अनोख्या पद्धतीने आंदोलन केले.

छातीवर दगड ठेवून शेतकऱ्यांच्या व्यथा मांडत संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारचे लक्ष वेधले. जिल्ह्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यंदा अकोला जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अपुरे आणि अनियमित राहिल्याने अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यासह विविध खरीप पिकांच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून, पुढील हंगामाची चिंता त्यांच्यासमोर उभी ठाकली आहे.

शेतकरी अस्मानी संकटाबरोबरच आर्थिक संकटाचा सामना करीत आहे. काळजावर दगड ठेवून शेती वाचविण्याची धडपड करणाऱ्या शेतकऱ्यांची अवस्था शासनाने गांभीर्याने घ्यावी, या मागणीसाठी हे अभिनव आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.

### हेक्टरी एक लाख रुपये मदतीची मागणी

जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त व पावसाअभावी नुकसान झालेल्या गावांचे तातडीने सर्वेक्षण करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा. नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, तसेच पीक विम्याची नुकसानभरपाई तातडीने मिळवून द्यावी, अशी मागणी संघटनेने केली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन, व्याज सवलत व अन्य आवश्यक उपाययोजना कराव्यात. जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. पुढील हंगामासाठी बियाणे, खते व अन्य कृषी निविष्ठांसाठी आर्थिक मदत द्यावी. दुष्काळी सवलतींचा लाभ कोणताही पात्र शेतकरी वंचित राहणार नाही, यासाठी प्रशासनाने विशेष यंत्रणा उभारावी, अशी मागणीही करण्यात आली.

### २४ तास वीजपुरवठ्याची मागणी

सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांना पिके वाचविण्यासाठी सलग २४ तास वीजपुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेंतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळणारे प्रोत्साहनपर अनुदान ५० हजारांवरून दोन लाख रुपये करावे. तसेच २०१९ पूर्वी कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांचा या योजनेत समावेश करावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली.

### मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करणार

'शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा आधार आहे. मात्र, आज तो अस्मानी आणि सुलतानी संकटांच्या कचाट्यात सापडला आहे. शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेऊन मदत जाहीर करावी. अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी तीव्र आंदोलन करण्यात येईल,' असा इशारा शंभू सेना सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अश्विन उद्धवराव नवले यांनी दिला.

आंदोलनात बार्शी टाकळी तालुका प्रमुख सचिन आगाशे, सुभाष साबे, प्रमोद पाचपोर, राजेश दांडेकर, गणेश गोगे, सचिन चांभारे, अतुल ठाकरे, बाळुभाऊ कसुरकार, मधुकर सोनारगण, दीपक कळसाईत, गणेश खरात, मकरंद पाटोळे, सचिन सोनटक्के, शामकुमार वाघेले, राजेश शिंदे, योगेश वाल्हाळ, गोपाल सरोदे, अतुल बोके, आकाश मस्तूद, नितीन मंगलवार यांच्यासह शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

# मुंडगावात गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा; मंदिराचा जीर्णोद्धार



■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथील महात्मा ज्योतिबा फुले चौक, लालगोटा परिसरातील गणेश मंदिराचा जीर्णोद्धार करून नवीन गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व मंदिराच्या कळसाची स्थापना करण्यात आली.

यावेळी वैभव पिंपळे, दिनकर बहाकर, मंथन वानखडे, अंकुश वानखडे व तुषार भडंग महाराज यांच्या हस्ते विधिवत गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. तसेच मंदिराच्या जीर्णोद्धारानंतर कळसाची स्थापना करण्यात आली. या धार्मिक कार्यक्रमास वासुदेव फुसे, प्रविण गणगणे, कमलकिशोर पिंपळे, अंकित शेगोकार, राजू गणगणे, मिलिंद धनोकार, तृषार बहादुरे, पंकज सागोळे, ऋषिकेश बाहाकर, सौरभ अंबळकर, दिलीप म्हैसने, मेघशाम गणगणे, श्रीकृष्ण फुसे, विनायक गणगणे, उमेश दहिभात, ओमप्रकाश बहादुरे, गोपाल लहाने, अमोल बहादुरे, गजानन चिंचोलकर, सुभाष पिंपळे, राहुल नाथे, राजू नागोलकर, दादाराव नागोलकर, पुरुषोत्तम अंबळकार, गुलाब येवतकार, प्रमोद ताथोड यांच्यासह महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राणप्रतिष्ठा व कळस स्थापना सोहळ्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. याचा परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. मंदिराच्या जीर्णोद्धारासह धार्मिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्त विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# केळीवेळी येथे दोन ठिकाणी छापे; २१५ क्वॉर्टर देशी दारू जप्त

## १० हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात; दोघांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल

■ प्रतिनिधी | अकोट ■

दहिहंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केळीवेळी परिसरात सुरू असलेल्या अवैध देशी व विदेशी दारूविक्रीविरुद्ध पोलिसांनी धडक कारवाई करीत दोन ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत २१५ नग देशी दारूचे क्वॉर्टर जप्त करण्यात आले असून, जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १० हजार ७५० रुपये आहे.

केळीवेळी परिसरात पाच ते सहा ठिकाणी अवैध दारूविक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती दहिहंडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार गोपाल ढोरे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाईचे नियोजन करून दोन ठिकाणी छापे टाकले.

केळीवेळी बसस्थानक परिसरात पंचांसमक्ष झडती घेतली असता अरुण नारायण भटकर (५५, रा. केळीवेळी) याच्या ताब्यातून ९० एमएल क्षमतेचे १२५ देशी दारूचे क्वॉर्टर आढळून आले. या दारूची किंमत ६ हजार २५० रुपये आहे. तर दुसऱ्या कारवाईत किशोर विठ्ठल कानपूरे (२९, रा. केळीवेळी) याच्याकडून ९० एमएल क्षमतेचे ९० देशी दारूचे क्वॉर्टर जप्त करण्यात आले. जप्त दारूची किंमत ४ हजार ५०० रुपये आहे.

### दोघांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे

या प्रकरणी दहिहंडा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्रोहिबिशन ॲक्टनुसार दोघांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जप्त केलेल्या दारूचे नमुने पुढील तपासणीसाठी रासायनिक विश्लेषणाकरिता पाठविण्यात आले आहेत.

### सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कारवाईची मागणी

आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर केळीवेळी परिसरात अवैध दारूविक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी उर्वरित अवैध दारूविक्रीच्या ठिकाणांवरही कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. ठाणेदार गोपाल ढोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सतीश वानखडे व तपास अधिकारी रविराज डाबेराव यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# १३-१५ तासांचा कार्यभार, मानधन मात्र ७-८ तासांचे!

## तासिका प्राध्यापकांना किमान ९ तास अध्यापन देण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■



महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष अध्यापनाचा कार्यभार १३ ते १५ तासांपर्यंत पोहोचला असताना तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना मात्र केवळ ७ ते ८ तासांचेच अध्यापन देण्याचा प्रकार सुरू आहे. कार्यभार उपलब्ध असतानाही अध्यापन तास मर्यादित ठेवून प्राध्यापकांच्या मानधनावर गदा आणली जात असल्याचा आरोप करीत तासिका प्राध्यापकांना किमान ९ साप्ताहिक अध्यापन तास देण्यात यावेत, अशी मागणी रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेने केली आहे.

यासंदर्भात परिषदेचे अकोला जिल्हाध्यक्ष तथा विदर्भ सरचिटणीस ॲड. आकाश गुलाबराव हिवराळे यांच्या नेतृत्वाखाली उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. अजय खांबोरकर आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांना निवेदन देण्यात आले.

### कार्यभार एकीकडे, अध्यापन तास दुसरीकडे

शैक्षणिक सत्र २०२६-२७ मध्ये अनेक महाविद्यालयांमध्ये अध्यापनाचा प्रत्यक्ष कार्यभार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. काही ठिकाणी तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांकडे १३ ते १५ तासांचा अध्यापन कार्यभार उपलब्ध असतानाही त्यांना ७ ते ८ तासांपुरते मर्यादित ठेवण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. उपलब्ध कार्यभार आणि प्रत्यक्ष देण्यात येणारे अध्यापन तास यातील ही तफावत दूर करण्याची मागणी करण्यात आली.

### २०१७ ची संचमान्यता, २०२५-२६ चा कार्यभार; निकष कोणते?

२०१७ च्या संचमान्यतेचा आधार घेताना आणि २०२५-२६ मधील प्रत्यक्ष उपलब्ध कार्यभार विचारात घेताना वेगवेगळे निकष का वापरले जात आहेत, असा सवाल निवेदनातून उपस्थित करण्यात आला. तासिका प्राध्यापकांची नियुक्ती आणि अध्यापन तास निश्चित करण्यासाठी सर्व महाविद्यालयांना समान, पारदर्शक व न्याय्य निकष लागू करावेत, अशी मागणी करण्यात आली. मागण्यांचा तातडीने विचार करून तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना न्याय देणारे स्पष्ट आदेश निर्गमित करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी डॉ. रवींद्र तायडे, डॉ. धनंजय अमरावतीकर, प्रा. धम्मपाल गवई, प्रा. देवानंद जवंजाळ, अनुप तायडे यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### तासाला १२०० ते १५०० रुपये मानधन द्या

तासिका प्राध्यापकांची शैक्षणिक पात्रता, अध्यापनाची जबाबदारी आणि वाढलेली महागाई लक्षात घेता प्रति अध्यापन तास १२०० ते १५०० रुपये मानधन निश्चित करावे, अशी मागणी करण्यात आली. तासांची संख्या वाढविण्याऐवजी प्राध्यापकांच्या श्रमाला योग्य आर्थिक मोबदला मिळणे आवश्यक असल्याचेही परिषदेने स्पष्ट केले.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २७६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# दगडी पुलावर अपघाताचा सापळा



## संरक्षक कठडे गायब, खड्ड्यांचा कहर; शाळकरी मुलांसह नागरिकांचा जीव धोक्यात

**आर्वी/जनमाध्यम**

आर्वी शहरातील ऐतिहासिक दगडी पूल सध्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी धोक्याचा सापळा ठरत आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंना संरक्षक कठडे नसल्याने तसेच पुलाच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. विशेषतः पावसाळ्यात या धोक्याची तीव्रता आणखी वाढली असून खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांचा अंदाज येत नाही. अशा परिस्थितीत एखादे वाहन अनियंत्रित झाल्यास थेट नदीपात्रात कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे.

माळगण वॉर्डाकडे जाण्यासाठी हा पूल महत्त्वाचा आणि वर्दळीचा मार्ग आहे. दररोज या मार्गावरून मोठ्या संख्येने नागरिक तसेच शाळकरी मुले ये जा करतात. मात्र पुलाची अवस्था पाहता सुरक्षिततेच्या मूलभूत उपाययोजनांकडेच दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे. पुलावर संरक्षक कठडे नसल्याने रात्रीच्या वेळी धोका आणखी वाढतो. पावसामुळे रस्त्यावर चिखल आणि पाणी साचल्यास वाहनचालकांना खड्डे टाळणेही कठीण होते.

**अपघातानंतर जागे होण्याची वाट कशासाठी**

धोकादायक स्थिती असतानाही प्रशासनाने अद्याप ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. अपघात घडल्यानंतर पंचनामा आणि पाहणी करण्यापेक्षा अपघात होऊच नये यासाठी आधीच प्रतिबंधात्मक उपाय करणे गरजेचे आहे. एखादी दुर्घटना घडून जीवितहानी झाल्यानंतर प्रशासनाला जाग येणार का असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**खड्डे बुजवा आणि कठडे उभारा**

पुलावरील सर्व खड्डे तातडीने बुजवावेत. दोन्ही बाजूंना मजबूत संरक्षक कठडे बसवावेत. रात्रीच्या वेळी पुलाची सुरक्षितता वाढविण्यासाठी आवश्यक प्रकाशव्यवस्था करावी. तसेच पुलाची तांत्रिक पाहणी करून भविष्यातील धोका टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

आमदार खासदार नगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष द्यावे

या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन आमदार आणि खासदारांनी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करावा. नगरपालिका प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्त पाहणी करून पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे. शाळकरी मुलांसह हजारो नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित असलेल्या या पुलाकडे आता तरी प्रशासनाने गांभीर्याने पाहावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# म्हैस आडवी आली म्हणून गुराख्याचा जीव वाचला

वाघिणीच्या डरकाळीने चामला हादरले

सेलू आष्टीत वाघांचा मुक्त संचार तरी वनविभाग झोपेतच

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

समोर वाघीण आणि मृत्यू अवघ्या काही फुटांवर. हल्ला करण्यासाठी वाघीण सज्ज झाली असतानाच गुराखी आणि वाघिणीच्या मध्ये म्हैस आडवी आली आणि एका क्षणात परिस्थिती बदलली. चामला गावाच्या शेतशिवारात घडलेल्या या थरारक घटनेत म्हशीमुळे गुराख्याचा जीव थोडक्यात बचावला. वाघिणीच्या डरकाळीने संपूर्ण परिसर हादरला असून शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.

पोळ्याच्या आदल्या दिवशी एक गुराखी म्हशींचा कळप घेऊन शेतशिवारात गेला होता. अचानक कळप अस्वस्थ झाला आणि गुरे सैरावैरा पळू लागली. त्याचवेळी वाघीण आणि तिच्या तीन शावकांचा परिसरात वावर असल्याची चाहूल लागली. गुराखी खाली बसलेला असताना अचानक वाघीण त्याच्या समोर आली. वाघिणीने डरकाळी फोडत हल्ल्याची तयारी केली. मात्र त्याच क्षणी एक म्हैस गुराखी आणि वाघिणीच्या मध्ये आडवी आली.

काही क्षण म्हैस आणि वाघीण समोरासमोर उभ्या राहिल्या. परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. घटनेची माहिती मिळताच चार ते पाच नागरिक घटनास्थळी धावून आले. माणसांची चाहूल लागताच वाघीण जंगलाच्या दिशेने निघून गेल्याचे सांगण्यात येते.

सेलू आणि आष्टीत वाघांचा वावर वाढला. प्रश्न आता वनविभागाच्या कार्यक्षमतेचा चामला परिसरात वाघीण आणि तीन शावकांचा वावर असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे. सेलू तालुक्यातील रायपूर परिसरात वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यानंतरही वन्यप्राण्यांचा धोका कायम आहे. आष्टी तालुक्यातही शेतशिवारात वाघांचे दर्शन होत असल्याने शेतकऱ्यांना जीव मुठीत घेऊन शेतीची कामे करावी लागत आहेत.

एकीकडे वाघांच्या हालचाली वाढत आहेत आणि दुसरीकडे शेतकरी आणि गुराख्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत आहे. मग वनविभागाच्या गस्तीचे काय. नागरिकांना सुरक्षित ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना कुठे आहेत. वाघांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा कधी उभी राहणार. अशा प्रश्नांनी नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.

वाघीण आणि तिच्या शावकांच्या हालचालींवर वनविभागाने बारकाईने लक्ष ठेवावे. शेतशिवारात नियमित गस्त वाढवावी. नागरिकांना स्पष्ट सूचना द्याव्यात आणि संभाव्य हल्ला टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. म्हैस त्या क्षणी आडवी आली नसती तर काय झाले असते. या एका प्रश्नाने चामला परिसरातील नागरिकांच्या अंगावर काटा आणला आहे.

# मंगरूळमध्ये विद्यार्थ्यांची लोकशाही शाळा

## भ्रमणध्वनीवरील इव्हीएमद्वारे शालेय निवडणूक उत्साहात

**समुद्रपूर/जनमाध्यम**

जनता विद्यालय व कला कनिष्ठ महाविद्यालय मंगरूळ येथे शालेय प्रतिनिधी निवडणूक २०२६ उत्साहपूर्ण आणि शांततामय वातावरणात पार पडली.

विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेची ओळख व्हावी आणि मतदानाचे महत्त्व समजावे या उद्देशाने दरवर्षी शाळेत निवडणूक घेण्यात येते. यंदाच्या निवडणुकीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला.

भ्रमणध्वनीवरील इव्हीएम प्रणालीद्वारे मतदान घेण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह दिसून आला.

निवडणुकीत महानायक पदावर आदर्श विनोद डहाळकर यांची निवड झाली. मुलींच्या प्रतिनिधीपदी मीनाक्षी प्रकाश मंगाम यांची अविरोध निवड झाली.

क्रीडा नायकपदी वैभव शरद कुमरे तर वनमंत्रीपदी सोहम संजय भोयर यांची अविरोध निवड झाली. उत्सव नायकपदी अर्पित नामदेव तांदूळकर विजयी झाले.

निवडीनंतर प्राचार्य मंगेश चवडे यांनी विजयी प्रतिनिधींचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तसेच त्यांना पदाच्या जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शन केले. मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सतीश चतुर यांनी जबाबदारी सांभाळली. मतदान अधिकारी म्हणून स्नेहल गौर, सोनाली उपासे, नीलिमा ठाकरे आणि रंजना जोहरी यांनी काम पाहिले. इव्हीएमची तांत्रिक जबाबदारी शशिकांत कुरसंगे यांनी सांभाळली.

कोसुरकर आणि सातारकर यांचे सहकार्य लाभले. यावेळी शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आर्वीत २५ सप्टेंबरला भक्तिरसाची मैफील

कनिका ग्रोवर आणि अभिषेक शुक्ला यांच्या भक्तिगीतांनी रंगणार श्याम संकीर्तन

**आर्वी/जनमाध्यम**

आर्वी शहरात श्री श्याम भक्तांच्या भावविश्वाला साद घालणाऱ्या भव्य श्याम संकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सिंध गणेश उत्सव समिती आर्वी यांच्या वतीने शुक्रवार २५ सप्टेंबर रोजी हा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. प्रसिद्ध भजन प्रवाहक कनिका ग्रोवर निमच राजस्थान आणि अभिषेक शुक्ला कानपूर यांच्या भक्तिगीतांची विशेष मैफल यावेळी रंगणार आहे.

सायंकाळी साडेपाच वाजता संकीर्तनाला सुरुवात होणार असून प्रभू इच्छेपर्यंत हा



भक्तिसोहळा सुरू राहणार आहे. आर्वी शहरातील शेतकरी सहकारी जिनिंग आणि प्रेसिंग फॅक्टरी येथील आशीर्वाद कॉटन कॉर्पोरेशन देऊरवाडा रोड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्याम संकीर्तनाच्या माध्यमातून भक्तांना श्री श्याम प्रभूंच्या भक्तिरसात तल्लीन होण्याची संधी मिळणार आहे. भक्तिगीत आणि भजनांच्या सुरांनी संपूर्ण परिसर भक्तिमय होणार असून भाविकांमध्ये कार्यक्रमाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. श्री श्याम प्रेमी परिवाराच्या वतीने सर्व श्याम भक्तांना या संकीर्तन सोहळ्यासाठी सादर आमंत्रित करण्यात आले आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिरसाचा आनंद घ्यावा असे आवाहन सिंध गणेश उत्सव समिती आर्वी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दारूच्या व्यसनातून पतीची आत्महत्या

**हिंगणघाट** - दारू पिण्याच्या कारणावरून पत्नीसोबत वाद झाल्यानंतर वेगळे राहणाऱ्या व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नांदगाव येथे उघडकीस आली. प्रसेनजित धाबर्डे वय ३६ असे मृताचे नाव आहे. तो नांदगाव येथे एकटाच राहत होता. पत्नी आणि दोन मुले हिंगणघाट येथील संत तुकडोजी वार्डात भाड्याने राहत होते. मृतााला दारूचे व्यसन होते. तो अधूनमधून पत्नी व मुलांना भेटण्यासाठी हिंगणघाटला येत असे. घटनेच्या रात्री नांदगाव येथील घरातून दुर्गंधी येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पत्नीने नातेवाईकांसह तेथे धाव घेतली. पोलिसांच्या उपस्थितीत घरात प्रवेश केला असता प्रसेनजित धाबर्डे हा टिनाच्या आड्याला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. त्याच्या मृत्यूबाबत कोणताही संशय नसल्याचे पत्नीने पोलिसांना सांगितले. हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरु आहे.

# उपचारानंतर घरी आणले अन् मृत्यू

**आर्वी** - प्रकृती अचानक बिघडल्याने रुग्णालयात उपचार करून घरी आणलेल्या ज्येष्ठ व्यक्तीचा दुसऱ्या दिवशी मृत्यू झाल्याची घटना आर्वी येथे घडली. नारायण सीताराम नागरीकर वय ५१ असे मृताचे नाव आहे. ते जनता नगर परिसरात राहत होते. ते फर्निचरचे काम करीत होते. मागील अनेक वर्षांपासून त्यांना दारूचे व्यसन होते. काही काळापासून त्यांनी दारू पिणे बंद केले होते. प्रकृती बिघडल्याने कुटुंबीयांनी त्यांना आर्वी येथील रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासणी करून रक्तदाब वाढल्याचे सांगत उपचार केले. त्यानंतर त्यांना घरी आणून झोपविण्यात आले. सकाळी कुटुंबीयांनी आवाज दिला असता कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले. दारूमुळेच त्यांचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज मुलाने व्यक्त केला. मृत्यूबाबत कोणताही संशय नसल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. आर्वी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# पाणीपुरीच्या गाडीवरून वाद; चमच्याने नाकावर वार

**पुलगाव** - पाणीपुरी देण्यास उशीर होत असल्याच्या कारणावरून झालेल्या वादात युवकाच्या नाकावर स्टीलच्या मोठ्या चमच्याने वार करून जखमी केल्याची घटना फुटाणा लाईन परिसरात घडली. उमेश नेवारे वय ३६ रा इंदिरानगर पुलगाव यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दिली. उमेश हे मित्र शुभम राऊत आणि सुलतान खान यांच्यासह फुटाणा लाईनकडे गेले होते. त्यांनी मनोज बघेल यांच्या पाणीपुरीच्या हातगाडीवर पाणीपुरी मागितली. त्यावेळी पाणी तयार करीत असल्याने थोडा वेळ लागेल असे मनोज यांनी सांगितले. कामाला जायचे असल्याने उमेश यांनी लवकर पाणीपुरी देण्यास सांगितले. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला. मनोज यांनी शिवीगाळ करून हाताने मारहाण केली आणि पाणी देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्टीलच्या चमच्याने उमेश यांच्या नाकावर वार केला. यात त्यांच्या नाकाला दुखापत होऊन रक्तस्राव झाला. पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# वळूंनी घातला गावात धुमाकूळ

## अनेक नागरिक जखमी, वाहनांची नासधूस, ग्रामसभेचा ठराव कागदावरच

**साहूर/जनमाध्यम**

येथील गाव गोठ्यातील सांड्याने सध्या गावकऱ्यांची झोप उडवली असून त्याचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत आहे. या सांड्याच्या हल्ल्यात आतापर्यंत अनेक नागरिक जखमी झाले असून दुचाकी तसेच चारचाकी वाहनांवरही तो हल्ला करीत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हल्लेखोर सांड्याचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे केली आहे.

गाव गोठ्यात सांड नसल्याने गाईंना फळविण्यासाठी काही वर्षांपूर्वी या सांड्याची व्यवस्था करण्यात आली होती. सुरुवातीला शांत असलेला हा सांड अलीकडे आक्रमक झाला आहे. नागरिकांचा पाठलाग करून त्यांच्यावर हल्ला करण्याबरोबरच वाहनांना शिंगावर घेऊन फेकण्याचे प्रकारही सुरू आहेत. त्यामुळे अनेक वाहनांचे नुकसान



झाले आहे.

१५ सप्टेंबर रोजी ऑटोचालक तुषार दंडाळे यांचा ऑटो सांड्याने शिंगावर घेऊन फेकल्याने वाहनाचे नुकसान झाले. यापूर्वीही अनेक नागरिकांना या सांड्याच्या हल्ल्याचा फटका बसला आहे. विशेष म्हणजे ऑगस्ट महिन्यात झालेल्या ग्रामसभेत ग्रामस्थांच्या मागणीनुसार या सांड्याचा बंदोबस्त करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. सर्वसाधारण ग्रामसभेत सांड्याला पकडून गोरक्षण केंद्रात देण्याचा निर्णयही घेण्यात आला. मात्र ठराव होऊनही अद्याप प्रत्यक्ष कारवाई झालेली नाही.

ग्रामपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हा सांड गावात मोकाट फिरत असून रस्त्यावर दिसताच नागरिक आणि लहान मुले जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळत आहेत.

त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. एखाद्याचा जीव गेल्यानंतरच ग्रामपंचायत प्रशासन जागे होणार का असा संतप्त प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

सांड्याचा वाढता उपद्रव लक्षात घेता प्रशासनाने आणखी एखादी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करून त्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## जलस्रोत वाचवा, पर्यावरण जपा; व्हीजेएम ऑक्सिजन पार्कमध्ये गणेश विसर्जनाची व्यवस्था

**वर्धा/जनमाध्यम**

वैद्यकीय जनजागृती मंच, इंडियन रेड क्रॉस सोसायटी आणि ग्रामपंचायत पिपरी (मेघे), वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने मागील अकरा वर्षांपासून पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदाही व्हीजेएम ऑक्सिजन पार्क, पिपरी (मेघे), आर्वी रोड, वर्धा येथे गणेश विसर्जनासाठी विशेष कुंडाची व्यवस्था करण्यात आली आहे. हे कुंड दि. १५ ते २५ सप्टेंबर अनंत चतुर्दशीपर्यंत नागरिकांसाठी उपलब्ध राहणार आहेत.

गेल्या वर्षी वर्धा शहर व परिसरातील तीन हजारांहून अधिक घरगुती आणि सार्वजनिक गणेशमूर्तींचे विसर्जन या कुंडामध्ये करण्यात आले होते. विसर्जनानंतर जमा झालेल्या मातीचा पुनर्वापर करून गणेशमूर्ती तयार करण्यात आल्या, तर निर्माल्यापासून खत तयार करून त्याचा वापर झाडांसाठी करण्यात आला. यंदा वर्धा जिल्ह्यात अत्यल्प पर्जन्यमान झाल्याने नदी, नाले, विहिरी व बंधाऱ्यांमध्ये मर्यादित पाणीसाठा उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत



गणेशमूर्ती, रासायनिक रंग आणि निर्माल्यामुळे जलस्रोत प्रदूषित होऊ नयेत, यासाठी नागरिकांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

गणपती बाप्पाच्या मूर्ती नदी, विहीर किंवा इतर जलस्रोतांमध्ये विसर्जित न करता आपल्या घरी अथवा नगरपालिका, ग्रामपंचायत आणि स्वयंसेवी संस्थांनी उपलब्ध करून दिलेल्या विसर्जन कुंडातच विसर्जित करावी,' असे आवाहन वैद्यकीय जनजागृती मंचचे अध्यक्ष डॉ. सचिन पावडे यांनी केले आहे. 'गणेशभक्तीही, पर्यावरणाची भक्तीही' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत नागरिकांनी या पर्यावरणपूरक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जादूटोण्याच्या संशयातून दाम्पत्यावर तलवारीने हल्ला

**पुलगाव** - मुलीवर जादूटोणा केल्याचा आरोप करीत दाम्पत्याने कुटुंबातील व्यक्तींवर लाकडी काठी आणि तलवारीने हल्ला केल्याची घटना गुंजखेडा परिसरात घडली. याप्रकरणी यशवंत धुर्वे आणि सीमा धुर्वे यांच्याविरुद्ध पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी घरातील टीव्ही दुरुस्त करण्यासाठी व्यक्तीला बोलावून आणण्यासाठी जात असताना आरोपी दाम्पत्य रस्त्यावर उभे होते. सीमा हिने फिर्यादीला अडवून मुलीवर जादूटोणा केल्याचा आरोप केला आणि मुलगी बरी करून देण्याची मागणी केली. त्यानंतर लाकडी काठीने पाठीवर मारहाण केली. तसेच तलवारीने डोके हात कान छाती आणि खांद्यावर वार करून जखमी केल्याचा आरोप आहे. फिर्यादीच्या पत्नीला देखील मारहाण करण्यात आली. मुलगी बरी न झाल्यास फिर्यादी आणि त्याच्या मुलाला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# जुन्या वादातून आई मुलाला काठीने मारहाण

**समुद्रपूर** - दारू पाजल्याच्या कारणावरून झालेल्या जुन्या वादातून युवकासह त्याच्या आईला काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना गणेशपूर येथे घडली. कन्हैया खडसे वय २७ आणि त्यांची आई मालुबाई खडसे वय ५० यांनी याबाबत पोलिसांत तक्रार केली. कन्हैया गावातील चौकात बजरंगबली मंदिराजवळ उभा असताना आदित्य उर्फ बंटी कुरसंगे हातात काठी घेऊन तेथे आला. त्याने कन्हैयाच्या पाठीवर काठीने मारहाण केली. त्यानंतर आदित्यचे आई वडील अरविंद कुरसंगे आणि शालू कुरसंगे यांनी कन्हैयाला पकडून ठेवले आणि बंटीने त्याच्या कपाळावर काठीने मारून जखमी केले. जखमी मायलेकाला उपचारासाठी समुद्रपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२११ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे

(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक - २९०

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१

फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com



## पंढरीची वारी; गणरायाच्या चरणी श्रद्धेचा सोहळा

*लाखे परिवारात गणपती बाप्पाची स्थापना करण्यात आली असून, यंदाचे हे २८ वे वर्ष आहे. गणेशोत्सवानिमित्त यावेळी पंढरीच्या वारीचा भावनिक व भक्तिमय देखावा साकारण्यात आला आहे. विठ्ठुरायाच्या नामघोषात आणि वारकऱ्यांच्या भक्तिभावाने सजलेला हा सुंदर देखावा साक्षी लाखे यांनी साकारला आहे.*

## माधवराव डांगे यांचे निधन

**वर्धा** - स्थानिक पंजाबराव कॉलनी परिसरातील रहिवासी उच्च श्रेणी आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्राप्त माधवराव डांगे (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात सहा मुली, जावई, नातवंडे असा बराच मोठा परिवार आहे. त्यांच्यावर स्थानिक हिंदू स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयामध्ये पोषण सप्ताह साजरा



**अमरावती/प्रतिनिधी:-** स्थानिक विदर्भयुथ वेलफेअर सोसायटी, अमरावती.द्वारा संचालित इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय अमरावतीगृह अर्थशास्त्र विभागाद्वारे पोषण महासप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये नरेंद्र भिवापूरकर विद्यालय येथे विद्यार्थ्यांना पोषणाविषयी जागरूकता निर्माण करणे, आरोग्य, स्वच्छता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच तेथील विद्यार्थ्यांना पोषण सप्ताहाच्या निमित्ताने फळांचे वाटप केले गेले.

पोषण सप्ताह निमित्त महाविद्यालयामध्ये पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विशेषतः कडधान्यांपासून तयार केलेले पदार्थ या स्पर्धेत ठेवण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अजय कोल्हे यांनी केले ,तर परीक्षक म्हणून प्राध्यापक डॉक्टर नीता गिरी श्री शिवाजी कला ,वाणिज्य, महाविद्यालय यांनी परीक्षण केले .

प्रथम क्रमांक पल्लवी गोरले एम. ए. भाग दोन, तर द्वितीय क्रमांक वैष्णवी कटलाम, तृतीय क्रमांक पायल मसराम यांनी मिळवला. कार्यक्रमाच्या यशस्वीततेकरिता गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर सीमा आढाऊ,प्राध्यापक डॉक्टर पुनम चौधरी,डॉक्टर अनुराधा पाथरकर, डॉक्टर योगिता टिक्कस, भाग्यश्री उगले यांनी परिश्रम घेतले.

---

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार यांनी दिलेल्या व माहिती अधिकारावरून मी जाहीर नोटीस देतो ती याप्रमाणे...

माझे पक्षकार हे खालील दिलेल्या लोकांची जमीन विकत घेत आहे. तसेच खालील दिलेल्या वर्णनाचे शेतीबाबत कोणालाही आक्षेप, हिस्सा व इतर अधिकार अथवा गहाण वा बोजा असल्यास ७ दिवसांच्या आत आपला आक्षेप नोंदवावा. त्यानंतर कुठलाही आक्षेप विचारात घेणार नाही.

**जमीन मालकांची नावे:**
१) श्री. राजेंद्र भास्करराव देशमुख
२) श्री. अशोक रामकृष्ण निमकर्डे
३) श्री. मनीष पर्वतराव देशमुख

**मालमत्तेचे वर्णन:**
मौजा : डिगरगव्हाण
सर्वे नं. : ७३
क्षेत्रफळ : १ हेक्टर ४१ आर
आकार : ५.३०

सदर नोटीस दिनांक १५/०९/२०२६

**पक्षकाराचे अधिवक्ता**
**अँड. वि. अ. सावरकर**
**रामनगर, नागपूर**
**मो. ९९७०१७६२६३**

---

## अमरावती महानगरपालिका, अमरावती.
## कार्यकारी अभियंता-२ विभाग

Email ID:-

**क्र. अमनपा/का.अ-२/नि.सु.क्र./१९/२०२६** **दिनांकः- १५/०९/२०२६**

मा. आयुक्त यांचे वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अन्वये अमरावती महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता-२ विभागामार्फत ई-निविदा कामासाठी अमरावती महानगरपालिकेत योग्यश्रेणीत नोंदणी करण्यात आलेल्या कंत्राटदाराकडून ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागविण्यात येत आहे.

**ई-निविदा प्रसिध्दीचा तपशीलः-**

| | |
|---|---|
| **ई - निविदा प्रसिध्दी** | दिनांक १५ /०९/२०२६ |
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड प्रारंभ (Start) | दिनांक १५/०९/२०२६ दु. ४.०० वाजेपासुन |
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त (End) | दिनांक २४/०९/२०२६ दु. ४.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दिनांक १५/०९/२०२६ दु. ४.०० वाजेपासुन |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांक २४/०९/२०२६ दु. ४.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक (Technical) | दिनांक २५/०९/२०२६ दु. ४.०० वाजता (शक्य झाल्यास) |

(Financial) ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ Mail व SMS द्वारे कळविण्यात येईल.
निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचना पाहवण्यास मिळेल.

**(सुहास चव्हाण)**
**कार्यकारी अभियंता-२**
**महानगरपालिका, अमरावती.**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१८१७/२०२६**
**पुंजाबाई व इतर वि.निरंक**
**पुढील ता.२६.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-** १. **पुंजाबाई नामदेवराव निकोरे,** वय ८० वर्षे, व्यवसाय- घरकाम रा.मराठी शाळेजवळ, तेलीपुरा, जुनी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती
२. **अमोल नामदेवराव निकोरे,** वय ३६ वर्षे, व्यवसाय- मजुरी रा.तेलीपुरा, जुनी वस्ती,अमदापुर, बडनेरा, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत नामदेवराव पांडुरंग निकोरे** हे दिनांक **०७.११.२०२५** रोजी तेलीपुरा, जुनी वस्ती अमदापुर, बडनेरा, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार पुंजाबाई नामदेवराव निकोरे व एक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पुंजाबाई नामदेवराव निकोरे व एक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०९.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

---

## नावात बदल

**जुने नांव -**
**अजहरोद्दीन जैनुलआबेद्दीन**
**नविन नांव -**
**मोहम्मद अजहरोद्दीन काजी**
**मोहम्मद जैनुलआबेद्दीन काजी**

**मोहम्मद अजहरोद्दीन काजी**
**मो.नं.:- ७९७२३१३२५९/ ८७९३४२०९९६**

---

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

---

## CHANGE IN SPOUSE NAME

Passport No:-P2378748
FILE NO:-NG1060679932417
**SPOUSE OLD NAME**
**SUMAIYYA NAAZ ABDUL NISAR**
**SPOUSE NEW NAME**
**SUMAIYA NAAZ ABDUL NISAR**
**Address**
AT. POST. PATHROT TQ. ACHALPUR,
DIST AMRAVATI-444808

---

## जाहीर नोटिस

### विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब क. स्तर, मोर्शी

आर. एम. जे. सी. क्र. ५८६/२०२६ ने. ता. २७/१०/२०२६

**अर्जदार - १. श्रीमती सुनंदा श्रीकृष्ण काळकर** वय -६५ वर्ष धंदा -घरकाम
**२.मनोज श्रीकृष्ण काळकर** वय -३५ वर्ष धंदा -शेती
**३. गोकुळ श्रीकृष्ण काळकर** वय -२९ वर्ष धंदा शेती
सर्व रा. अंबाडा ता. मोर्शी जि. अमरावती.

**विरुध्द- कोनीही नाही**

सर्व लोकास नोटिसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ चे पती तर अर्जदार क्र. २ व ३ चे वडील नामे **श्रीकृष्ण नारायणराव काळकर** हे दि. १२.०७.२०२६ रोजी अंबाडा ता. मोर्शी जि. अमरावती येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मृतकाचे वारस असुन त्याचे व्यतीरिक्त मृतकाला दुसरे कोनीही वारस नाही. मयताचे वारसांना विविध शासकिय व निमशासकिय कार्यालयीन कामाकरीता वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदारांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यास वि. दिवाणी न्यायाधीश मोर्शी येथे अर्ज केला असुन अर्जावर कोनालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी प्रसिध्दी तारखेपासुन एक महिण्याचे आंत वि. कोर्टात आपले म्हणणे सादर करावे अन्यथा तुमचे गैरहजेरीत अर्जावर सुनावनी होवून निर्णय दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
शिक्का **दिवानी न्यायालय मोर्शी**

---

## सायटेशन / जाहिरनामा

### विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत

आर.एम.जे.सी.क. ५६८/२०२६ ने. ता. २२/१०/२०२६

**अर्जदार- १. शेख यासीन शेख जाफर,** वय-७९ वर्ष, धंदा-मजुरी रा. अंबाडा, ता. मोर्शी, जि. अमरावती.

**// विरूध्द //**
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदाराचे वडील नामे **शेख जाफर शेख सुलेमान** हे दिनांक ०५/०५/२००० रोजी Ambada, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मरण पावलेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

आदेशान्वये
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय,**
शिक्का **मोर्शी**

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. आर. आर. खामतकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज : १८२३/२०२६ **सुमन चार वि निरंक** पुढील तारीख ३०.०९.२०२६

**जाहिरनामा / सायटेशन**

**अर्जदार-१.सुमन रत्नाकर तिवाटणे** वय- ८१ वर्षे, व्यवसाय -घरकाम ता. जि. अमरावती **२. सुरज रत्नाकर तिवाटणे** वय- ५६ वर्षे, व्यवसाय -व्यापार **३ सुबोध रत्नाकर तिवाटणे** वय -५४ वर्षे, व्यवसाय व्यापार नं. २ व ३ दोघेही रा. गांधी चौक जवळ, अंबागेट, अमरावती, **४.शिल्पा विनय अंधारे,** वय -५२ वर्षे, व्यवसाय- घरकाम रा. प्लॉट नं. ११/१२/१३, उत्कर्ष बंगलो, गंगापुर रोड, आकाशवाणी टॉवर जवळ, पुरणवाड नगर, नाशिक, ता. जि. नाशिक **५.हेमा विकास तवटे** , वय ४८ वर्षे, व्यवसाय घरकाम रा. तवटे मार्केट, खैरे वस्ती, मलकापुर रोड, सातारा, ता. जि. सातारा

**निरंक- विरुध्द**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत रत्नाकर भास्कर तिवाटणे** हे दि ०८.१०.२०२५ रोजी य अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **सुमन रत्नाकर तिवाटणे + ४** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्छु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा सुमन रत्नाकर तिवाटणे ४ वरीलप्रमाणे सवहुँ मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सबहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सवहू मयत यांच वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. ४,०९ २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

आवेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
शिक्का **वरीष्ठ स्तर, अमरावती**

---

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर)**
**श्री. जयदिप गोवर्धन पांडे यांचे न्यायालयातील**

नियमित दिवाणी दावा के. ३०७/२०२५ ने.ता.०५-१०-२०२६

**अंजली रत्नाकर गायकवाड अधिक चार** वादी.
... विरुध्द....
**राज्य सरकार तर्फे जिल्हाधिकारी प्रतिवादी**

**वादी- १. अंजली रत्नाकर गायकवाड** वय ५० वर्षे व्यवसाय गहीणी
**२. रेखा रत्नाकर गायकवाड** वय ७० वर्षे व्यवसाय -गृहीणी
अर्जदार क्र. १ व २ रा. राजापेठ पोस्ट राजापेठ, ता. जि. अमरावती
**३. राहुल रत्नाकर गायकवाड,** वय ४८ वर्षे, व्यवसाय नोकरी
**४ उमेश रत्नाकर गायकवाड,** वय ४७ वर्षे, व्यवसाय नोकरी
**५ सोनाली सुशांत दांडे,** वय -४४ वर्षे, व्यवसाय- गृहीणी
अर्जदार क्र. ३ ते ५ रा. शत्रुंजय गगन सरीता कॉम्लेक्स, अचोळे रोड, नवनित हॉस्पीटल मागे, अचोळे तलाव, नालासोपारा वसई ईस्ट पालघर, महाराष्ट्र ४०१२०९

**प्रतिवादी :.**
**१. महाराष्ट शासन तर्फे मा. जिल्हाधिकारी अमरावती**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, वरील वादी **अंजली रत्नाकर गायकवाड अधिक चार** यांनी वरील न्यायालयामध्ये **रत्नाकर हसप्पा गायकवाड** हे दि. १५-०२-२०१९ पासून बेपत्ता असल्याबाबत दिवाणी मृत्यु झाल्याची घोषणा होणे बाबत दावा दाखल केलेला आहे.त्यापेक्षा वरील बाबत कोणास हरकत घ्यावयाची असल्यास त्यांचे दाव्याचे सुनावणी करीता **दिनांक ०५/१०/२०२६** रोजी **सकाळी ११.०० वा.** वरील न्यायालयामध्ये स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे, वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आदेशानुसार
**दिवाणी न्यायालय**
शिक्का **वरीष्ठ स्तर,अमरावती**

---

**सायटेशन / जाहिरनामा**

**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क. ५९६/२०२६ ने. ता ३१/१०२०२६

**अर्जदार- १) श्रीमती सुनिता प्रकाशराव पवार,** वय-४९ वर्ष, धंदा-घरकाम
**२) कु.नेहा प्रकाश पवार,** वय-२७ वर्ष, धंदा-घरकाम
**३) कु. मोहिनी प्रकाश पवार,** वय-२२ वर्ष, धंदा-शिक्षण
**४) मोहित प्रकाशराव पवार,** वय-१७ वर्ष, धंदा-शिक्षण अर्जदार नं.४ करीता अ.पा. क. आई अर्जदार नं.१ सर्व रा. अंबाडा, ता. मोर्शी, जि. अमरावती.
**५) सौ. पल्लवी पंकज पेढेकर,** वय-३१ वर्ष, धंदा-घरकाम रा. चाचोंदी, ता. जि. अमरावती.

**// विरूध्द // कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं. १ चे पती तर अर्जदार नं.२ ते ५ चे वडील नामे **प्रकाश विठ्ठल पवार** हे दिनांक ०५/११/२०२५ रोजी Ambada, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

आदेशान्वये
शिक्का **सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, मोर्शी.**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१८९९/२०२६**
**श्रीमती दुर्गा वि.निरंक**
**पुढील ता.२७.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Durga Mahadevrao Barde,** Age 54 years. Occu.:- Household
2. **Rohit Mahadevrao Barde,** Age 31 years. Occu.: Working
Both R/o. Moti Nagar, Juni Vasti, Badnera, Amravati (M.S.)- 444701
3. **Pragati Gangadhar Salve**, Age 29 years. Occu.: Household
C/o. Gangadhar Salve Wazar Sarkate,
Po. Bellora Dist. Jalana, Maharashtra- 444701

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Mahadeo Vishwanath Barde हे दिनांक **०६.०१.२०२४** रोजी बडनेरा, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार दुर्गा महादेवराव बरडे व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **दुर्गा महादेवराव बरडे** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०८.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१७६७/२०२६**
**पल्लवी व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.२९.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Pallavi Shrikant Isokar,** Age 42 years. Occu.: Household
2. **Sanket Shrikant Isokar,** Age 20 years. Occu.: Education
3. **Smt. Chaya Devidas Isokar**, Age 74 years. Occu.: Household
All R/o. Gadge Nagar, Behind the Poonam Photo Studio,
Shivaji Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत श्रीकांत देविदास इसोकार** हे दिनांक **२८.०६.२०२६** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार पल्लवी व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पल्लवी व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०२.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

---

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर
### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **शेख बन्नु शे.समसु** पत्ता बिलनपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.---- संगणक मालमत्ता क्र.**ACHA0000/3959** जुना मालमत्ता क्र.**15000775** नझुल शिट क्र.**२३ सी** प्लॉट नं.५८ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **मोई इस्माईल म. इस्माईल** या नावाने असून वरील अर्जदार यांनी **शेख बन्नु शे समसु** या नावाने फेरफार घेण्याकरिता या कार्यालयामध्ये दिनांक ------------- रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
**पुर्वेस** - मस्जीद
**पश्चिमेस** - सरकारी रस्ता
**उत्तरेस** - खोलपुरे यांचे घर
**उत्तरेस** - खुली जागा

**स्वा/-**
**मुख्याधिकारी,**
शिक्का **नगर परिषद, अचलपूर**

---

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर
### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **मो.यासीन मो.इस्हाक** पत्ता महल वार्ड देवडी, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२१ संगणक मालमत्ता क्र.**ACHA000/15805** जुना मालमत्ता क्र.**21000876** नझुल शिट क्र.**२४ बी** प्लॉट नं.**१७६/१** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **म.इसाक मो.सुलतान** या नावाने असून वरील अर्जदार यांनी **१. मो.यासीन मो.इस्हाक, व २. मो.युसुफ मो.इस्हाक** या नावाने फेरफार घेण्याकरिता या कार्यालयामध्ये दिनांक ------------ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
**पुर्वेस** - महालात जाण्याचा रस्ता
**पश्चिमेस** - न.प.मेन रोड
**उत्तरेस** - महालात जाण्याचा रस्ता
**उत्तरेस** - रहमानिय स्कुल

**स्वा/-**
**मुख्याधिकारी,**
शिक्का **नगर परिषद, अचलपूर**

---

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर
### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **निसावर खॉ सरदार खॉ,** पत्ता किल्ला चौधरी मैदान, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.१८ संगणक मालमत्ता क्र.**ACHA0000/3200** जुना मालमत्ता क्र.**18000478** नझुल शिट क्र.**२४ ए** प्लॉट नं.**१५१** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **खाजे खॉ उमर खॉ,** या नावाने असून वरील अर्जदार यांनी **निसावर खॉ सरदार खॉ** या नावाने फेरफार घेण्याकरिता या कार्यालयामध्ये दिनांक **३१.०९.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
**पुर्वेस** - प्लॉट नंबर १५२
**पश्चिमेस** - प्लॉट नंबर १५०
**उत्तरेस** - प्लॉट नंबर १५१
**उत्तरेस** - रस्ता

**स्वा/-**
**मुख्याधिकारी,**
शिक्का **नगर परिषद, अचलपूर**

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयामधील**
**किरकोळ (R.M.J.C.) क्र.२२८/२०२६** **ने.ता.१७.०९.२०२६**

१. गणेश मधुकरराव पिंपळकर रा.मंगरुळ चव्हाळा,ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

**// वि.//**

१. तुळशीदास मधुकरराव पिंपळकर रा.मंगरुळ चव्हाळा,ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
२. सुनंदा मारोतराव देवरणकर, रा.देलवडी, ता.आष्टी, जि.वर्धा
३. संध्या प्रभाकर भालेराव रा.आमला विश्वश्वर, ता.चांदूर रेल्वे, जि.वर्धा

ज्याअर्थी मयत **मधुकर रामाजी पिंपळकर** यांचा मृत्यू दि.**०३.०८.२०१५** मध्ये **मंगरुळ चव्हाळा,ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती** येथे झाला. मयताचे पत्नी नामे **सुमीरा मधुकर पिंपळकर** यांचा मृत्यू दि.३०.०३.२०२४ मध्ये मंगरुळ चव्हाळा,ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. **मयतांचे अर्जदार नं. १ हा मुलगा असून गैरअर्जदार नं. १ हा मुलगा व गैरअर्जदार नं.२ व ३ हया मुली आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १४ ऑगस्ट २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा.दिवाणी न्यायालय,
नांदगाव खंडेश्वर

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक १३
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मोर्शी येथे १९ व २० सप्टेंबर रोजी तिसरे महानुभाव साहित्य संमेलन

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्र, विदर्भ साहित्य संघ, शाखा रिध्दपूर, श्रीचक्रधर स्वामी अष्टशताब्दी सोहळा समिती, मोर्शी आणि भारतीय विद्या मंदिर संचालित भारतीय महाविद्यालय, मोर्शी यांच्या संयुक्त विद्यमाने मोर्शी शहरातील परशूराम पॅलेस येथे १९ व २० सप्टेंबर व्दीदिवसीय तिसरे महानुभाव साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या दोन दिवसीय महानुभाव साहित्य संमेलनामध्ये वैचारिक परिसंवादासह विविध उपक्रमांची रेलचेल राहणार आहे.

संमेलनाची सुरुवात शनिवार, १९ सप्टेंबर रोजी सकाळी ८:०० वाजता भव्य ग्रंथदिंडीने होईल. श्रीकृष्ण मंदिर, धांडे ले-आऊट परिसर येथून निघून ही दिंडी संमेलनस्थळी पोहोचेल. त्यानंतर सकाळी १०:०० वाजता पहिल्या सत्रात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते संमेलनाचे रितसर उद्घाटन होईल. संमेलनाध्यक्ष म्हणून सर्वज्ञ विद्यापीठ, माळवाडगांव, जि. अहिल्यानगर येथील कुलगुरू आचार्य महंत श्रीहंसराजदादा खामणीकर, प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ साहित्य संघ, नागपूरचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, रिध्दपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, भारतीय विद्या मंदीर, अमरावतीच्या अध्यक्ष डॉ. आराधना वैद्य, न्या. डॉ. कीर्ती कुलकर्णी, डॉ. अलका गायकवाड, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, श्रीकृष्ण मंदीर ट्रस्ट,




अमरावतीचे अध्यक्ष सुभाषराव पावडे,भारतीय महाविद्यालय, मोर्शीचे प्राचार्य डॉ. संतोष आगरकर प्रामुख्याने उपस्थित राहतील. यावेळी हर्षीकरबाबा शेवलीकर (कुसळंब, जि. सोलापूर), नगरचौकी, मनमाड येथील विजयराज पंजाबी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

दुस-या सत्रात 'महानुभाव पंथाचे वर्तमानकालीन सृजनात्मक साहित्य' या विषयावर परिसंवाद होणार असून मानव विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे अध्यक्षस्थानी असणार आहेत. तिस-या सत्रात कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूर येथील कवी, लेखक, पत्रकार बळवंत भोयर अध्यक्षस्थानी राहतील.२० सप्टेंबर रोजी सकाळी ९.०० वाजता चवथ्या सत्रात मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश अवलगावकर यांची प्रकट मुलाखत, त्यानंतर 'महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभाव पंथाचे योगदान' या विषयावर दुस-या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी मराठी भाषा विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे राहतील.'महानुभाव दर्शनशास्त्र : स्वरुप व वैशिष्टया' विषयावर पाचवे सत्र होणार असून अध्यक्षस्थानी आचार्य महंत अष्टूरकर बाबा राहतील.

रविवारी २० सप्टेंबर रोजी दुपारी ३:०० वाजता संमेलनाचा समारोप होईल. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू आचार्य महंत श्रीहंसराज दादा खामणीकर, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे तसेच विद्यापीठ अधिसभा सदस्य ॲड. अमोल ठाकरे, आचार्य पाचराऊतबाबा, डॉ. आण्णा वैद्य, प्रशांत भागवतकर,अनंत सोमवंशी, प्राचार्य डॉ. संतोष आगरकर उपस्थित राहणार आहेत. दोन दिवस चालणा-या या वाड्.मयीन व सांस्कृतिक सोहळ्याला साहित्यप्रेमी, अभ्यासक आणि नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्राचार्य डॉ. संतोष आगरकर, डॉ. महंत सोनपेठकर, महंत श्रीगोपिराजबाबा शास्त्री (नवे) व आयोजन समितीने केले आहे.

## संक्षिप्त



### साऊर-तळवेल मार्गावर धोकादायक खड्डा

**टाकरखेडा शंभू-**साऊर गावाजवळील साऊर ते तळवेल मार्गावर मोठ्या प्रमाणात लांब-रुंद नालीसारखा खड्डा पडला असून, या खड्डयामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सदर मार्ग चांदूरबाजारकडे जाणारा प्रमुख मार्ग असल्याने या रस्त्यावर दिवसरात्र मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते.पावसामुळे खड्डयात पाणी साचत असल्याने त्याची खोली व रुंदी वाहनचालकांच्या लक्षात येत नाही. विशेषतः दुचाकीस्वारांना हा खड्डा धोकादायक ठरत असून अनेकजण या खड्डयात पडून अपघातग्रस्त होत असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. रात्रीच्या वेळी तर परिस्थिती अधिकच गंभीर बनते.रस्त्यावरील हा धोकादायक खड्डा तातडीने बुजवून रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहनचालक व परिसरातील नागरिकांकडून होत आहे. संबंधित विभागाने मोठा अपघात होण्यापूर्वी तातडीने उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**छायाचित्र : संतोष शेंडे,** टाकरखेडा शंभू

### मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

कुऱ्हा-पिपलाज माता संस्थान (मोठी देवी संस्थान), कुऱ्हा आणि श्री गुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय गुरुकुंज मोझरी यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. लक्ष्मणसिंग लालसिंग मिमरोट यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विशेष मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.हे आरोग्य शिबीर १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत मोठी देवी संस्थान, कुऱ्हा येथे आयोजित करण्यात आले आहे. शिबिरामध्ये मधुमेह व वात व्याधी यासंदर्भात नागरिकांची आरोग्य तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.आयुर्वेदाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीबाबत जनजागृती करणे तसेच विविध आरोग्य समस्यांवर योग्य उपचार व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, हा या शिबिराचा प्रमुख उद्देश आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञांकडून आरोग्यविषयक सल्ला मोफत मिळणार असल्याने परिसरातील नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

### श्री संत गजानन महाराज मंदिरात ऋषिपंचमी सोहळा

**टाकरखेडा शंभू-**तळवेल येथील श्री संत गजानन महाराज



मंदिरात ऋषिपंचमी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री संत गजानन महाराज सेवा समिती व श्री संत गजानन महाराज भक्त परिवार, तळवेल यांच्या वतीने विविध धार्मिक व भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार,१६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता भजनी कलेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या भक्तिमय सोहळ्यास सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहून श्री संत गजानन महाराजांचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन श्री संत गजानन महाराज सेवा समिती व श्री संत गजानन महाराज भक्त परिवार, तळवेल यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### फुलआमला येथे ऋषीपंचमी उत्साहात व भक्तिभावाने साजरी

**अमरावती-**श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा सुंदर संगम घडविणारा ऋषीपंचमीचा पवित्र सोहळा फुलआमला येथे मोठ्या उत्साहात



व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. उद्योजक अमोल चवणे यांच्या फुलआमला येथील शेत परिसरात असलेल्या श्री संत गजानन महाराज मंदिरात ऋषीपंचमीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मंदिरात विधिवत विशेष पूजा-अर्चा,आरती व धार्मिक विधी पार पडले. भक्तांनी मोठ्या श्रद्धेने मंदिरात उपस्थित राहून श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.धार्मिक विधीनंतर उपस्थित भाविकांसाठी प्रसादाचे आयोजन करण्यात आले.या प्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला. कार्यक्रमाला चवणे परिवारातील सर्व सदस्य तसेच फुलआमला येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

### संत गुणवंत महाराज जयंती उत्सव

**टाकरखेडा संभू-**येथून नजीकच्या असलेल्या लसनापूर येथे



संत गुणवंत महाराज यांच्या ३३ व्या जयंती उत्सवानिमित्त राष्ट्रीय किर्तनकार सप्तखंजिरी वादक सत्यपाल महाराज यांचे जाहीर किर्तन १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७.०० वाजता शिवाजी चौक, लसनापूर येथे आयोजन करण्यात आले आहे. सत्यपाल महाराजांच्या सत्यवाणीतून संतमहिती, आजच्या ताज्या घडामोडीवर सप्तखंजेरी च्या सुरात प्रबोधन ऐकायला मिळणार आहे.तरी परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त ग्रामवासी लसनापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### चांदूरबाजारात डिजेवर कारवाई

**बेलोरा-**गणेशोत्सवादरम्यान ध्वनी प्रदूषण करणाऱ्या डिजेवर




सम्राट चांदूरबाजार पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली आहे. चांदूरबाजार पोलिस गस्तीवर असताना श्रीकृष्ण मंदिर वलगाव रोड, चांदूरबाजार येथे सम्राट बॅन्जो नावाचा डिजे मोठ्या आवाजात वाजवत होता. पोलिसांनी तेथे जाऊन डिजे मालक नरेश रमेशराव वानखडे रा. माधान याला कागदपत्रे मागितली. तेव्हा त्याने कोणतेही कागदपत्र नसल्याचे सांगितले. ज्या चारचाकी वाहनावर डिजे ठेवला होता, त्या वाहनाला नंबरप्लेट नव्हती. ही कारवाई पोलिस निरीक्षक आधारसिंग सोनोने यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक प्रदीप धोंडे, रवींद्र बावणे, आशिष राऊत, जितेश सावरकर, संकेत चोरे, सुहास पोटे, वैभव आकोटकर यांच्या पथकाने केली.

# संत गजानन महाराज संजीवन समाधी दिनानिमित्त पोटे पाटील अभियांत्रिकी सामूहिक स्तोत्र पठण

**अमरावती/का.प्र.**

ऋषीपंचमी तसेच संत गजानन महाराज यांच्या संजीवन समाधी दिनाचे औचित्य साधून पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात भक्तिमय वातावरणात सामूहिक स्तोत्र पठण व महाआरतीचे आयोजन करण्यात आले. या आध्यात्मिक उपक्रमामुळे महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कार्यक्रमाची सुरुवात संत गजानन महाराजांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून करण्यात आली. त्यानंतर प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे स्तोत्र पठण केले. सामूहिक स्वरात



करण्यात आलेल्या स्तोत्र पठणाने वातावरणात चैतन्य निर्माण झाले. त्यानंतर संत गजानन महाराजांची भक्तिभावाने महाआरती करण्यात आली. यावेळी 'गण गण गणात बोते' या पवित्र मंत्राचा सामूहिक जयघोष संपूर्ण परिसरात घुमला. भक्ती, श्रद्धा आणि सकारात्मक ऊर्जेने भारलेल्या या वातावरणामुळे विद्यार्थ्यांसह उपस्थित सर्वांना आध्यात्मिक अनुभूती मिळाली.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती,अध्यात्म आणि संतपरंपरेचे संस्कार रुजावेत,तसेच सकारात्मक विचारांना चालना मिळावी,या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य,उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.'गण गण गणात बोते'च्या जयघोषात भक्तिमय वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे ऋषी पंचमीनिमित्त भाविकांची गर्दी

**कुऱ्हा/वार्ताहर**

ऋषी पंचमीच्या पावन पर्वानिमित्त श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे आज पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विदर्भातील विविध भागांसह दूरवरून आलेल्या भाविकांनी मंदिरात दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. वर्धा नदीच्या तीरावर वसलेल्या या धार्मिक स्थळी दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

ऋषी पंचमीच्या निमित्ताने भाविकांनी पहाटे नदीत स्नान करून विधिवत पूजाअर्चा केली. त्यानंतर मंदिरात जाऊन देवदर्शन घेतले. अनेक महिला भाविकांनी ऋषी पंचमीचे व्रत व उपवास करून पूजा केली. विविध धार्मिक विधी, आरती आणि नामस्मरणामुळे मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण अनुभवायला मिळाले. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता मंदिर परिसरात आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना कोणतीही अडचण होऊ नये यासाठी रांगेची व्यवस्था करण्यात आली. तसेच परिसरात स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि सुरक्षेच्या दृष्टीने



आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कुऱ्हा पोलीस स्टेशनचे कर्मचारी व स्वयंसेवकांनी सहकार्य केले.ऋषी पंचमीच्या निमित्ताने कौंडण्यपूर परिसरातील स्थानिक दुकानदार, व्यावसायिक आणि प्रसाद विक्रेत्यांमध्येही उत्साहाचे वातावरण होते. दिवसभर भाविकांची ये-जा सुरू राहिल्याने कौंडण्यपूर नगरीला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. श्रद्धा, भक्ती आणि धार्मिक परंपरेचा संगम अनुभवण्यासाठी आलेल्या भाविकांमुळे संपूर्ण परिसर गजबजून गेला होता. ऋषी पंचमीच्या निमित्ताने कौंडण्यपूर येथे भक्तांनी मनोभावे पूजा-अर्चा करून सुख-समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली.

## ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगमध्ये गणरायाची स्थापना



**चांदूर रेल्वे-**ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, चांदूर रेल्वे येथे गणेशोत्सवानिमित्त श्री गणरायाची भक्तिमय वातावरणात उत्साहात स्थापना करण्यात आली. पहिल्या दिवसाची प्रथम आरती डॉ. निलेश विश्वकर्मा आणि चांदूर रेल्वेच्या नगराध्यक्षा प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांच्या शुभहस्ते करण्यात आली. डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या आश्विनी सुरकार, शिक्षक महेश नागरे, सतीश सोनूने, शिक्षिका अंजली मोटवाणी तसेच महाविद्यालयातील इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# मानवी प्रगतीचे प्रवेशद्वार मूळ शिक्षण-प्रा.डॉ.जगदीश सोनवणे

**अमरावती/का.प्र.**

जो समाज शिकला त्याच समाजाने व्यवस्थेवर अधिराज्य गाजवले. मानवी जिवनाच्या एकूणच प्रगतीचे मूळ शिक्षणात आहे. म्हणूनच बाबासाहेबांनी आपल्याला 'शिका' हा मूलमंत्र दिला. त्या अनुषंगाने तमाम शोषितसमूहांनी, बहुजनांनी तथा आंबेडकरवाद्यांनी, शिक्षणव्यवस्थे बाबत सजग व कृतीशील असणे अत्यंत गरजेचे आहे. 'असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक तथा विचारवंत प्रा.डॉ.जगदीश सोनवणे (अहिल्यानगर) यांनी केले. मंगलपर्वावर, अमरावतीच्या साईनगर येथिल नालंदा बुद्ध विहाराच्या वर्षवासाच्या मंगल



पर्वावर कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते. बुद्ध विहाराचे अध्यक्ष एकनाथ वासनिक प्रमुख पाहुणे म्हणून धम्ममंचावर उपस्थित होते. तथागत सम्यक संबुद्ध, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिबा ज्योतीराव फुले व मातोश्री रमाई यांच्या प्रतिमांच्या अभिवादनाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. नालंदा बुद्ध विहाराच्या वतीने मान्यवरांना शाल-सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

बुद्ध विहार समन्वय समितीच्या वतीने देवा शेंडे, ज्ञानेश्वर रोकडे व त्यांचे सहकारी, माळी समाज संघटनेचे वतीने डॉ.उमप, श्रीकृष्ण दहीकर, प्रा.संतोष कुर्हेकर यांनी तर चर्मकार समाजसंघाच्या वतीने दिनेश चापके, शेकोकर, पानझाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी साहित्यिक डॉ.जगदीश सोनवणे यांना सन्मानित केले. प्रज्ञासूर्य कल्याणकारी प्रतिष्ठान व नालंदा बुद्ध विहाराच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रविण राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन सूरज मंडे यांनी व आभार दादाराव तायडे यांनी केले. कार्यक्रमाला परिसरातील बौद्ध, उपासक-उपासिका, प्रज्ञासूर्य कल्याणकारी प्रतिष्ठान चे सर्व पदाधिकारी, ओबीसी समाज प्रतिनिधी व विद्यार्थी यांची भरगच्च उपस्थिती होती.

# गणित संबोध परीक्षेत ४ शाळांतील २८४ विद्यार्थ्यांसह

## तालुक्यात ४७८ विद्यार्थ्यांनी नोंदविला सहभाग

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूर तालुका गणित अध्यापक मंडळाच्या वतीने आयोजित गणित संबोध परीक्षा आदर्श हायस्कूल, दर्यापूर येथे उत्साहपूर्ण व सुरळीत वातावरणात पार पडली. या परीक्षा केंद्रावर आदर्श हायस्कूल दर्यापूर, रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर, प्रबोधन विद्यालय दर्यापूर आणि आदर्श सेल्फ फायनान्स इंग्लिश मिडीयम स्कूल दर्यापूर या चार शाळांमधील एकूण २८४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

परीक्षेदरम्यान अमरावती जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे माजी अध्यक्ष राजेंद्र गायगोले तसेच ज्येष्ठ शिक्षक अनिल भारसाकळे यांनी परीक्षा केंद्राला



सदिच्छा भेट देऊन परीक्षा सुरळीतपणे सुरू असल्याचे पाहून समाधान व्यक्त केले . तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती येथिल शिवाजी ऑफसेटच्या परीक्षा विभागाचे प्रमुख एम. टी. ठाकरे यांनीही परीक्षा केंद्राला सदिच्छा भेट दिली. दर्यापूर तालुका गणित अध्यापक मंडळाचे तालुकाध्यक्ष सचिन वाट,मनोज राठी यांनीही परीक्षा केंद्राला भेट देऊन परीक्षेचा आढावा घेतला.

तालुक्यात ग्रामिण व शहरी अशा विभागांमध्ये घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेसाठी इयत्ता ५ वी, ७ वी, ८ वी व ९ वी मधिल एकूण ४७८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

ग्रामिण भागातील खल्लार हायस्कूल खल्लार, गिरिजाशंकर विद्यालय चंडिकापूर, श्री गुरुदेव विद्यालय नरदोडा, श्री शिवाजी हायस्कूल भामोद, माध्यमिक विद्यालय अडूळा बाजार, अनु. जाती मुलांची शासकीय आश्रम शाळा सामदा, महर्षी वाल्मिकी विद्यालय सामदा,संत गाडगे महाराज माध्यमिक विद्यालय आश्रमशाळा आमला, श्री.एम बी पवार विद्यालय नांदेड बु, राष्ट्रीय विद्यालय तोंगलाबाद इत्यादी शाळांमधून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त व उत्कृष्ट सहभाग हे या परीक्षेचे विशेष वैशिष्ट्य ठरले.परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी तालुका समन्वयक नरेश इसळ यांनी नियोजन व समन्वयाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

## गणेशोत्सव व महालक्ष्मी उत्सवावर महागाईचा भडका


**अमरावती/का.प्र.**

गणेशोत्सव व महालक्ष्मी पूजनाच्या पार्श्वभूमीवर वधारलेले हे दर ग्राहकांच्या आवाक्याबाहेर जाणारे असले तरी ते दिवाळीपर्यंत चढेच राहण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. किरकोळ बाजारात कांदा ८० रुपये प्रतीकिलो तर लसूण ३०० रुपयांवर गेला आहे.

ऐन सणासुदीच्या दिवसांत कांदा व लसणाची टंचाई निर्माण झाल्याने भाव चांगलेच तडकले आहेत. गेल्या उन्हाळी हंगामात उत्पादन कमी झाल्याने सद्या बाजारातील आवक मंदावली आहे. नविन उत्पादनास अवकाश असल्याने ऐन सणासुदीच्या दिवसांत कांदा व लसणाचे दर वधारले आहेत. जिल्ह्यातील मोजक्या भागात कांद्याचे उत्पादन घेतल्या जाते तर, लसनाची लागवड केल्या जात नाही. गेल्या उन्हाळी हंगामात कांद्याचे उत्पादन कमी झाले आहे. अशातच अवकाळीने कांद्याचे नुकसान केले असून मिळेत त्या भावात शेतकऱ्यांनी त्यावेळी कांदा विक्री केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडे साठवणुकीचा कांदा शिल्लक नाही. येथील बाजार समितीच्या भाजीपाला यार्डवर नाशिक कांद्याची आवक अधिक प्रमाणांत होते. लसण प्रामुख्याने राज्याच्या इतर भागातून व परप्रांतातून येतो. राज्यात छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, सांगली, उस्मानाबाद, सोलापूर, लातूर आणि बुलढाणा या जिल्हयात लसणाचे उत्पादन घेण्यात येते. तेथूनच येथे आवक होते. टंचाईच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यानी कांदा व लसणाचे दर वाढविले आहेत. किरकोळ बाजारात कांदा ८० रुपये प्रतीकिलोवर तर, लसन ३०० रुपयांवर गेला आहे.

# राजेश सावरकर, सरिता काठोळे, वैशाली राऊत यांचा सत्कार

**अमरावती-**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, जिल्हा शाखा अमरावतीची सभा जिल्हा परिषद कन्या शाळा, कॅम्प, अमरावती येथे उत्साहात झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षक नेते गोकुलदास राऊत होते.सभेला जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार, राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर, राज्य महिला प्रतिनिधी प्रविणा कोल्हे, जिल्हा महिला आघाडी प्रमुख सरिता काठोळे, कोषाध्यक्ष भावना ठाकरे, कार्यालयीन



सचिव मनीष काळे, जिल्हा सल्लागार संभाजी रेवाळे, जुनी पेन्शन आघाडीचे जिल्हा सरचिटणीस प्रेमसूख ठोंबरे, कोषाध्यक्ष पंकज दहीकर, जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.प्रारंभी शिक्षक समितीचे संस्थापक कै. भा. वा. शिंपी गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर प्रशासनाशी चर्चा करणारअध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर आलेल्या विषयांमध्ये शिक्षकांचे वेतन, जी.पी.एफ. स्लिप, वैद्यकीय बिले, पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी, शनिवारी शिक्षण परिषद आयोजित न करणे, एम.डी.एम.च्या नोंदणीमध्ये मुख्याध्यापकांचे नाव नसावे, मेळघाटातून बदली झालेल्या सन २०२४ मधील शिक्षकांना कार्यमुक्त करणे तसेच मेळघाटातून बदली होऊन आलेल्या शिक्षकांना थकीत आदिवासी भत्ता मिळणे आदी विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

याशिवाय निवडश्रेणी व पदोन्नतीची प्रक्रिया राबविण्याची मागणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आगामी काळात मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच प्राथमिक शिक्षणाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन सादर करून सविस्तर चर्चा करण्यात येणार असल्याचे सभेत निश्चित करण्यात आले. सभेचे संचालन शैलेन्द्र दहातोंडे यांनी केले. प्रास्ताविक अजयानंद पवार यांनी केले, तर आभार पंकज दहीकर यांनी मानले. सभेला जिल्हा व तालुका पदाधिकारी तसेच शिक्षक समितीचे सदस्य बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणेश मंडळातील वादानंतर हातात चाकू; एकाला अटक

**१३ इंची धारदार शस्त्र जप्त, दुसऱ्याचा शोध सुरू**

**अमरावती/प्रतिनिधीः-** गणेशोत्सव मंडळातील अंतर्गत वाद चिघळल्यानंतर चाकू हातात घेऊन फिरणाऱ्या एका पदाधिकाऱ्याला राजापेठ पोलिसांनी अटक केली. यश अजय गुप्ता याला ताब्यात घेत त्याच्याकडून सुमारे १३ इंच लांबीचा धारदार लोखंडी चाकू जप्त करण्यात आला. याच प्रकरणातील उज्वल ऊर्फ छाटा सरकार भुसारी (वय १९) हा फरार असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत.



आदर्शनगर-गोपालनगर परिसरातील श्री विनायक गणेशोत्सव मंडळात सोमवारी रात्री साडेअकराच्या सुमारास यश गुप्ता आणि मंडळाचा सदस्य उज्वल भुसारी यांच्यात वाद झाला. वादानंतर दोघेही चाकू घेऊन एकमेकांचा शोध घेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच राजापेठ पोलिसांच्या पथकाने परिसरात शोध घेतला. पोलिसांच्या कारवाईत यश गुप्ता हा चाकूसह आढळून आला. त्याच्याकडील धारदार लोखंडी चाकू जप्त करण्यात आला. चाकुची एकूण लांबी सुमारे १३ इंच असून, त्याचे पाते नऊ इंच आणि मुठ चार इंच आहे. जप्त शस्त्राची किंमत अंदाजे ५०० रुपये आहे. या घटनेनंतर राजापेठ पोलिसांनी गुप्ता याच्याविरुद्ध आर्म्स ॲक्टच्या कलम ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, दुसरा संशयित उज्वल भुसारी हा पोलिसांच्या हाती लागलेला नसून त्याचा शोध घेण्यासाठी पथकाकडून प्रयत्न सुरू आहेत. वादाचे नेमके कारण आणि दोघांकडे शस्त्रे कशी आली, याबाबतही पोलिसांकडून तपास केला जात आहे. गणेशोत्सवाच्या काळात मंडळांमधील ☞(पान २ वर)

# वेडसर इसमास अज्ञात वाहनाची जोरदार धडक

## -अपघातात जागीच मृत्यू ,मोर्शी-चांदूरबाजार मार्गावर घटना

**मोर्शी/प्रतिनिधीः-** रोडवर फिरणाऱ्या एका वेडसर इसमास भरधाव वेगाने चालविणाऱ्या एका अज्ञात वाहनाने जोरदार धडक मारल्यामुळे त्याचा मेंदू धडाच्या अलग होऊन जागीच मृत्यू झाल्याची घटना आज दि.१५ सप्टेंबर रोजी अगदी पहाटेच्या सुमारास मोर्शी ते चांदूरबाजार रोडवरील चिखलसावंगी फाट्यानजीक घडली. मृतक इसमाचे नाव राजू गोवर्धन बगसरे (वय ५५) सध्या राहणार हल्ली मुक्काम खानापूर असे आहे.पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार राजू गोवर्धन बगसरे हा ५५ वर्षीय



इसम अंभोरी तालुका अकोट,जिल्हा अकोला येथील रहिवासी होता. त्याने तेथील घर व इतरही त्याच्या मालकीची प्रॉपर्टी विकून तो चार ते पाच वर्षापूर्वी मोर्शी जवळच असलेल्या खानापूर येथे आपल्या पत्नीला घेऊन आला होता. काही काळानंतर पत्नी त्याला सोडून निघून गेली तेव्हापासून तो वेडसर स्थितीत कुठेही रस्त्यावर गावागावात फिरून पोट भरत होता. आज दि.१५ सप्टेंबर रोजी तो खानापूर मार्गे पायदळ रस्त्यावरून मोर्शीकडे येत असतांना एका पेट्रोल पंपाजवळ एका अज्ञात वाहनाने त्याला जोरदार धडक मारल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. याबाबत मोर्शी पोलिसांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतक इसमाचे प्रेत उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे आणून पंचनामा आटोपला.उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ☞(पान २ वर)

# अखेर घरकुल अभियंता जिवन आठवले सेवेतून कमी

## मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांचे आदेश

**कुंभारगाव येथील घरकुल घोटाळा प्रकरण**

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कुंभारगाव येथे गेल्या सहा महिन्यांपासून चर्चेत असलेल्या घरकुल घोटाळा प्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गंभीर दखल घेतली. घरकुल योजनेतील कथित अनियमिततेबाबत ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याला तात्काळ सेवेतून कमी करून त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी (भा.प्र.से.) यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती अंजनगाव सुर्जी यांना दिले आहेत.



सविस्तर वृत्त असे की, कुंभारगाव येथील तक्रारदार ज्ञानदीप बारब्दे व प्रविण रामदास मालगे यांनी घरकुल योजनेतील कथित घोटाळ्याविरोधात आंदोलन आणि उपोषण केले होते. त्यांच्या पाठपुराव्यानंतर पंचायत समिती स्तरावर प्राथमिक चौकशी करण्यात आली असता, घरकुल अभियंता जिवन आठवले व ग्रामरोजगार सेवक दोषी आढळल्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवण्यात आला होता. मालगे यांनी केलेल्या 'GRC-74' वर्गीकृत तक्रारीच्या अनुषंगाने दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती यांच्या कक्षात सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत सादर झालेल्या अहवालाचे अवलोकन केले असता, संबंधित घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम नियमानुसार न करता जुन्या घराला केवळ किरकोळ दुरुस्ती करून लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी ☞(पान २ वर)

# १३२ केव्ही लाईन असूनही मेळघाटातील वीज संकट कायम

## -वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त

**मेळघाट/प्रतिनिधीः-** मेळघाटसारख्या दुर्गम व आदिवासीबहुल भागातील वीज व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने मध्य प्रदेशातील नेपानगर येथून धारणीपर्यंत कोट्यवधी रुपये खर्च करून १३२ केव्ही वीज वाहिनी आणण्यात आली आहे. तसेच मेळघाटातील विविध भागांत वीज उपकेंद्रे उभारण्यात आली आहेत. मात्र, या सुविधा उपलब्ध झाल्यानंतरही धारणी शहरासह परिसरातील गावांमध्ये वारंवार वीज खंडित होण्याची समस्या नागरिकांना जाणवत आहे. धारणी शहरात काही वेळा कमी अंतराने वीज ये-जा होत



**-पावसाळ्यात सुरक्षिततेचा प्रश्न, शेतकऱ्यांनाही सिंचनाची चिंता**

असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. काही प्रसंगी वीजपुरवठा तीन तास किंवा त्याहून अधिक काळ खंडित राहत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे घरगुती कामकाज, व्यवसाय, विद्यार्थ्यांचा अभ्यास तसेच इतर दैनंदिन कामांवर परिणाम होत असल्याचे नागरिक सांगतात.

धारणी येथील उपकेंद्रावर तुलनेने अधिक भार असल्याचे सांगितले जाते. उन्हाळ्यात विजेची मागणी वाढत असल्याने भार वाढणे स्वाभाविक असले, तरी सध्या वातावरणात गारवा वाढला असून उष्णताही कमी झाली आहे. अशा परिस्थितीतही वीजपुरवठ्यात वारंवार व्यत्यय येत असल्याने धारणी उपकेंद्रावरील ☞(पान २ वर)

# जिल्हाधिकाऱ्यांकडून मोर्शी तालुक्यातील खरीप पिकांची प्रत्यक्ष पाहणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील नेर पिंगळाई महसूल मंडळातील नेर भाग-२ परिसरात जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन खरीप हंगामातील विविध पिकांच्या सद्यस्थितीची पाहणी केली. या दौऱ्या दरम्यान त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून पिकांच्या वाढीबाबत सविस्तर माहिती घेतली.



दौऱ्याच्या सुरुवातीला जिल्हाधिकाऱ्यांनी बाळा कीर्तकर यांच्या शेतातील कपाशी पिकाची पाहणी केली. या परिसरात पडलेल्या पावसाच्या प्रदीर्घ खंडाचा पिकाच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे यावेळी दिसून आले. त्यानंतर रखमाबाई संभे आणि सुखदेव खवले यांच्या शेतातील सोयाबीन पिकाची त्यांनी पाहणी केली.या शेतांमध्ये ☞(पान २ वर)

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ४ हजारावर प्रकरणांचा निपटारा

## १४.४८ कोटींहून अधिक रक्कमेची तडजोड

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये दाखलपूर्व प्रकरणातील २ हजार ४६० प्रकरणे आणि प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांपैकी २ हजार १३१ अशा एकूण ४ हजार ५९१ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या प्रकरणांमध्ये १४ कोटी ४८ लाख ७३ हजार ९९१ रुपयांची तडजोड झाल्याची माहिती जिल्हा विधी



सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार आणि अमरावतीच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली १२ सप्टेंबर २०२६ रोजी अमरावती जिल्हा व सत्र न्यायालय आणि जिल्ह्यातील विविध तालुका न्यायालयांमध्ये 'राष्ट्रीय लोक अदालत' आयोजित करण्यात आली. जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती तथा मुंबई उच्च न्यायालयाच्या ☞(पान २ वर)

# जिल्ह्यात तडीपारीच्या १६३ प्रकरणांचा निपटारा

## १० प्रलंबित प्रकरणांवर आज सुनावणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलीस आणि उपविभागीय दंडाधिकारी प्रशासनाकडून वेगाने कायदेशीर प्रक्रिया राबवली जात आहे. विविध उपविभागीय अधिकारी कार्यालयांतर्गत एकूण १६३ तडीपारीची प्रकरणे निकाली काढण्यात आली असून १० प्रलंबित प्रकरणांवर बुधवारी, १६ सप्टेंबर रोजी याबाबत




अंतिम आदेश जारी होणार आहे.

यासंदर्भात पोलीस विभागने जारी केलेल्या अहवालानुसार, कलम १६३(२) अंतर्गत एकूण १०५ प्रकरणे प्राप्त झाली होती, ती सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली ☞(पान २

# बोर्डीनाला मध्यम प्रकल्पावर मच्छिमार संस्था नोंदणीला सुरुवात

**३० दिवसांत अर्ज करण्याचे आवाहन**

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदुरबाजार तालुक्यातील बोर्डीनाला मध्यम प्रकल्प (१५२.२७ हे.) तलावावर नवीन सहकारी संस्था नोंदणी प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. स्थानिक मच्छिमार, प्रकल्पग्रस्त आणि महिला मच्छिमारांना येत्या ३० दिवसांच्या आत अर्ज करण्याचे आवाहन, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाने केले आहे. या नोंदणी प्रक्रियेद्वारे बोर्डीनाला तलाव परिसरातील स्थानिक मच्छिमार, प्रकल्पग्रस्त आणि महिला मच्छिमारांना रोजगाराची आणि व्यवसायाची मोठी संधी उपलब्ध करून दिली जात आहे. तलाव परिसरातील स्थानिक मच्छिमार, प्रकल्पग्रस्त आणि मच्छिमार महिला या संस्था नोंदणीसाठी सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था),अमरावती यांचे कार्यालयात अर्ज करू शकतात. ३० दिवसांच्या आत इच्छुक उमेदवारांनी आपले प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.स्थानिक पातळीवर मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी आणि मच्छिमार बांधवांना आर्थिक सक्षम करण्यासाठी ही मोहीम राबवली जात आहे. ☞(पान २ वर)

# तडीपार आरोपी तलवारीसह ताब्यात

## क्राइम ब्रँचकडून रतनगंजमध्ये कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातून तडीपार करण्यात आलेला आरोपी चक्क आपल्या घरातच तलवार घेऊन राहत असल्याचे उघडकीस आले. क्राइम ब्रँचच्या पथकाने रतनगंज परिसरात छापा टाकून राज रोहित देऊळकर (२०, रा. रतनगंज, अमरावती) याला तलवारीसह अटक केली. त्याच्याकडून अंदाजे दोन हजार रुपये किमतीची स्टीलची तलवार जप्त करण्यात आली.

क्राइम ब्रँचचे पथक शहरात गस्तीवर असताना तडीपार आरोपी राज देऊळकर हा आदेशाची पायमल्ली करून चोरीछुप्या पद्धतीने घरी आल्याची



माहिती पोलिसांना मिळाली. त्याच्याकडे ☞(पान २ वर)

# डॉ. एकता पांडे यांनी संपादन केली एमपीटी पदव्युत्तर पदवी

## -कार्डिओव्हॅस्क्युलर व रेस्पिरेटरी फिजिओथेरपी विषयात मिळवले विशेष प्राविण्य

**अमरावती/प्रतिनिधीः-** वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात आपल्या सातत्यपूर्ण परिश्रमांच्या बळावर डॉ. एकता राजेंद्र पांडे यांनी फिजिओथेरपी विषयात पदव्युत्तर पदवी यशस्वीरीत्या संपादन केली आहे. त्यांनी हे उच्च शिक्षण डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या अहिल्यानगर (वडगाव गुप्ता) येथील 'कॉलेज ऑफ फिजिओथेरपी'मधून पूर्ण केले.

डॉ. एकता पांडे यांनी आपली ☞(पान २ वर)



# श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा गुणवंत पुरस्कार वितरण सोहळा

## -प्राचार्य डॉ.ए.एल.कुलट, डॉ.पंकज नागपुरे, प्रा.गजानन भारसाकळे, डॉ.रुपाली इंगोले, मुख्याध्यापक डॉ.चत्रभुज कदम, डॉ.वैशाली देशमुख, नितीन कडू, डॉ.कांचन ठाकरे, अर्चना ढोबळे, हेमंत पाथ्रीकर सन्मानित

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्थेतील शाळा, महाविद्यालये या मध्ये कार्यरत असलेले प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या साठी असलेला पुरस्कार वितरण सोहळा आज संपन्न झाला. श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,अकोलाचे प्राचार्य डॉ.अंबादास कुलट यांना स्व.पी.डी.चौधरी स्मरणार्थ उत्कृष्ट प्राचार्य, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील भौतिकशास्त्र विभागप्रमुख





डॉ.पंकज नागपुरे आणि अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, अकोला येथील सहाय्यक प्राध्यापक गजानन भारसाकळे यांना स्व.बी.एस.उर्फ डॅडी देशमुख उत्कृष्ट प्राध्यापक तर श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय,अमरावती येथील डॉ.रुपाली इंगोले यांना स्व.वनमालाताई कोहळे स्मृती उत्कृष्ट महिला प्राध्यापक आणि वरुड येथील महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालयाचे कनिष्ठ मवि शिक्षक डॉ.चत्रभुज कदम यांना स्व.हिरोजी उलेमाले स्मृती उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने तसेच शिवाजी बहुउद्देशीय शाळेच्या शिक्षिका सौ.अर्चना अभय ढोबळे यांना स्व.जुगलकिशोरजी अग्रवाल उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

संस्थेच्या मातोश्री विमलताई देशमुख सभागृहात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे ☞(पान २ वर)

# दर्यापूर नगरपरिषद क्षेत्रातील १७ वृक्षतोडीप्रकरणी फौजदारी कारवाईची मागणी



**खल्लार/प्रतिनिधीः-** नगरपरिषद दर्यापूर हद्दीतील हनुमान मंदिर ते सुधाकर भारती यांच्या घरापर्यंतच्या परिसरात फांद्यांची छाटणी करण्याच्या आदेशाऐवजी १७ वृक्ष बुडापासून कापण्यात आले. या प्रकरणाची चौकशी करून संबंधित दोषींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशा आशयाचे निवेदन मुख्याधिकारी नगरपरिषद दर्यापूर,वनविभाग कार्यालय अचलपूर,ठाणेदार पोलीस स्टेशन दर्यापूर यांना ☞(पान २ वर)